पिंपरी चिंचवड महानगरपालिका,पिंपरी- ४११ ०१८

मा.महापालिका सभा

कार्यपत्रिका क्रमांक –५९

सभावृत्तांत

दिनांक –१८.६.२०२१ वेळ –दुपारी २.०० वाजता

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेची माहे जून - २०२१ ची मासिक मा.महापालिका सभा शुक्रवार दिनांक १८/०६/२०२१ रोजी दुपारी २.०० वाजता महानगरपालिकेच्या प्रशासकीय इमारतीमधील यशवंतराव चव्हाण सभागृहात मा.उपसचिव महाराष्ट्र शासन नगरविकास विभाग यांचेकडील पत्र क्र.कोरोना-२०२०/प्र.क्र.७६/नवि-१४ दि.३ जुलै २०२० अन्वये ऑनलाईन पध्दतीने (व्हिडीओ कॉन्फरन्सिंग द्वारे) व सभागृहातील आसन क्षमतेच्या ५०% प्रमाणे सदस्यांचे उपस्थितीत आयोजित करणेत आलेली होती. सभेस खालील सन्मा.सदस्य ऑनलाईन पध्दतीने (व्हिडीओ कॉन्फरन्सिंग द्वारे) उपस्थित होते.

१) मा.उषा उर्फ माई मनोहर ढोरे महापौर

२) मा.घुले नानी उर्फ हिराबाई गोवर्धन उपमहापौर

३) मा.कुंदन अंबादास गायकवाड

४) मा.स्वीनल कपिल म्हेत्रे

५) मा.साधना अंकुश मळेकर

६) मा.अश्विनी संतोष जाधव

७) मा.सारीका शिवाजी सस्ते

८) मा.राहुल गुलाब जाधव

९) मा.वसंत प्रभाकर बोराटे

१०) मा.नितीन (आप्पा) प्रताप काळजे

११) मा.बुर्डे सुवर्णा विकास

१२) मा.तापकीर विनया प्रदीप (आबा)

१३) मा.डोळस विकास हरिश्चंद्र

१४) मा.गायकवाड निर्मला मनोज

१५) मा.सागर बाळासाहेब गवळी

१६) मा.गोफणे अनुराधा  देविदास

१७) मा.बारसे प्रियांका प्रविण

१८) मा.अजित दामोदर गव्हाणे

१९) मा.बोइनवाड यशोदा प्रकाश

२०) मा.लांडगे राजेंद्र किसनराव

२१) मा.संतोष (आण्णा) ज्ञानेश्वर लोंढे

२२) मा.फुगे भिमाबाई पोपट

२३) मा.ॲड.नितीन ज्ञानेश्वर लांडगे

२४) मा.सावळे सिमा रविंद्र

२५) मा.मडिगेरी विलास हनुमंतराव

२६) मा.लांडे विक्रांत विलास

२७) मा.राहुल हनुमंतराव भोसले

२८) मा.समीर मोरेश्वर मासुळकर

२९) मा.अनुराधा गणपत गोरखे

३०) मा.केशव हनुमंत घोळवे

३१) मा.मंगला अशोक कदम

३२) मा.तुषार रघुनाथ हिंगे

३३) मा.अश्विनी भिमा बोबडे

३४) मा.योगीता ज्ञानेश्वर नागरगोजे

३५) मा.संजय बबन नेवाळे

३६) मा.भालेकर प्रविण महादेव

३७) मा.संगिता (नानी) प्रभाकर ताम्हाणे

३८) मा.पंकज दत्तात्रय भालेकर

३९) मा.घोलप कमल अनिल

४०) मा.उत्तम प्रकाश केंदळे

४१) मा.पवळे सुमनताई मधुकर

४२) मा.चिखले सचिन तुकाराम

४३) मा.यादव मीनल विशाल

४४) मा.वैशाली जालिंदर काळभोर

४५) मा.राजू मिसाळ

४६) मा.शैलजा अविनाश मोरे

४७) मा.बाबर शर्मिला राजू

४८) मा.अमित राजेंद्र गावडे

४९) मा.बाळासाहेब नामदेव ओव्हाळ

५०) मा.खानोलकर प्रज्ञा महेश

५१) मा.भोंडवे संगिता राजेंद्र

५२) मा.मोरेश्वर महादू भोंडवे

५३) मा.ढाके नामदेव जनार्दन

५४) मा.माधुरी कुलकर्णी उर्फ मोनाताई

५५) मा.भोईर सुरेश शिवाजी

५६) मा.अपर्णा निलेश डोके

५७) मा.अश्विनी गजानन चिंचवडे-पाटील

५८) मा.गावडे राजेंद्र तानाजी

५९) मा.जयश्री वसंत गावडे

६०) मा.कोमल दिपक मेवानी

६१) मा.शितल उर्फ विजय गोरख शिंदे

६२) मा.सुलक्षणा राजू धर

६३) मा.शाम गणपतराव लांडे

६४) मा.सुजाता सुनिल पालांडे

६५) मा.योगेश मंगलसेन बहल

६६) मा.संदीप बाळकृष्ण वाघेरे

६७) मा.उषा संजोग वाघेरे (पाटील)

६८) मा.नढे विनोद जयवंत

६९) मा.पाडाळे निता विलास

७०) मा.कोकणे संतोष अंकुश

७१) मा.पवार मनिषा प्रमोद

७२) मा.बारणे अर्चना तानाजी

७३) मा.कैलास उर्फ बाबा भालचंद्र बारणे

७४) मा. ॲड.भोसले सचिन सुरेश

७५) मा.बारणे झामाबाई बाळासाहेब

७६) मा.निलेश हिरामण बारणे

७७) मा.वाघमारे अश्विनी विक्रम

७८) मा.दर्शले रेखा राजेश

७९) मा.कलाटे राहुल तानाजी

८०) मा.कलाटे मयूर पांडुरंग

८१) मा.कामठे तुषार गजानन

८२) मा.चोंधे आरती सुरेश

८३) मा.कस्पटे संदिप अरुण

८४) मा.बाबासाहेब (बाबा) त्रिभुवन

८५) मा.सविता बाळकृष्ण खुळे

८६) मा.सुनिता हेमंत तापकीर

८७) मा.चंद्रकांत बारकु नखाते

८८) मा.बापु उर्फ शत्रुघ्न सिताराम काटे

८९) मा.कुटे निर्मला संजय

९०) मा.शितल विठ्ठल उर्फ नाना काटे

९१) मा.विठ्ठल उर्फ नाना काटे

९२) मा.आंगोळकर सागर सुनिल

९३) मा.मुंढे उषा अंकुश

९४) मा.कदम शशिकांत गणपत

९५) मा.लोखंडे चंदा राजू

९६) मा.आशा धायगुडे-शेंडगे

९७) मा.काटे स्वाती (माई) चंद्रकांत

९८) मा.रोहित (आप्पा) सुदाम काटे

९९) मा.कांबळे अंबरनाथ चंद्रकांत

१००) मा.राजापुरे माधवी राजेंद्र

१०१) मा.चौगुले सीमा दत्तात्रय

१०२) मा.संतोष बबन कांबळे

१०३) मा.सोनवणे शारदा हिरेन

१०४) मा.हर्षल मच्छिंद्र ढोरे

१०५) मा. भाऊसाहेब सोपानराव भोईर

१०६) मा.थोरात ज्ञानदेव मुरलीधर

१०७) मा.नायर प्रेमकुमार शंकरन उर्फ बाबू

१०८) मा.ॲड.मोरेश्वर ज्ञानेश्वर शेडगे

या शिवाय मा.राजेश पाटील-आयुक्त, मा.विकास ढाकणे-अतिरिक्त आयुक्त (१), मा.उल्हास जगताप-नगरसचिव तथा अतिरिक्त आयुक्त (३), मा.कुंभोजकर-मुख्य लेखापरिक्षक, मा.राजन पाटील-शहर अभियंता, मा.डॉ.रॉय-आरोग्य वैदयकीय अधिकारी, मा.नाळे-उपसंचालक नगररचना, मा.कोळंबे-मुख्य लेखा व वित्त अधिकारी, मा.इंगळे, मा.चारठाणकर,मा.दुरगुडे, मा.इंदलकर, मा.लोणकर, मा.निकम, मा.भालकर, मा.सवणे, मा.तांबे- सह शहर अभियंता, मा.जोशी, मा.देशमुख, मा.बोदडे-सहा.आयुक्त, मा.मुंढे –प्र.शिक्षणाधिकारी( माध्यमिक शिक्षण विभाग),मा.शिंदे – प्रशासन अधिकारी ( प्राथमिक शिक्षण विभाग), मा.पोमण-मुख्य माहिती व तंत्रज्ञान अधिकारी, मा.डॉ.वाबळे – अधिष्ठता वायसीएमएच, मा.चव्हाण, कुलकर्णी,जुंधारे,गलबले, मा.ओंभासे, मा.भोसले, मा.मोरे,मा.घुबे,मा.देशमुख,मा.सेठीया, मा.धुमाळ, मा.देशमुख,मा.आढारी - प्रशासन अधिकारी,मा.गायकवाड- जनतासंपर्क अधिकारी, मा.गोफणे – आरोग्य अधिकारी, मा.माने- लेखाधिकारी पीएमपीएमएल हे अधिकारी सभेस उपस्थित होते.

**मा.महापौर** – उपस्थित मा.नगरसेवक, मा.नगरसेविका, ऑनलाईन उपस्थित असलेले सर्व सदस्य,मा.आयुक्त, अधिकारी वर्ग, पत्रकार, नागरिक या सर्वांचे स्वागत करुन सभा कामकाजाला सुरुवात करणेत येत आहे.

अ) मा.महापालिका सभा क्रमांक ५७ दि.३०/४/२०२१ चा सभावृत्तांत कायम करणेत आल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.

ब) मा.महापालिका सभा क्रमांक ५८ दि.२०/५/२०२१( दु.२.०० वा. व २.२५ वा.) चा सभावृत्तांत कायम करणेत आल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.

**मा.ज्ञानदेव थोरात**–मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह, मुळशी तालुक्यातील उरवडे औद्योगिक वसाहतीतील केमिकल कंपनीस आग लागुन १८ कामगारांचे निधन झालेले असल्याने त्यांस तसेच अंजनाबाई खर्गे – आपला आवाज न्युज चॅनलचे उपसंपादक रोहित खर्गे यांच्या मातोश्री यांचे निधन, कांताबाई सातारकर – जीवनगौरव पुरस्कार विजेत्या तमाशासम्राज्ञी यांचे निधन, कादंबरी कडु – प्रसिध्द नाटय चित्रपट अभिनेता भूषण कडू यांच्या पत्नी यांचे निधन, आर सुब्रमण्यम व सुभाष चोपडे – पिंपरी चिंचवड महापालिकेचे कर्मचारी व माजी लिफ्टमन यांचे निधन झालेले असल्याने त्यांना आजच्या सभेत श्रध्दांजली अर्पण करणेत यावी अशी मी सूचना मांडतो.

मा. बाबासाहेब त्रिभुवन – मा.महापौर साहेब, सूचनेस अनुमोदन देतो.

**मा.महापौर -** श्रध्दांजली अर्पण करण्यासाठी सर्वांनी दोन मिनीटे स्तब्ध उभे रहावे.

(सर्वांनी दोन मिनीटे स्तब्ध उभे राहून श्रध्दांजली अर्पण केली.)

---------

**मा.राहूल जाधव**– मा.महापौर साहेब,मा.आयुक्त साहेब,सन्मा.सभागृह माई,विषय असा आहे की,आपल्या स्थायी समितीमध्ये परवानाधारक रिक्षाचालक असेल, नोंदणीकृत घरकाम कामगार असतील, नोंदणीकृत बांधकाम मजुर असतील,गटई कामगार असतील, सलुन, ब्युटीपार्लर, आर्थीक दुर्बल घटकातील लोकांना तीन हजार रुपयांची मदत करणे असा कोविड मदत म्हणुन आपण हा विषय मंजुर केला. त्यानंतर संपुर्ण पत्रकारांनी आणि वृत्तपत्रांनी त्याची दखल घेतली आणि कोविड मदत म्हणुन आर्थीक दुर्बल घटकातील नागरीकांना मदत करणारी पिंपरी चिंचवड महापालिका म्हणुन अशा बातम्या देखील वृत्तपत्रात लागल्या परंतु आयुक्त साहेब,आपण ही मदत का करु शकलो नाही. याचा खुलासा आपण द्यावा. कारण स्थायी समितीमध्ये विषय मंजुर केल्यानंतर आपण या लोकांना मदत करु शकत होतो. आयुक्त साहेब, पिंपरी चिंचवड शहर हे औद्योगिक नगरी,कष्टक-यांची नगरी म्हणुन ओळखले जात आहे. कोविडच्या परिस्थितीमध्ये ब-याच नागरीकांना आर्थीक समस्येला सामोरं जावं लागलं आहे. ज्यावेळेस पहिली लाट आली त्यावेळेस हार्डीकर साहेब याठिकाणी आयुक्त म्हणुन होते. पहिल्या

लाटेमध्ये सर्वच नगरसेवकांनी, विविध संस्थांनी या नागरीकांना भरपूर मदत केली होती. दुसरी लाट आल्यानंतर  पिंपरी चिंचवड महानगरपालिकेकडे नागरीकांना अशा प्रकारची मदत करावी अशी मागणी केली असेल तर,त्यांना ती मदत झालीच पाहिजे. कारण रिक्षा बंद होत्या, अनेक व्यवसाय बंद होते अशा वेळेस जर आपण या लोकांना मदत करु शकलो नाही तर एवढी मोठी आशिया खंडातील महानगरपालिका म्हणुन घेण्याची सुध्दा आपल्याला लाज वाटते. अशा पध्दतीचा निर्णय याठिकाणी झालेला आहे. त्यामुळे असा विषय आणि ही मदत त्या गोरगरीबांना होणं गरजेचं आहे. परवानाधारक बॅचवाले रिक्षाधारक,नोंदणीकृत घरकामगार, नोंदणीकृत बांधकाम मजुर, शहरातील गटई कामगार, सलुन,ब्युटीपार्लर चालक, स्कुल बसचालक व मालक अशा आर्थीक दुर्बल घटकातील लोकांना आपण तीन हजार रुपये देणार होतो. तर ती मदत आपण केली नाही आता ही मदत तुम्ही कोणाच्या  सांगण्यावरुन केली नाही का ?  कारण शहरामध्ये तर वेगळीच चर्चा चालू आहे. हा निर्णय आयुक्त साहेबांचा नसून आयुक्त साहेबांच्या मागे कर्ता,करविता दुसराच आहे असा स्पष्ट आरोप आमचा तुमच्यावर आहे. स्थायी समितीचा निर्णय काय चुकीचा होता. या लोकांच्या खात्यावर आपण डायरेक्ट निधी जमा करणार होतो. हा कोणत्या पक्षाच्या नगरसेवकांच्या बँक खात्यावर जमा होणार नव्हता. मग अशा गरीबांना जर आपण मदत करु शकत नाही तर आम्ही सुध्दा लोकप्रतिनिधी म्हणुन घेण्यास लायक नाही. ज्या गोरगरीब जनतेच्या मतावर आम्ही निवडुन आलो या पिंपरी चिंचवड शहराचे प्रतिनिधीत्व आम्ही करतो. अशा वेळेला जर आम्ही मदत करु शकलो नाही तर का,आम्ही नगरसदस्य म्हणुन घ्यायचं,अशा लोकांना मदत झाली पाहिजे नां,रिक्षाचालक २००/३०० रुपये कमावतो आणि त्याची रिक्षाच बंद राहीली तर त्याचा संसार कसा चालायचा, गटई कामगार रोडच्या साईडला बसुन चप्पल शिवणार,बुट पॉलीस करणार यांचा धंदा किती होतो. कोविडच्या काळामध्ये लॉकडाऊन लागल्यानंतर लोकचं बाहेर आले नाहीत तर त्याचा धंदा कसा होणार असे बरेच व्यवसाय आहेत की,ज्यांचे या कोरोनामुळे असे परिवार हातघाईला आलेले आहेत. अशा लोकांना मदत होणं गरजेचं आहे. आता तुम्ही सांगताय कलम ६६ नुसार,आपल्याला मदत करता येत नाही. आयुक्त साहेब,आपण आपल्या अधिकारामध्ये त्यांना मदत करु शकतो. मग अशांना मदत करायची नाही तर,आपण करायचे काय? यामध्ये पिंपरी चिंचवड महापालिकेमध्ये निर्णय झाला त्यावेळेस ४० हजार लोकांना आपली मदत झाली असती. स्थायी समितीमध्ये सर्व पक्षाचे नगरसेवक आहेत,नुसते भाजपचे नगरसेवक नाहीत आणि हे ४० हजार लोक आहेत ते काय भाजपचे लोक आहेत का? त्यांनी प्रत्येक पक्षाला मदत केली आहे नां, आपण त्यांना तोंड बघुन मदत करतोय का, अशा लोकांना मदत झालीच

पाहिजे. म्हणजे आम्ही याठिकाणी महापौर दालनामध्ये बैठका घ्यायच्या, त्या बैठकीला सर्व पक्षाचे नगरसेवक होतेच नां, आणि स्थायी समितीमध्ये निर्णय झाल्यानंतर तुम्ही तो नाकारायचा आणि तोंडघशी आम्ही पडणार आणि परत आमच्यावरच विरोध होणार त्यासाठी गोरगरीबांसाठी, आर्थीक दुर्बल घटकातील लोकांना आर्थीक मदत देण्याचा जो निर्णय घेतला आहे त्या निर्णयाची अंमलबजावणी झाली पाहिजे. या कोरोनामुळे जगामध्ये,देशामध्ये आपत्ती आलेली आहे,महाराष्ट्रावर आपत्ती आलेली आहे,पिंपरी चिंचवडवर आपत्ती आलेली आहे. तर याठिकाणी आपण मदत करु शकतो नां, आपण आर्थीक मदत देण्याच्या संदर्भात आपली मिटींग झाली त्यानंतर वृत्तपत्रांनी बातम्या दिल्या त्यानंतर लोक आमच्या ऑफिसला फॉर्म भरण्यासाठी येत होते. आम्ही त्यांना काय उत्तर द्यायचं. हे गोरगरीब लोक रोज आमच्या ऑफिसला येऊन म्हणतात की, आम्हांला तीन हजार रुपये मिळणार आहेत. हार्डीकर साहेब,असताना देखील अशीच दोन हजार रुपये देण्याची मदत जाहीर केली होती. अनेक कार्यकर्त्यांनी,सामाजिक संस्थांनी दिवसरात्र फॉर्म भरले आणि शेवटी हार्डीकर साहेब,आपण अशी मदत करु शकत नाही. मग आम्ही आमच्या पदरचे पैसे द्यायचे का? म्हणजे ज्यावेळी आपण एखादा निर्णय घेतो त्यावेळी या शहरात सगळीच लोकं मोठी नाहीत. शहराचे नावचं औद्योगिक नगरी आहे त्यामुळे या शहरामध्ये कष्टकरी जास्त आहेत. अशा लोकांना मदत करणं गरजेचं आहे. आणि कोणत्याच पक्षाच्या नगरसेवकांनी किंवा गटनेत्यांनी या विषयाला विरोध केला नव्हता त्यामुळे या लोकांना मदत करणं गरजेचंच होतं नां, त्यासाठी साहेब,आपल्याला विनंती आहे की, स्थायी समितीमध्ये जो निर्णय झालेला आहे त्याला दुजोरा देवुन या गोरगरीबांना आर्थीक मदत झाली पाहिजे ही आमच्या नगरसदस्यांची मागणी आहे. धन्यवाद.

**मा.अंबरनाथ कांबळे -** मा.महापौर साहेब,मा.आयुक्त साहेब,सन्मा.सभागृह आताच दादांनी आर्थीक दुर्बल घटकांतील लोकांना तीन हजार रुपये आर्थीक मदत देण्याचा विषय काढला आहे. मागच्या एक/दोन महिन्यापुर्वी आपण हा विषय घेतला होता आणि हे पैसे आपण या लोकांना कसे द्यायचे. आयुक्त साहेबांकडे मा.महापौर,पक्षनेते,स्टँडींग चेअरमन आणि आम्ही सर्व सदस्य एप्रिल महिन्यात गेलो होतो. नंतर एप्रिल महिन्यात आपण महापालिका सभा घेतली आणि विषय मंजुर केला नंतर आम्ही आयुक्त साहेबांकडे गेलो त्यानंतर आयुक्त साहेब म्हणले,आपल्याला हे पैसे आताच वाटप करता येणार नाही कारण कोरोनाचा काळ आहे त्यामुळे गर्दी खुप होईल. आयुक्त साहेबांनी आम्हांला गोड,गोड बोलून पुढे,पुढे ढकलत म्हणजे आम्हांला अक्षरशा वेडयात काढल्यासारखं केलं. पण ही घोषणा आपल्या मा.महापौर माईनीं केली होती. सर्व पक्षीय नगरसेवकांनी केली होती. पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या

परिसरातील जेवढे गोरगरीब लोक होती त्यांना आपण मदत करणार होतो. लोकं खुष झाली होती. आणि आम्हीही लोकांना सांगायचे की, ही मदत दहा दिवसांनी मिळेल अक्षरशा हे फसवत,फसवत आयुक्त साहेब,तुम्ही आम्हांला इथवर आणलेलं आहे. आता अशी एक गोष्ट झालेली आहे की, मी माझ्या प्रभाग क्र.१७ मध्ये उभा होतो माझ्या विरोधात काही जण उभे होते त्यांनी आमचे अक्षरशा आमच्या विरोधात बॅनर्स लावलेले आहेत की,या,या नगरसेवकांनी आश्वासन दिलं आणि तीन हजार रुपये दिलेले नाहीत. आमचे काही विरोधक असतील, ते आमची चांगलीच परिक्षा घेतात आता निवडणुका आलेल्या आहेत आणि मला तर संशय येतोय की, आयुक्त साहेब,तुम्ही एखादा नवीन पक्ष काढणार आहे का, तुम्ही आमच्या विरोधात उमेदवार उभे करणार आहेत का, कारण या विषयामुळे आम्हांला खरंच काही कळनां झालयं मागे सुध्दा मी तुम्हांला स्थायी समितीमध्ये बोललो होतो की, आर्थीकदृष्टया दुर्बल लोकांना तीन हजार रुपये देण्याचा विषय झाला पण त्यांना तीन हजार रुपये मिळत नाहीत यासाठी सभा तहकुब केली होती. त्यानंतरच्या दुस-या सभेत तुम्ही हा विषय घेतलाच नाही. नेमका तुम्हांला कोणाचा दबाव आहे. तुम्हांला ही मदत देवु नका असं कोण म्हणतयं कारण सर्व नगरसेवक म्हणतात की,हे जनतेसाठी पैसे आहेत ते जनतेसाठीच वापरा सगळया गोष्टी तुमच्या हातात आहेत नां, नाही,त्याला आपण पैसे देतोय आणि अशा बेकार परिस्थिती आपण पैसे देत नसाल तर खुप अवघड परिस्थिती आहे. आयुक्त साहेब,आमच्या ऑफिसमध्ये लोक येऊन अनेक प्रश्न विचारतात. मला तर तुमच्यावर पुर्ण संशय येतोय की,तुम्ही भारतीय जनता पार्टीचा कार्यक्रम करण्यासाठीच इथे आले आहेत की,काय ? मी खरं तेच बोलतोय,सिमाताई आमच्या इथं तशा पाटया लावल्या आहेत या,या नगरसेवकांनी तीन हजार रुपये दिलेले नाही. मी पण उद्यापासून प्रत्येक ठिकाणी पाटया लावणार आहे की,आयुक्त साहेब, पैसे देत नाहीत मी तरी काय करणार, आयुक्त साहेब,हे बघा आम्ही जर जनतेनी ठरवलं नां, तुम्ही आलाय नां, तसं तुम्हांला परत पाठवण्याचा पण विचार करु, आणि हे खोटं समजु नका, कारण आम्ही गेली साडेचार वर्ष काम करतोय नां ते मनापासून करतोय,आम्ही कोणता पक्ष बघत नाही आम्ही फक्त नागरीक बघतोय. या तीन हजारासाठी एक,एक नागरीक दोन महिन्यांपासून आमच्या दारात खेटा घालतोय. आणि आम्ही तुम्हांला मनापासून सांगतोय या लोकांना काय उत्तर द्यावी लागतात हे आमची आम्हांला माहिती आहे. आयुक्त साहेब,येत्या दोन दिवसात पैसे मिळाले नाही तर तुमच्याकडे मोर्चाच घेवुन येणार आहे. आयुक्त साहेब,मी तुमच्याकडे स्वत: चार वेळेला आलेलो आहे की,आमच्या या गोरगरीबांना हे पैसे मिळावे म्हणुन पण तुम्ही आम्हांला जसं पानाला चुना लावतात ना तसा चुना लावला आहे आम्हांला खोटं सांगत नाही,तुम्ही आम्हांला फसवलं आहे.

आम्हांला प्रभागात काम करता येत नाही. माई, तुम्ही हे गंभीरपणाने घ्या,कारण मी तळमळीने बोलतोय. कारण या गोरगरीब लोकांची नांव लिहुन,लिहुन मी दमलो आहे. आता या सगळया लोकांना घेवुन आयुक्तांकडे यायचं का, तुम्हीच सांगा. या तीन हजारासाठी आम्हांला नको,नको केलं आहे मला वाटत नाही की,मी परत निवडुन येईन. आयुक्त साहेब,मी तुम्हांला खरं सांगतोय माझ्या विरोधात १७ जण उभी होती. १७ जणांनी माझ्या प्रभागात माझ्या विरोधात बॅनर्स लावली आहेत की,हा बघा भारतीय जनता पार्टीचा नगरसेवक, अरे,बाबा मी भारतीय जनता पार्टीचा नगरसेवक असलो तरी आयुक्त हा दुस-याच पक्षाचा आलाय मी तरी काय करणार ? आमच्या पक्षनेत्यांनी सांगितलं की,पैसे द्या,पैसे द्या म्हणजे नेमकं आम्हांला असं काही बोलायला लावु नका, तुम्ही अभ्यासु आहात मोठे अधिकारी आहात या लोकांना पैसे द्यावेत अशी विनंती करतो. माई,तुम्ही मला बोलायला संधी दिली धन्यवाद.

**मा.अनुराधा गोरखे** - मा.महापौर साहेब,मा.आयुक्त साहेब,सन्मा.सभागृह आता जो विषय मांडला आहे त्या विषयाला धरुन मी बोलते. कारण माझ्या वॉर्डात स्लम एरिया आहे तो सर्वात जास्त आहे. आणि त्याठिकाणी गोरगरीब जास्त आहेत त्यामध्ये रिक्षावाले आहेत,न्हावी आहेत, भाजी विकणारे आहेत, धुणीभांडी करणा-या बायकां आहेत जवळपास तिथं दोन/तीन हजार बायका सापडतील. परवा माझ्याकडे १०/१५ बायका आल्या आणि त्या म्हणाल्या की,मॅडम तुम्ही आम्हांला तीन हजार रुपये का देत नाही याबाबतीत मी तुम्हांला फोन पण केला होता. तर यासाठी आयुक्तांनी असा निर्णय का घेतला आहे आपण आपल्या तिजोरीतनं पैसे देतो, आयुक्तांच्या तिजोरीतनं पैसे देत नाही. आयुक्तांनी पैसे देण्यास का नकार दिला. कोरोनामुळे सगळीकडे लोकांची दाणादाण उडालेली आहे. लोकांना कामधंदा नाही, तर अशा परिस्थितीमध्ये लोकं आमच्याकडे येतात विचारतात आम्हांला कामधंदा द्या.आणि आपण त्यांना जे काही पैसे देणार होतो ते न दिल्यामुळे त्याच्यामध्ये आमचीही नालस्ती होते आणि आम्हांलाही उत्तरं देता येत नाहीत. तर आयुक्त साहेबांनी असा निर्णय का घेतला याचा खुलासा करावा. माई,आपण पण आयुक्त साहेबांना विचारावे की,आपण हे पैसे का देवु शकत नाही. दुसरं परवा एक विषय झाला की, अ प्रभाग कार्यालयाच्या इमारतीमधील लिफ्टमध्ये मला जाऊ दिलं नाही. तरी आयुक्त साहेबांनी काही कारवाई केली नाही. आपली लोक इमारतीमध्ये काहीही घेवुन शिरतात तसं मी तुमच्या मिटींगमध्ये करायला येत नव्हते तर मग मला का आडवलं मी त्यांना तोंडांनी सांगतेय की, मी नगरसेविका आहे,मला मिटींगला जायचं आहे मला जाऊ द्या. मी बाकी काही सांगत नाही.पण असा कोणावरही प्रसंग येऊ नये अशी विनंती आहे. धन्यवाद.

**मा.संदिप कस्पटे -** मा.महापौर साहेब,मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह मा.महापौर, आपलं हे शहर कामगार नगरी म्हणुन समजलं जातं आणि कष्टकरी नगरी म्हणुन आणि जर या शहरामध्ये कष्टक-यांची अवहेलना होत असेल तर त्यांचा सन्मान ठेवला जात नसेल जे कामगार आणि कष्टकरी आपल्या शहराचं नाव उंचावतात त्यांची आपण अवहेलना करत आहोत. लॉकडाऊन काळात पिंपरी चिंचवड महानगरपालिका आर्थीक दुर्बल घटकातील लोकांना तातडीची मदत म्हणुन तीन हजार रुपये द्यावेत अशा प्रकारचा ठराव ३० एप्रिल २१ च्या विशेष महापालिका सभेत मंजुर करणेत आला. शहरातील रिक्षाचालक,परवानाधारक फेरीवाले,नोंदणीकृत घरेलु कामगार,गटई कामगार,नाभीक,शालेय विद्यार्थी वाहतुक करणारे चालक व जीम ट्रेनर इ.नां आपण तीन हजार रुपये तातडीची मदत कोरोनाच्या महासंकटामध्ये देण्यासाठी स्थायी समितीने मंजुरी दिली,मा.महापालिका सभेने मंजुरी दिली १५ एप्रिल २१ रोजी या शहराचे नेते मा.आमदार लक्ष्मणभाऊ जगताप यांनी स्थायी समितीला पत्र देवुन सांगितले होते आणि या विषयाला मंजुरी दिली त्यानंतर महापालिकेने मंजुरी दिली आणि महापालिका सभेमध्ये विषय मंजुर होत असेल तर या सभागृहाचा अपमान नाही का, जर या सभागृहाने विषय मंजुर केला असेल तर त्याची अंमलबजावणी व्हायलाच पाहिजे. यापुर्वी आपण दिव्यांगाना तीन हजार रुपये देण्याचा विषय मंजुर केलेला आहे. आता फक्त आयुक्त बदलले आहेत मग आयुक्त बदलले की नियम बदलतात का, दिव्यांगाना आपण मदत करतो तर ही पण मदत तातडीने मिळालीच पाहिजे. मी असे ऐकलेले आहे की,आयएएस अधिकारी हे पद आपल्या देशातील सर्वोच्च असं पद आहे. आणि यांना ट्रेनिंग मध्ये शपथ दिली जाते किंवा त्यांच्याकडनं वदवून घेतले जाते की, मी समाजाच्या प्रत्येक भागाची मी सेवा करीन आणि प्रत्येक नागरीकांना सन्मानाने वागणुक देईन तसेच माझ्या शहरातील प्रत्येक कष्टक-यांना सध्या महामारीच्या काळामध्ये तीन हजार रुपयांची मदत मिळावी अशी मी अपेक्षा व्यक्त करतो.

**मा.योगेश बहल -** मा.महापौर साहेब,मा.आयुक्त साहेब,सन्मा.सभागृह मा.महापौर साहेब,ज्यावेळेला हा ठराव भारतीय जनता पार्टीच्या वतीने सभागृहात मांडण्यात आला होता त्यावेळेला त्याला कोणीही विरोध केलेला नाही. आणि आमच्या कोणाच्याही मनामध्ये शंका कु शंका नाही किंवा कोणी असे वाटून पण घेवु नये की,आम्ही बोलतोय एक आणि करतोय एक असं नाही माझी उलट अशी विनंती आहे की,आपण आयुक्तांनाच विचारावं की,आपण अशा प्रकारे ठराव केल्यानंतर आपल्याला हे देण्यामध्ये काही अडचण आहे का? त्याला कायद्यामध्ये पुरेशी प्रोव्हीजन आहे का, कारण आपत्ती व्यवस्थापनाखाली महाराष्ट्र शासनाने जिल्हयासाठी सर्व अधिकार दिलेले असतात. ते अधिकार आपल्या विभागीय अधिका-यांना दिलेले आहेत.

आणि विभागीय आयुक्त हे अध्यक्ष आहेत त्यामुळे अशा प्रकारच्या आपत्ती व्यवस्थापनामध्ये कोणत्या कलमाखाली असे पैसे देता येतात का, आणि देता येत असतील तर मग का दिले गेले नाहीत, का दिले जात नाहीत  हे आपणही आयुक्तांना विचारावे आम्ही पण विचारतो. आणि दुसरी बाब म्हणजे मा.महापौर आपण या महापालिकेमध्ये अनेक वर्ष आहात आपल्या शहरामध्ये पूर आला,काही ठिकाणी आग लागली काही ठिकाणी प्रचंड नुकसान झालं परंतु आपल्याला आठवत असेल की, आपण त्यांना काही भांडी,कपडे अशा स्वरुपात आपण मदत केलेली आहे. आर्थीक स्वरुपामध्ये आपण आजपर्यंत तरी मला आठवत नाही की, आर्थीक स्वरुपामध्ये आपण गोरगरीबांना मदत केलेली नाही. पण माझी अशी विनंती आहे की, आरोप प्रत्यारोप करण्यापेक्षा या सभागृहातील कोणत्याही सन्मा.सदस्यांना असे वाटत नाही की, या गोरगरीबांना आर्थीक मदत मिळू नये आणि कोणाचीही इच्छा नाही. आपणही आयुक्तांवर बेछुट आरोप करण्यामध्ये  त्यांचा अपमान करण्यामध्ये काही  अर्थ नाही. कायदेशिर त्यांची काय अडचण आहे ती पण आपण समजुन घेतली पाहिजे. आणि त्यातनं जर काही मार्ग निघत असेल तर निश्चितपणे त्यातनं मार्ग काढावा आणि या लोकांना मदत द्यावी. अशी मी पण विनंती करतो. धन्यवाद.

**मा.हर्षल ढोरे -** मा.महापौर साहेब,मा.आयुक्त साहेब,सन्मा.सभागृह  खरंतर आपल्या शहरावरतीच नव्हे तर संपुर्ण देशामध्ये कोरोनाचं संकट ओढवलेलं आहे. आणि या संकटापासून कोणीही वाचलेले नाही. पहिल्यांदाच अशी मोठी महामारी आलेली आहे. आणि याच्यामध्ये प्रचंड असं सर्वांच नुकसान झालेलं आहे. याच्यामध्ये अनेक जणांच्या नोक-या गेलेल्या आहेत,अनेक जण बेघर झालेले आहेत. आपण एप्रिल मध्ये जो ठराव केला होता त्यावेळेस मला मनापासून आनंद झाला होता आणि हा ठराव सर्वांच्या संमतीने मंजुर झालेला होता. पण नंतर अशी  काय मोठी अडचण आली की, त्यांना आपण मदत करु शकलो नाही. जनरल बॉडीमध्ये ठराव मंजुर झाल्यानंतर सुध्दा या लोकांना आर्थीक मदत करु शकलो नाही हा या सभागृहाचा अपमान तर आहेच पण माई,आपला आणि या पिंपरी चिंचवड शहरातील नागरीकांचा अपमान आहे. यापुर्वी आपण अशी आर्थीक मदत कॅशच्या स्वरुपात दिलेली नाही हे बरोबर असेल पण आता अशी परिस्थिती आहे की, जे धुणी भांडी करणा-या  महिला आहेत त्यांना आता घरामध्ये कोण घेत नाही,स्वंयपाक करणा-यांना घरामध्ये घेत नाहीत त्यामुळे त्यांची आता खायची अक्षरशा मारामार आहे. आणि त्यांच्यासाठी आपण तीन हजार रुपये डिक्लेअर केले आहेत. आणि सकाळी,सकाळीच ९ ते ९.३० वाजता आमच्या ऑफिसमध्ये महिला आल्या आणि म्हणाल्या की,भाऊ ते तीन हजार रुपये जाहीर केले आहेत त्याचा फॉर्म कुठं आहे,फॉर्म आणुन

द्या आम्हांला ते पैसे पाहिजेत. माई, हा अनुभव तुम्हांला सुध्दा आलेला असेल सगळयांच्या ऑफिसमध्ये हे लोक येत होते. पिंपरी चिंचवड महापालिका ही श्रीमंत महापालिका म्हणुन ओळखली जाते. आताच राहूल दादांनी सांगितले की,आर्थीक दुर्बल घटकातील लोकांची संख्या ही ४० हजार आहे आणि त्यांना मदत करण्यासाठी आपल्याला आर्थीक ताण आला असता का? याचगोरगरीबांनीटॅक्स दिला नाही तर आपण आपले माणसं त्यांच्याकडे वसुलीसाठी पाठवतो. मग अशी काय अडचण आली की,त्यांनाआपण तीन हजार रुपये देवु शकलो नाही. आयुक्तांना काही टेक्नीकल अडचण आहे का याचा खुलासा सभागृहाला द्यावाच लागणार आहे. स्थायी समितीमध्ये ठराव करुन सुध्दा तुम्ही तो रद्य केला. ज्या रिक्षावाल्यांचा धंदा रोज हजार दिड हजार रुपयांवर त्यांच घर चालायचं त्या रिक्षा चालकांचा संपुर्ण धंदा बंद झाला आहे त्यांना आपण पैसे देवु शकत नाही. तर लोक आम्हांला नालायक म्हणतील पैसे देण्याचं आपण डिक्लेअर केलेलं होतं आणि नंतर तुम्हांला काय अडचण आली की तुम्ही ते रद्य केलं. माझी तुम्हांला विनंती आहे की, याच्यावर तुम्ही १००टक्के चांगला निर्णय घ्या याच्यामध्ये या सभागृहाचा अपमान नसून संपुर्ण शहराचा अपमान आहे. सभागृहाला माझी विनंती आहे की,हे तीन हजार रुपये या लोकांना दिलेच पाहिजे नाही तर आपल्याला रस्त्यावर उतरावे लागेल. धन्यवाद.

**मा.ज्ञानदेव थोरात -** मा.महापौर साहेब,मा.आयुक्त साहेब,सन्मा.सभागृह आयुक्त साहेब,खरं पाहिलं तर हा निर्णय ऐतिहासिक असा होता. पिंपरी चिंचवड शहर हे कामगार नगरी म्हणुन आहे आणि या महाराष्ट्रातील एकमेव भूषण असे हे पिंपरी चिंचवड महापालिका आहे. आणि ख-या अर्थाने याठिकाणी देशाच्या कानाकोप-यातून वर्ग आलेला असतो. नोकरी,व्यवसाय,उद्योग यानिमीत्ताने आलेला असतो. याठिकाणी गोरगरीब असल्याशिवाय तुमचे उद्योग सुध्दा चालत नाहीत. आणि त्यांच्यावर आलेली ही आपत्ती आहे.राहूलदादांनी सांगितले आहे की, आपल्या शहरात अशी ४० हजार लोकं आहेत आणि ही लोकं पिंपरी चिंचवड मधील आहेत. मागे आपण दिव्यांगासाठी महिना दोन हजार रुपये चालू केले. त्यांच्यासाठी आपण काही अटी लावलेल्या होत्या तो याठिकाणचा तीन वर्षापुर्वीचा रहिवासी असावा, त्याचं ४० टक्के अपंगत्व असावं असे काही नियम आहेत. त्याप्रमाणे आपण काही तरी नियम टाकुन हा विषय मंजुर करायला पाहिजे होता. आणि याच्या आधी आपण महापालिकेमध्ये असे काही विषय चालतात की,त्या विषयाला हेडींग देता येत नाहीत,नांव देता येत नाहीत तरी आपण त्यांना सर्व निधी पुरवतो नां, मग या गोरगरीबांसाठीच नियम का, याठिकाणी निवडुन आलेला आमदार,खासदार,नगरसेवक हा निवडुन आल्यावर तो कोणत्याही

पक्षाचा रहात नाही तर तो त्या नागरीकांचा असतो. ज्यांनी त्यांना निवडुन दिलं आहे तो त्या जनतेचा असतो. आणि त्यांना सर्वाची कामे करावी लागतात. ते असं म्हणत नाहीत की, त्यांनी आपल्याला मतदान केलं नाही. इथं पक्षाचा लवलेश कुठंही नाही. आमच्या माई या महापौर आहेत त्या या शहराच्या प्रथम नागरीक आहेत. आणि त्यांनी घेतलेला निर्णय हा ऐतिहासिक होता. आणि हा निर्णय गोरगरीबांच्या कल्याणासाठी होता. त्यांनी कुठला पक्ष म्हणुन निर्णय घेतलेला नव्हता. सर्व सदस्यांनी मिळुन हा निर्णय घेतलेला होता. याच्यावर तुम्हांला अभ्यास करता आला नाही का, यापुर्वी आपण मदत केली आहे याच्यामध्ये तुम्ही फक्त नांव चेंज करा नां, आणि या गोरगरीबांना आपल्याला मदत करायची आहे. बरं याच्यामध्ये कुठल्याही जातीपातीचा किंवा धर्माचा विषय नाही. जो गरीब आहे छोटा-मोठा व्यवसाय करतो त्यालाच हे पैसे द्यायचे आहेत. त्याची रोजीरोटी बंद पडली आहे ज्यांच्याकडे स्कुल बस आहेत ती लोक अक्षरशा दुसरीकडे ड्रायव्हर म्हणुन चार ते पाच हजार रुपयांवर काम करतात. एवढी वाईट अवस्था आहे या रिक्षावाल्यांची आणि या गाडयावाल्यांची आणि आपण मानवतेच्या दृष्टीकोनातून यांचा विचार करावा. आणि त्याच नांव चेंज करा आणि या गोरगरीबांना मदत करा आणि आयुक्त साहेब,तुम्ही हा निर्णय घेतला तर तो ऐतिहासिक निर्णय होईल. आणि या पिंपरी चिंचवड शहराचं नांव जगातील सर्व कानाकोप-यामध्ये जाईल कारण याठिकाणी भारताच्या कानाकोप-यातून याठिकाणी आलेला नागरीक आहे. तरी याचा मानवतेच्या दृष्टीकोनातून विचार करावा आणि या गोरगरीबांना आर्थीक मदत करावी अशी विनंती करतो.

**मा.शारदा सोनवणे -** मा.महापौर साहेब,मा.आयुक्त साहेब,सन्मा.सभागृह खरंतर अंबरनाथ भाऊ आणि ब-याच जणांनी हा तीन हजार रुपये देण्याचा विषय घेतलेला आहे. महानगरपालिकेच्या सभागृहात हा विषय मंजुर झालेला असताना तुम्ही तीन हजार रुपये का देत नाहीत. रोज सकाळी उठल्यानंतर १०/१५ लोक आमच्या ऑफिसमध्ये येऊन उभे रहातात. आणि म्हणतात की,तीन हजार रुपये मिळण्याचे फॉर्म आम्हांला कधी मिळणार आहेत. आम्ही त्यांना काय उत्तर देणार मागची जी कोरोनाची लाट आली त्यावेळेला प्रत्येक नगरसेवकांनी अन्नधान्यचं वाटप केलं पण आम्ही तरी किती मदत करणार आहे. महापालिकेने या लोकांना तीन हजार रुपये देण्याचा ठराव केला होता त्यांना आर्थीक मदत करण्याची जबाबदारी ही महापालिकेची आहे. सलुनवाले,जिमवाले,घरकाम करणा-या महिला असतील त्यांना ही मदत खुपच महत्वाची होती. याच्यामध्ये पंधराशे रुपये देण्याचे फॉर्म आलेले होते मग हे तीन हजार रुपये देणार नाही का, याच्यामध्ये काही राजकारण होत आहे का याचा खुलासा करावा. त्याचप्रमाणे निगडी-प्राधिकरणाचं विलीनीकरण हे पीएमआरडीए मध्ये झालेलं आहे त्याचा मी

याठिकाणी निषेध करते. तसेच मला महिला बालकल्याण मधील कोर्सेसच्या संबंधीत मला माहिती हवी होती. माझ्या माहितीप्रमाणे महिला बालकल्याणच्या कोर्सेची लिस्ट आलेली आहे. कोर्सेस येण्याच्या आधीच काही महिलांच्या फाईली रेडी असतात आपण महिला बालकल्याणच्या मार्फत जे कोर्सेस घेतो याचा उद्देश एवढाच असतो की, प्रत्येक महिलेला कोर्सेस शिकुन रोजगार मिळावा. काही ठराविक महिलांनाच त्याचं उत्पन्न मिळावं मी ब-याच कोर्सेससाठी विचारलं की,याला काय सर्टीफिकेट लागतात तर रुपाली नावाच्या मॅडम आहेत त्या म्हणतात की,स्पोकन इंग्लिशसाठी तुमचं डिग्री सर्टीफिकेट लागेल आणि नगरसेवकांच शिफारस पत्र लागेल. ब-याचशा कोर्सेसला नगरसेवकांची शिफारस पत्र लागतील. आम्ही नगरसेवक झालो म्हणजे आमच्याकडे सगळया डिग-या आल्या का, तर याच्यामध्ये बरेचसे कोर्सेस आहेत ज्याच्यामध्ये डिजीटल साक्षरता आहे, सेंद्रीय खते आहेत....

**मा.महापौर -** विषय जो चालू आहे त्याच्यावर चर्चा करा.

**मा.शारदा सोनवणे –**ठिक आहे धन्यवाद.

**मा.विकास डोळस -** मा.महापौर साहेब,मा.आयुक्त साहेब,सन्मा.सभागृह माई, आताच राहूलदादांनी आर्थीक दुर्बल घटकांना मदत करण्याचा जो विषय याठिकाणी मांडला आहे. हा विषय स्थायी समितीने मंजुर केला होता. माई,सध्या आपल्यामध्ये आणि प्रशासनाच्या वागण्यामध्ये विसंगती दिसते आहे. म्हणजे मी २/३ उदाहरणे आपल्याला दाखवून देतो की, ही विसंगती कशा पध्दतीने आहे. सध्या आपलं प्रशासन आणि आपण काही तरी हेतू ठेवुन काम करत आहे हे उदाहरणासगट मीआपल्याला दाखवून देतो. आज जो दुर्बल घटकांना मदत करण्याचा प्रश्न आहे वास्तविक पहाता हे नागरीक आपल्या पिंपरी चिंचवडचे नागरीक आहेत प्रत्येकजण संकटात आहे आणि आपली नैतिकता आहे की,त्यांना मदत करायची आहे आणि नैतिकतेच्या आधारावरती आपल्या महापालिकेच्या अधिनियमामध्ये कोणत्या चौकटीत बसवायचं ते आपण बसवु शकतो.जसं नवी मुंबई महापालिकेने तिकडच्या विद्यार्थ्यांना ऑनलाईन शिक्षणासाठी केलं आहे. ते कोणत्या पध्दतीने दिले असतील त्याचा अभ्यास करुन किंवा आपल्याला कोणत्या पध्दतीने करता येईल प्रसंगी जर शासनाला पाठवावं लागलं तर तो शासनाकडे पाठवून तो विषय करायला पाहिजे होता. पण तो थांबवायचा नव्हता. पाठीमागे आपण याच सभागृहामध्ये तुळापुरसाठी छत्रपती संभाजी महाराजांच्या बलिदान दिनासाठी एक धोरण ठरवून या सभागृहामध्ये विषय मंजुर केला होता पहिल्यांदा पाच लाख रुपये देण्याचा विषय मंजुर केला होता त्यानंतर आपण तीन लाख रुपये देण्याचा विषय मंजुर केला

कारण आपल्या अधिकार कक्षामध्ये त्या डेटच्या आधी देता यावे म्हणुन आपण दोन लाख नव्याण्णव लाख रुपये देण्याचा ठराव केला होता. त्यानंतर मी स्वत: क्रीडा विभागात जाऊन ती फाईल मी स्वत: वर आणल्या नंतर असं लक्षात आलं की, ती नागरवस्ती वरचं थांबवायच आहे. वास्तविक पहाता तो विषय या सभागृहात मंजुर झालेला आहे. त्याची अंमलबजावणी करण्याचं काम हे प्रशासनाचं आहे. पणप्रशासन त्यांच्या फायद्याचे जर विषय असतील तर त्याच्यामध्ये जास्त लक्ष घालतयं आणि नागरवस्ती मध्ये मुद्दा असा निर्माण झाला आहे की,हे पैसे आपल्याला कोणत्या चौकटीमध्ये देता येतील आणि तो विषय तसाच राहिला. आज छत्रपती संभाजी महाराजांचा विषय मंजुर केला आहे त्याची प्रशासनाने गांर्भीयाने दखल घेवुन लवकरात लवकर त्या ग्रामपंचायतीला मदत कशी करता येईल हे काम करायला पाहिजे होतं. ती फाईल अजुन कोणीही हलवली नाही तशीच पेंडींग आहे. त्याच्यानंतर दुसरी लाट आली त्याच्यामुळे आपणही दुर्लक्ष केलं आहे. तरी माई, आपण प्रशासनाला आदेश देण्यात यावे की, तुळापुर ग्रामपंचायतला हे पैसे लवकरात लवकर देण्यात यावे. आज आपण काही तरी कारण सांगुन दुर्बल घटकातील नागरीकांना पैसे देण्याचे नाकारत असाल तर महापौरांनी आपल्याला ९० दिवसापूर्वी आदेश दिले होते की, स्पर्शच्या बाबतचा अहवाल आमच्यापुढे १० दिवसात मांडा तो अहवाल आपण आजपर्यंत सभागृहात का ठेवला नाही. याठिकाणी महापौरांच्या आदेशाचे उल्लंघन होत नाही का, दरवेळेस आपण आपल्या हिताची कामे करायची आणि लोकांच्या हिताची कामे असतील तर त्याला कायद्याची चौकट दाखवायची. तसेच राजाभाऊच्या प्रभागातील एक विषय आहे. राजाभाऊंच्या प्रभागात पाण्याची कमतरता होती म्हणुन प्रभाग क्रमांक ८ मध्ये पाण्याची टाकी मंजुर केली दि.९/१०/२०२० रोजी ठेकेदारास वर्कऑर्डर पण दिली आणि दोन महिने झाले काम पण चालू झालं आणि दोन महिन्यानंतर इकडचं काय राजकारण असेल ते असेल आणि काम बंद ठेवलं हे एखादया पाण्याच्या टाकीचं काम हे लोकांच्यासाठी असतं काम काढण्याच्या आधी सगळी प्रक्रीया झालेली असते त्याच्यामध्ये ज्या टेक्नीकल प्रॉब्लेम असतात ते बघितले जातात,बिल्डींगची प्रक्रिया झालेली असते आणि मग काम दिलं जातं आणि मग काम जर थांबवायचं होतं तर या गोष्टींची आपण चाचपणी केली नव्हती का, हे काम का थांबलं म्हणुन आमचे राजेंद्र लांडगे यांनी प्रशासनाला प्रश्न विचारला तर लेखी स्वरुपात प्रशासनाने त्यांना जे उत्तर दिलं आहे ते मी या सभागृहात वाचून दाखवतो. उपरोक्त विषयानुसार, मौजे इंद्रायणीनगर मधील सेक्टर १ प्लॉट नं.४ येथील पाण्याचे उंच टाकी बांधण्याचे काम मा.उपमुख्यमंत्री,महाराष्ट्र राज्य व मा.आयुक्त,पिंपरी चिंचवड महानगरपालिका यांचे समवेत विधानभवन पुणे येथे झालेल्या उच्चस्तरीय बैठकीनंतर

तुर्तास सदर काम बंद ठेवणेबाबत दिलेल्या सूचनांनुसार सद्यस्थितीत सदरचे काम बंद ठेवण्यात आलेले आहे. आयुक्त साहेब, तो काही जुगाराचा आड्डा आहे का? लोकांच्या पाण्याचा प्रश्न सुटावा म्हणुन पोटतिडकीने आमच्या नगरसेवकांनी ते काम मंजुर करुन घेतलं त्याने काम चालू केलं आणि मग अशी कोणती गोष्ट तुमच्या निदर्शनास आली की,हे काम बंद करण्याची सूचना उपमुख्यमंत्र्याकडुन आपल्याला आली आहे.आणि ते काम बंद केलं आहे. माई, मी आपल्याला विनंती करतो की,याचा खुलासा मा.आयुक्तांनी करावा. आणि त्यानंतर पुन्हा एकदा मला बोलण्याची संधी देण्यात यावी.

**मा.झामाबाई बारणे -** मा.महापौर साहेब,मा.आयुक्त साहेब,सन्मा.सभागृह आता जो दुर्बल घटकातील नागरीकांना तीन हजार रुपये आर्थीक मदत देण्याचा विषय पोटतिडकीने मांडलेला आहे. प्रत्येकाच्या वॉर्डामध्ये जे गोरगरीब नागरीक आहेत आणि या नागरीकांना आतापर्यंत सर्व नगरसेवकांनी मदत केलेली आहे. त्यामध्ये अन्नधान्याच्या स्वरुपात किंवा रेशनिंगच्या स्वरुपात असेल ती केलेलीआहे. मागच्या लॉकडाऊनमध्ये सर्व नगरसेवकांनी भरपूर मदत केलेली आहे. आणि आता पण जे गरीब आहेत त्यांना आपल्या हातामध्ये जे काही आहे ते आपण मदत करीत आहोत. आर्थीक मदत देण्याचा विषय स्थायी समितीमध्ये आणि सभागृहामध्ये मंजुर झाला त्यानंतर पेपरमध्ये बातम्या आल्या आणि त्या नगरसेवकांच्या अपेक्षा असतात की आपल्या नगरसेवकांकडुन आपल्याला महापालिकेच्या वतीने मदत मिळणार आहे. प्रत्येकाच्या वॉर्डामध्ये अनेकांनी फॉर्म भरलेले आहेत. आणि त्यांना अपेक्षा होती की,आपल्याला महापालिकेकडुन तीन हजार रुपये मिळणार आहेत. रिक्षा चालकांची तर अशी परिस्थिती आहे की,त्यांच कुटूंब असं आहे की,त्यांच रोजीरोटी त्याच्यावरच असते. ज्या महिला धुण्या-भांडीची कामं करतात त्यांना सुध्दा आता येऊ देत नाहीत. यामुळे त्या महिलांचे पण खुप हाल होत आहेत. त्यांची खायची पंचाईत झाली आहे. सगळया नगरसेवकांना माहिती आहे की,कोणाची परिस्थिती कशी आहे. आणि नगरसेवक तरी किती मदत देणार पहिला लॉकडाऊन झाला,दुसरा लॉकडाऊन झाला आता तिसरा लॉकडाऊन आला आहे. मग आता प्रत्येक नगरसेवकांनी काय करायचं आपली महापालिका ही श्रीमंत आहे, नावाजलेली आहे, कष्टक-याची आहे. आणि हे कष्टकरी आपल्या शहरातील आहेत ते आपले मतदार आहेत. मा. लक्ष्मणभाऊ जगताप,मा.महेशदादा यांनी पण या कष्टक-यांना मदत करण्यास सांगितलेले आहे. आणि आयुक्त साहेब, ही आर्थीक मदत करण्यासाठी याचे नांव बदलून जर काही मदत करता आली तर ती करावी. आणि या गोरगरीबांचा आपल्याला पण आर्शीवाद मिळेल अशी मी आपल्याला विनंती करते.

**मा.नितीन काळजे -**मा.महापौर साहेब,मा.आयुक्त साहेब,सन्मा.सभागृह मा.महापौर साहेब,आपण एप्रिलमध्ये शहरातील सर्व व्यवसायिक असतील,रिक्षा चालक असतील यांना आपण तीन हजार रुपये मदत करण्याचं ठरवलं होतं. आणि त्यानुसार आपल्या सभागृहामध्ये सर्वानुमते विषय मंजुर केला आणि तो महापौरांनीही तो मंजुर केला. आणि आयुक्तांकडे तो ठराव अंमलबजावणीसाठी पाठवला परंतु त्यावरती आयुक्तांनी निर्णय घेतला नाही. तसं पाहिलं तर माई मी तुम्हांला म्हणलं होतं की,याची घोषणा करण्यापुर्वी तुम्ही आयुक्तांशी चर्चा केली होती त्यानंतर आयुक्त म्हणले की,मला शासनाकडुन मंजुरी घेतल्यानंतर देता येईल त्यानंतर आपण परत मिटींग घेतली त्यावेळेस सांगितले की,हे मंजुर करुन घेऊ या आणि गेल्या वर्षीच्या ठरावाची तुम्ही अंमलबजावणी करा त्यांनी सांगितलं की,मी दोन/तीन दिवसांनी पहातो. माई,मी त्याचवेळेस आपल्याला सांगितलं होतं की,यांची मानसिकता नाही आणि त्यांना मदत करण्याची इच्छा नाही. आयुक्त साहेब,या शहरामध्ये थोडे उशिरा आले आहेत.पण पहिल्यांदा ज्यावेळेस आपल्या शहरामध्ये लाट आली त्यावेळेस आपल्या शहरामध्ये काय परिस्थिती होती. त्यावेळेस आपल्या सर्व नगरसेवकांनी आपल्या स्वत:च्या खर्चानी संपुर्ण शहरामध्ये चांगल्या प्रकारे काम केलं जेवढी मदत करता येईल तेवढी स्वत: मदत केलेली आहे. कुठल्याही नागरीकाला काही मदत लागली तर तो प्रशासनाकडे जात नाही तो आपल्या नगरसेवकांकडे येतो. माई,प्रशासनाची काही मानसिकता दिसत नाही. माझं म्हणणं आहे की, सर्वपक्षीय सदस्यांना घेवुन प्रशासनाबरोबर चर्चा करावी अशी मी विनंती करतो.

**मा.उषा मुंढे -** मा.महापौर साहेब,मा.आयुक्त साहेब,सन्मा.सभागृह आता जो विषय चालला आहे आर्थीक दुर्बल घटकांना मदत करणे. माझा एक प्रश्न आहे आर्थीक दुर्बल घटकातील नागरीकांना परंतु आता हे दुस-यांदा लॉकडाऊन झालं त्यामध्ये जे गोरगरीब महिला आहेत यामध्ये धुणीभांडी करणा-या महिला असतील, सलुनवाले असतील,जिमवाले असतील या लोकांना घरातील उदरनिर्वाह करण्यासाठी आर्थीक उत्पन्न काही नाही ज्या लोकांना खरचं गरज आहे त्या लोकांसाठी आपण हा निर्णय घेतलेला होता.परंतु कमिशनर साहेब, हा प्रस्ताव विभागीय आयुक्तांकडे पाठविला. आयुक्त साहेब, तुमच्याकडे महाराष्ट्र शासनाचं पत्र होतं महाराष्ट्र शासनामार्फत छोटया व्यवसायिकांना प्रत्येकी दिड हजार रुपयांचा लाभ देणे जाहीर केले असुन त्याच कारणासाठी मनपाकडुन तीन हजार रुपये आर्थीक सहाय्य देणेबाबत एकाच लाभार्थ्यांना दोनदा आर्थीक लाभ मिळणार असल्याचे परंतु केद्रशासन आणि राज्य शासनाच्या व स्थानिक स्वराज्य संस्थांच्या योजनांमधील लाभार्थी एकच व्यक्ती उदाहरण शेतक-यांना

पिक शेती नुकसान भरपाई अशा अनेक योजना राज्य व केंद्र सरकार करतं. त्यावेळेस आपण त्यांना ती आर्थीक मदत म्हणुन केली जाते. तशीच मदत  पिंपरी चिंचवड महानगरपालिका ही एक नावाजलेली महापालिका असताना आपण या आर्थीक दुर्बल घटकातील नागरीकांना मदत का करु शकत नाही. आणि मदत करताना त्याच्यामध्ये अटी/शर्ती पण टाकणार होतो. जे नागरीक पिंपरी चिंचवड महापालिकेच्या हद्दीमध्ये रहातात अशाच नागरीकांना त्याचा लाभ मिळावा. या अटी आपण त्याच्यामध्ये टाकणार होतो. परंतु तुम्ही असं काही न करता त्या नागरीकांना त्यापासून वंचित ठेवलं आणि आता सन्मा.सदस्य बहल साहेबांनी म्हणले की,गेल्या तीस वर्षामध्ये आपण कुठल्याही नागरीकांच्या खात्यामध्ये थेट आर्थीक मदत केलेली नाही. मग माझा एक प्रश्न आहे की,आता खावटी योजना असेल, ती डायरेक्ट खात्यामध्ये दिली होती. महिला बचत गटाचं अनुदान असेल, ते डायरेक्ट खात्यामध्ये जमा होतं, विधवा महिलांना आर्थीक मदत त्यांच्या डायरेक्ट खात्यामध्ये जमा होतं,शिष्यवृत्ती ही डायरेक्ट खात्यामध्ये जमा होते. शिवणक्लास झालेल्या महिलांना आपण मशिन देत होतो सायकल देत होतो ते बंद करुन आपण त्यांच्या खात्यामध्ये डायरेक्ट रक्कम करतो. असं असताना  कमिशनर साहेबांनी आर्थीक दुर्बल घटकांना आर्थीक मदत मिळण्यापासून वंचित का ठेवलं याची आपण माहिती द्यावी. आपण स्थानिक स्वराज्य संस्थेचे नगरसेवक स्थायी समिती व सर्वसाधारण सभेच्या वतीने अधिका-यांना एक आवाहन देऊन संविधानाने त्यांना दिलेले अधिकारावर घाला घालून आर्थीक दुर्बल घटकातील नागरीकांना अनुदान देण्यापासून जाणीवपुर्वक वंचित ठेवत असलेने शहरातील आर्थीक दुर्बल घटकातील नागरीक कमिशनर साहेब, तुम्हांला कधीही माफ करणार नाही.आणि माई,कमिशनर साहेबांना खुलासा करायला सांगावा की,असा कुठला कायदा आहे की, या नागरीकांना मदत करण्यापासून वंचित ठेवलं आहे. दुसरं म्हणजे शासन जर त्या लोकांना दिड हजार रुपये देत असेल तर मनपाने दिड हजार रुपये द्यावेत असं कमिशनर साहेब तुम्हांला सांगितलं होतं. तरी तुम्ही याचा खुलासा करावा.

**मा.भाऊसाहेब भोईर  -** मा.महापौर साहेब,मा.आयुक्त साहेब,सन्मा.सभागृह  खरंतर हा विषय पाच मिनिटात संपण्यासारखा आहे. भावना आणि कायदा या गोष्टी विभिन्न असतात ज्यावेळेस एखादा विषय सर्वांनुमते मंजुर होतो त्यावेळेस तो कोणत्या पक्षाचा निर्णय नसतो तो सर्व नगरसदस्यांचा विषय असतो. याच्यामागे कोण आहे का? राजकारण आहे का?  हे आपण बोलण्यातूनच संशय निर्माण करतो आणि संशयाची सुई आमच्याकडे वळवली जाते. कारण तुम्ही सत्ताधारी आहात. असं काही नाही, स्थानिक पातळीवरचं म्हणत नाही पण राज्य पातळीवरचे कोणतेच नेते इतके चिल्लर नसतात ते मतांच्या राजकारणातुन आपली वाटचाल

करीत असतात एवढयाशा विषयावरुन कोणाचं कार्यक्रम होत नसतं पैलवान हे शहर कामगार नगरी,कष्टक-याचं आहे असे जे आपण शब्दप्रयोग आपण करतो नां हे शब्द अण्णासाहेब मगर यांनी निर्माण केलेले आहेत. नंतर रामकृष्ण मोरे, नंतर डॉ.श्री.श्री.घारे,नंतर अजितदादा पवार एवढं करुन सुध्दा आमचा कार्यक्रम झाला नां, हा कार्यक्रम नाही, तुम्ही विषयाला भावनात्मक दर्जा देवुन याच्या मागं राजकारण करण्याचा नेमका कुणाचा प्रयत्न आहे. हे सुध्दा आत्मचिंतन बोलणा-यांनी करावं. मी माईंना एकच विनंती करतो की,हा विषय कोणत्या वॉर्डातील नाही, साधा प्रश्न आहे की,आयुक्तांनी उठून उभं राहून खुलासा करावा कारण आपण गेली साडेचार वर्ष आपण आपल्या मनाप्रमाणं,सोयीप्रमाणे पाहिजे त्या अटी/शर्ती सगळं रद्य करुन काय,काय,काय करायचं ते सगळं झालेलं आहे आपलं मग एक काम झालं नाही म्हणुन आपण प्रशासनावर आरोप करता. गेल्या २५ वर्षात मी प्रशासनाची कधीच बाजु घेतलेली नाही. आयुक्त चुकीचं करत असतील तर आपण सर्वजण एकत्र येऊन लढू. पण आपणच बोलायचं आणि राजकारण करायचं आणि निवडणुका आल्यामुळे आम्हांलाही समजतं आणि मग आम्ही उत्तर देणार आणि तुमच्या शंकेचं समाधान आम्हीच करणार नां, कारण आम्ही सभागृहात बसलेलो आहोत. जसं तुम्ही तुमच्या धर्माचं पालन करता तसं आम्ही आमच्या धर्माचं पालन करतो. साधा प्रश्न आहे माई,याला शाब्दीक,राजकीय वळण न लावता आयुक्तांनी याचा खुलासा करावा.देता येत नसेल तरकसंदेतायेईल त्याच्यामध्ये काही अडचण आहे का,याला शासनाची काही मदत घेता येईल का, त्याच्यासाठी आम्ही आहोत तेंव्हा याच्यावर विस्तारपूर्वक परत आम्हांला बोलावं लागतं परत कोणीतरी बोलतं, कोणाचंतरी नांव घेतं आमच्याकडंतर खुप नांव आहेत, कोणी, कोणी काय केलंपणही त्यासाठी जागा आहेका? हे सभागृह या शहराच्या प्रगतीसाठी आणि शहरावर आलेल्या अडचणीवर मात करण्यासाठी हे सभागृह आहे. हा काही राजकीय अड्डा नाही. राजकीय अड्डयासाठी आपण बाहेर स्टेज टाकुन त्यामध्ये राजकीय आरोप,प्रत्यारोप करु मी मा.महापौरांना विनंती करतो की, विषय भरकटत जाऊ नये आयुक्तांनी ही आर्थीक मदत देता येईल  किंवा नाही हे दोन ओळीत सांगावं. आयुक्त हे कोणत्या पक्षाचे नसतात मागे आम्ही कधी म्हणलं का, मागच्या आयुक्तांनी तुम्ही म्हणलं ते त्यांनी केलं मग आम्ही म्हणलं का ते बीजेपीचे होते. त्यामुळे तुम्ही हे असं काही करु नका अशी मी विनंती करतो. आणि माई,आयुक्तांनी खुलासा करावा की,ही रक्कम देता येणार आहे किंवा नाही आणि देता येत नसेल तर त्याच्यावर आपण सर्वजण विचार करु.

**मा.केशव घोळवे -** मा.महापौर साहेब,मा.आयुक्त साहेब,सन्मा.सभागृह  कोरोनासारख्या या वैश्वीक महामारीमध्ये संपुर्ण देशच नाही तर सगळं जग होरपळून गेलेलं आहे. आणि या

पार्श्वभूमीमध्ये आपल्या पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या माध्यमामधुन स्थायी समितीच्या वतीने आपल्या सभागृहाच्या वतीनं या शहरातील शोषित,पिडीत,वंचित घटकासाठी, गोरगरीबांसाठी एक चांगला महत्वपुर्ण निर्णय घेतला त्यामध्ये रिक्षाचालक असतील,घरेलु कामगार असतील, इमारत बांधकाम मजुर असतील, गटई कामगार असतील,नाभीक बांधव असतील खरोखरचं तो निर्णय ऐकल्यानंतर या शहरातील गोरगरीबांना, कष्टक-यांना खुप मोठा आनंद झाला या वाईट काळामध्ये महानगरपालिकेच्या वतीने एक दिलासा याठिकाणी मिळालेला आहे. आणि हे सभागृह गोरगरीबांच्या पाठीशी खंबीरपणे उभं राहिलेलं आहे. परंतु प्रत्यक्षात मात्र आयुक्त साहेब आपल्याकडनं दिरंगाई होत चालली आहे. आपण आपल्या कामाच्या पध्दतीनुसार असं वाटत आहे की, आपण जर पाहिलं तर प्लाझमा दान करण्यासाठी दोन हजार रुपयांची मदत जाहीर केली आणि त्यांना ती दिली. जवळपास ३४१ दात्यांना आपण मदत केली. तो निर्णय घेताना आपल्याला कुठलीही अडचण आली नाही. परंतु या गोरगरीब आणि कष्टक-यांना त्यांना मदत देण्यासाठी मात्र आपण विलंब करत आहोत. तर नक्कीच या शहरातील कामगारांचा,कष्टक-यांचा आणि या सभागृहातील सर्व नगरसदस्यांचा आपण खरंतर हा अवमान केला आहे. आम्हांला असं दिसतयं की,तुमच्यावर नक्कीच कोणाचा तरी दबाव दिसतयं परंतु तुम्ही या दबावाला बळी पडू नये. अशी सभागृहाच्या वतीने मी आपल्याला विनंती करतो.आणि आपण हा जो प्रलंबीत विषय ठेवलेला आहे तो लवकरात लवकर निकाली काढून शहरातील सर्व कामगारांच्या बाबतीत जो निर्णय घेतलेला आहे तो मार्गी लावावा.

**मा.अजित गव्हाणे -** मा.महापौर साहेब,मा.आयुक्त साहेब,सन्मा.सभागृह हा विषय सगळयांसाठी अत्यंत महत्वाचा होता म्हणुन आपण सर्वांनी एकमताने हा निर्णय घेतलेला आहे. या शहरातील गोरगरीबांना कोरोनाच्या संकटात मदत करण्याची भूमिका आपण घेतलेली होती. आणि त्याप्रकारे स्थायी समिती आणि जनरल बॉडीमध्ये विषय मंजुर झाला. नंतरच्या काळामध्ये दोन/तीन महिने गेले आणि विभागीय आयुक्तांकडुन आपल्याला पत्र आलं की,आपल्याला अशा प्रकारचा निधी देता येत नाही. आयुक्तांनी विभागीय आयुक्तांकडे पत्र पाठवलं त्यामध्ये त्यांनी सांगितलं होतं की,आम्हांला महापालिकेने निर्णय घेताना अशा प्रकारची मंजुरी सभागृहामध्ये घेतलेली आहे. आणि अशा प्रकारची मदत करण्याची भूमिका आमच्या सर्वांची आहे. आपण याबाबतीत आयुक्तां बरोबर एक बैठक पण घेतली होती असा आता सर्वांनीच उल्लेख केला आहे. भाऊसाहेबांनी उल्लेख केला आहे की,कायद्याची बाजु आणि आपल्याला लोकांना मदत करण्याची जी काही भावना आहे या दोन्हींची सांगड घालुन

आपल्याला मदत करायची होती. परंतु त्याच्यामध्ये अडचण आली परंतु याठिकाणी बोलताना वारंवार उल्लेख केला जातो की, आयुक्तांवर कोणाचा तरी दबाव आहे. भाऊसाहेबांनी क्लिअरकट सांगितलं आहे की, अशा पध्दतीचं इतक्या खालच्या दर्जाचं राजकारण करणारा आमचा नेता नाही. आणि मा.महापौर साहेब,तुम्हीही त्यांच्या नेतृत्वाखाली अनेक वर्ष काम केलेलं आहे. आणि आताचे दोन्ही आमदारांनी त्यांच्या नेतृत्वाखाली काम केलेलं आहे. त्यामुळे त्यांनाही माहिती आहे. त्यामुळे अशा प्रकारचं घाणेरडं काम आमच्या नेतृत्वाकडनं तरी होणार नाही. मा.महापौर ज्यावेळेस आपण राष्ट्रवादीत होता त्यावेळेस त्यांच्याकडे विरोधी पक्षाचा नगरसेवक जरी त्यांच्यकडे कामासाठी गेला तरी दादा त्यांच आवर्जुन काम करायचे त्याची आठवण आपल्या सगळयांना आहे. आणि आज सुध्दा कुठल्याही पक्षाचा नगरसेवक जाऊ द्या दादा त्यांच काम करतात नुसतं पक्षाचंच नाही तर कुठलाही सामान्य नागरीक असेल तर त्याला कुठल्याही मध्यस्थीची गरज नाही त्यांना मदत करण्याची भूमिका दादाची असते. आयुक्त् साहेब,हे शहर जे डेव्हलप झालेले आहे ते अजितदादांच्या नेतृत्वाखाली झालेले आहे. भाऊसाहेबांनी मगाशी उल्लेख केला आहे की,अण्णासाहेब मगर,रामकृष्ण मोरे,डॉ.श्री.श्री.घारे अनेक लोकांनी या शहराला नेतृत्व दिलं आहे आणि आज आपण जे म्हणतो नां,ही कष्टक-यांची ,कामगारांची नगरी आहे पण ही नगरी कोणी निर्माण कोणी केली. या सगळयांच्या नेतृत्वाखाली या शहरामध्ये कारखानदारी आली, हिंजवडीमध्ये आयटी पार्क आणलं,चाकण एमआयडीसी,तळेगांव एमआयडीसी हे कोणी आणलेलं आहे. यासाठी पुर्वी मोरे साहेबांनी, आदरणीय पवार साहेब,अजितदादांनी प्रयत्न केलेले आहेत. आज सुध्दा आपण या शहरामध्ये कोरोनाच्या संकटाला सामोरे गेलो त्याच्यामध्ये सगळयात मोठी ताकद आपल्या पाठीशी काय होती तर आपण जे हॉस्पिटल्स निर्माण केले होते वायसीएमएच,भोसरी,जिजामाता हॉस्पिटल असेल या शहरामध्ये वेगवेगळी हॉस्पिटल्स आपण निर्माण केली ही हॉस्पिटल निर्माण केली त्याची दुरदृष्टी कोणाची होती. दादांच्याच दूरदृष्टीतुन हे घडलेलं आहे. असं असताना सुध्दा या सभागृहामध्ये इतक्या खालच्या दर्जावर जाऊन टिका होत असेल तर हे अत्यंत चुकीचं आहे. भाऊसाहेबांनी सांगितल्याप्रमाणे खरं म्हणजे हा विषय थोडक्यात संपला असता तुम्ही जर सर्व पक्षाच्या गटनेत्यांना बोलवून आयुक्तांच्या बरोबर बसुन याच्यावर कायदेशिर मार्ग सुध्दा काढताआला असता. मगाशी उल्लेख केला की, यापुर्वी आपण वस्तुच्या स्वरुपात मदत केलेली होती.तर तो ही मार्ग आपल्याकडे होता. पण या सभागृहात जाणीवपुर्वक अशा प्रकारची चर्चा घडवणं आणि आयुक्तांवरती टिका करणं योग्य नाही.मागच्या काळामध्ये आम्ही कधी बोललो नव्हतो की, हार्डीकर साहेब, हे अमक्या पक्षाचे आहेत.

**मा.महापौर–** अजित, विषय गोरगरीबांना आर्थीक मदत करण्याचा आहे त्याच विषयावर बोला.

**मा.अजित गव्हाणे -** मा.महापौर साहेब,मी त्याच विषयावर बोलतोय तुमचे सदस्य बोलत होते त्यावेळेस तुम्ही त्यांना का बोलले नाही. त्यांना वेगळा न्याय आणि आम्हांला वेगळा न्याय असं काही करु नका मा.महापौर साहेब,आपण जेष्ठ आहात आपण अत्यंत थोडक्यात हा विषय मिटवू शकला असता आणि आमची आजही आग्रही मागणी आहे की, राज्य शासनाची काही मदत लागत असेल,दादांची काही मदत लागत असेल तर आम्ही सगळेजण तुमच्या बरोबर येण्यास तयार आहोत. कारण हा विषय या शहरातील गोरगरीबांच्या जनतेचा विषय आहे. त्यामुळे आमची या संदर्भातील भूमिका क्लिअर आहे,आम्ही तुमच्या बरोबर आहोत. आणि विकास डोळसनी एक विषय काढला आहे की, आयुक्त साहेब,मला आश्चर्य वाटतं की,प्रशासनाने अशा पध्दतीचं पत्र आहे की, उपमुख्यमंत्र्यांच्या दालनात बैठक झाली आणि त्या बैठकीमध्ये आयुक्तांना सदरचे काम थांबवण्याचे निर्देश दिले. आयुक्त साहेब,हा विषय तुमच्या आधीचा आहे. राजेंद्र लांडगे यांची भूमिका चांगली होती की,त्याठिकाणी पाण्याची टाकी व्हावी आणि त्याठिकाणच्या नागरीकांना पाणी द्यावं परंतु ज्याठिकाणी ही टाकी करायची होती त्या टाकीची जागा महापालिकेच्या ताब्यात अजुन नाही. तसे माझ्याकडे पत्र आहे. त्या जागेची मालकी आपल्या महापालिकेकडे नसताना त्याठिकाणी टाकीचं टेंडर काढलचं कसं उलट अशा पध्दतीचं चुकीचं काम जर कोण करीत असेल तर संबंधित अधिका-यांवर कारवाई केली गेली पाहिजे. सिमाताई,नम्रता लोंढे, विलास मडिगेरी,विक्रांत लांडे यांच्या वॉर्डातील ही जागा आहे. आयुक्त साहेब,ही जागा ओपन स्पेस आहे या ओपनस्पेस मध्ये कुठल्या गोष्टी अलाऊड आहेत ओपन स्पेस मध्ये पाण्याची टाकी करता येत नाही.ओपन स्पेस ही ओपनच असते त्याच्यामध्ये फक्त चार टक्के कंन्स्ट्रक्शन अलाऊड आहे. मुळात ती जागा आपल्या ताब्यात नाही,दुसरी गोष्ट ती ओपनस्पेस आहे आणि ओपनस्पेस कुणासाठी आहे याचा लेआऊट तयार केला गेला आहे. तो लेआऊट कुणी केला आहे ज्या लोकांना त्याठिकाणी साडेबारा टक्के जमीन मिळाली त्या साडेबारा टक्क्यातून तो लेआऊट तयार झाला तिथल्या कामगारांनी तिथं घरे घेतली त्यांच्यासाठी ती ओपनस्पेस जागा ठेवली आहे. परंतु महापालिकेने चुकीचं टेंडर काढलं आहे आणि ज्या अधिका-यांनी हे चुकीचं टेंडर काढलं आहे त्या अधिका-यांवर कारवाई झाली पाहिजे. आणि अशा पध्दतीने चुकीची माहिती जर कोणी अधिकारी नगरसेवकांना आणि या सभागृहाला देत असेल तर त्या अधिका-यावरती कारवाई झाली पाहिजे. अशी मागणी आम्ही करतो.

**मा.राजेंद्र लांडगे -**मा.महापौर साहेब,मा.आयुक्त साहेब,सन्मा.सभागृह अजितभाऊ हे आमचे आदर्श आहेत त्यांच्यापुढे मी बोलूच शकत नाही. पण मी एक प्रामाणिकपणे काम करणारा नगरसेवक म्हणण्यापेक्षा मी स्वत:ला नगरसेवक कधी समजलोच नाही. किंवा मी असा विचारपण केला नाही की, मी नगरसेवक आहे. मी प्रामाणिकपणे गावची सेवा करतो. माझी पाचवी पिढी आहे पण मी ज्याठिकाणी आज नेतृत्व करतो त्याठिकाणच्या लोकांच्या हालअपेष्टा पहातो, लोकांना पाण्यासाठी रात्रीचे १२.०० वाजेपर्यंत आणि सकाळी ३.३०पासून तर परत रात्रीच्या १२.३० पर्यंत मी परवा आयुक्तांना पण सांगितलं की,मी माझी प्रामाणिकपणाने बाजु मांडतो मी कोणतंही राजकारण करीत नाही. मी सर्वांसोबत आणि सर्वांसाठी रहातो मला पक्ष कोणता आहे हे बघत नाही पण स्वर्गीय अंकुशराव लांडगे यांच्यातून मी प्रेरणा घेवुन लोकांच्या कामासाठी सतत प्रयत्न करीत असतो. पाण्याची टाकी ही त्याच ठिकाणी व्हावी असं पण मी कधी प्रयत्न केला नाही. कुठंही करा, पण माझा प्रभाग क्र.६ जो आहे तो जवळपास ८० टक्के अनाधिकृत आहे याच्यामध्ये रेडझोन आहे आणि याठिकाणच्या लोकांना जर पाणी द्यायचं म्हणलं तर इंद्रायणीनगरवरती अवलंबुन रहावं लागतयं शांतीनगर हे माजी आमदार विलास लांडे यांच्यावरती अवलंबुन रहावं लागतयं त्यानंतर पांजरपोळ याठिकाणी असणा-या दोन टाक्यावरती अवलंबुन रहावं लागतयं त्याठिकाणचे जे नगरसेवक आहेत मला जर पाणी कमी पडलं तर त्यांना मला फोन करावा लागतोय की,भाऊ तुम्ही पाणी थोडं कमी घ्या कारण इकडं लोकांची ओरड होत आहे. या भावनेतून मी क प्रभागामध्ये या पाण्याच्या टाकीसाठी ठराव मंजुर केला की,याठिकाणी एक टाकी व्हावी. माझं असं काही म्हणणं नाही की, याच ठिकाणी व्हावी.पण हा जो प्राधिकरणाचा जो भूखंड आहे तो भूखंड प्राधिकरणाने आपल्याकडे वर्ग केलेलाआहे त्याचे सर्व कागदपत्रं आपल्याकडे आहेत. पण त्याठिकाणी मस्जीद,मंदीर बांधल्या बांधु द्या देवाची श्रध्दा माझ्यामध्ये पण आहे मी पहिलचं तुम्हांला बोललो आहे की, मी गावचा भगत आहे.मी ते मंदिर पाडू इच्छित नव्हतो तिथं काही वेगळं करण्यापेक्षा ती टाकी मंदीर सोडून १० फुट अंतरावर आहे. त्यांच म्हणणं आहे की, तिथं कार्यक्रम भरतात वगैरे माझ्याकडे १० वर्षापासूनचे फोटो सेशन्स आहेत. तिथं काही कार्यक्रम भरत नाहीत. मला असं काही बोलायचं नाही आणि अजितभाऊ बद्दल मला आदर आहे एकेकाळी मी त्यांचा प्रचारक होतो आणि त्यांच्यासाठी मी भिंतीवरती कमळं मी रंगवलेली आहेत आणि ते पण मान्य करतील मी पण असा कार्यकर्ता आहे की,अंकुशभाऊंनी जर सांगितलं की, येथून इलेक्शन लढायचं नाही तर आपण नाही लढणार फक्त भाऊंनी नांव दिलं तर त्यांच्यासाठी मी लढलो पण आज मी प्रामाणिकपणे या जनतेसाठी पाण्यासाठी मी लढत आहे. नागरीकांना रात्री १२.३० पर्यंत

आणि सकाळी ३.३० पासून पाण्यासाठी  हाल सहन करावे लागतात. आणि माझ्यावर केस काय केली मी पॉवर ऑफ अँटर्नी केल्या. अहो, पॉवर ऑफ अँटर्नी का  केल्या मी लोकांच्या पाण्यासाठी केल्या हक्काच्या पाण्यासाठी केल्या मी परवा आयुक्त साहेबांशी एवढी विनंती केली की, तुम्ही फक्त टाकी करा,मला काही नको, तिथं जर टाकी निर्माण केली तर कमीत कमी दहा हजार कुटूंबांना फुकट मध्ये त्यांच्या टाकीत पाणी पडेल.आज जे पाणी आमच्याकडे येतयं ना ते पाणी खालच्या टाकीत पडणार आणि ते पाणी मोटरनी वरच्या टाकीत सोडायचं असं प्रत्येक कुटूंबाचं महिन्याचं पाचशे रुपये बिल धरलं तर असे माझ्या प्रभागामध्ये दहा हजार कुटूंब रहातात त्यांचे किती पैसे वाचतील हे कुटूंब गोरगरीब आहेत,कष्टकरी आहेत, भाडयाने रहातो आणि हे कुटूंब मोटर लावुन पाणी भरतोय तर त्याच्यासाठी मी भांडतोय मला राजकारणाचं काही घेणं-देणं नाही मी आज आहे उद्या नाही हा विषय नाही. माझ्याच प्रभागात अनधिकृत जागा आहे अनधिकृत का म्हणतो मी, आम्ही काय प्राधिकरणाचा आम्ही काय परतावा घेतला नाही,कोणाचा काय मोबदला घेतला गेलेला नाही. पण आज आमच्यावर त्यांच्या  श्रु आमच्यावर केसेस टाकलेल्या आहेत. हे पण चुकीचं आहे नां, आता आम्ही देशोधडीला लागलो आहे. आमची ५६ एकर जागा सरसगट सगळयांना आली. पण आज त्यांना जागाच नाही का, तर प्राधिकरणाने सगळी जागा ताब्यात घेतली मग करायचं काय, आयुक्त साहेब,तुम्ही लवकरात लवकर याबाबतीत निर्णय घ्या एवढं सगळं करुन पण माझ्यावरचं केस टाकली, करु द्या काही फरक पडत नाही. मी शेवटपर्यंत लढत राहणार मला प्रशासनाकडुन जी उत्तरे आलेली आहेत ती माझ्याकडे आहेत. त्यानुसार मी पुढं लढा देतच राहणार राजकारण हा बाजुला विषय ठेवा पण नागरीकांना रोज पाणी मिळत नाही नां,त्याचं सर्वांनी गांर्भीयाने घ्या. सकाळी ३.३० वाजता आपला कामगार हा कामाला जातो तो पाण्यासाठी जागणार पाणी भरणार मग कामाला जाणार तो झोपणार कधी आणि त्यानं पाणी भरावं कधी माझा असा एकमेव प्रभाग आहे की, त्याठिकाणी एकही पाण्याची टाकी नाही. आयुक्त साहेब म्हणतात तुम्हांला पाणी देणार, देणार पण थोडचं  प्रेशरनी पाणी येणार आहे. माझ्या प्रभागासाठी एक तरी पाण्याची टाकी द्या नां मी नागरीकांसाठी भांडतोय माझ्यासाठी नाही. माझ्यावर जर तुम्ही केस टाकताय,सगळं करताय मलाच सगळेजण दडपण्याचा प्रयत्न करताय तर माझ्या बापाची जागा आहे मी माझं बघणं  प्राधिकरण बघणं ते पुढचं मी बघणं पण आता पाणी नागरीकांसाठी द्यां प्रत्येक कॉलनीसाठी आपण फक्त एकच तास पाणी देतो त्याच्यामध्ये जर काही आपलेकडनं चुक झाली त्यामध्ये शटडाऊन झालं किंवा काय झालं तर इतका हैराण होतो की,फोन वाजुन,वाजुन गळा सुकून जातो. रात्रभर जागी राहणारे नगरसेवक म्हणजे आमच्या प्रभागातील नगरसेवक

एवढं ध्यानात ठेवा तुम्ही. मला अटक झाल्यानंतर कोणी या विषयावरती किंवा सोशल मिडीयावरती कोणी चर्चा केली की,टाकीचं काम हे अजितदादांनी बंद केलं वगैरे पण मला तर उत्तर सरळ दिलं आहे की, हे काम अजितदादांमुळचं बंद  झालं आहे. मी अजितदादा म्हणलो पण हे तर उपमुख्यमंत्री महाराष्ट्र राज्य व मा.आयुक्त यांनी हे काम तुर्तास बंद ठेवण्यात यावे असं सांगितलं. का? ही जागा प्राधिकरणांकडन आपल्याकडे १० वर्षापुर्वीच वर्ग झालेलीआहे. अजितभाऊंना काय वाटतयं की, कार्यकर्ता आपल्याजवळचा आहे पण आम्ही खरे तुमचे आहे दादा तुम्ही उद्या म्हणले तरी तुमच्याकडे येईन कधीच घाबरणार नाही. हे कोणीही येतील आणि  तुम्हांला सांगतील हे कर,ते कर पण आपण गाववाले आहोत आपल्याला लोकांसाठी काम करायचे आहे  हे ध्यानात ठेवा आणि मी तुमच्यासाठी आहे. पण माझी प्रामाणिक इच्छा आहे की,या टाकीचं काम कमित कमी  सहा दिवसांत जर का चालू झाली नाही तर या महापालिकेमध्ये कमित कमी तीन हजार लोकांचा मोर्चा घेवुन येणार हे आताच सांगतो. धन्यवाद.

**मा.सचिन चिखले -** मा.महापौर साहेब,मा.आयुक्त साहेब,सन्मा.सभागृह   कोविडच्या काळामध्ये आपण सर्वांनी मिळून जे काम केलेले आहे. त्यामध्ये नर्स असतील,डॉक्टर असतील हॉस्पिटलचे सर्व कर्मचारी असतील या सर्वांच मी कौतुक करतो. पुन्हा एकदा या सर्वांच अभिनंदन महत्वाची गोष्ट म्हणजे आताच आपण सर्वांनी जो विषय घेतला आहे या शहरातील सर्व गरीब लोकांना तीन हजार रुपये प्रत्येकी मिळावेत असा जर या सभागृहाने ठराव मंजुर केला असेल तर माझी आयुक्तांना नम्र विनंती आहे की, कायद्यामध्ये बसवुन आपल्याला हे पैसे कसे देता येईल हे पहावे. कारण हा सर्वानुमते मंजुर केलेला विषय आहे. आज प्रत्येक नगरसेवकांनी सांगितलं आहे की, प्रत्येक नगरसेवकांच्या ऑफिसमध्ये लोक येऊन तीन हजार रुपये मिळण्याचा फॉर्म आला का, आणि आम्हांला नाइलाजास्तव सांगाव लागतं की, आयुक्तांनी हा विषय नामंजुर केलेला आहे. तर हा आपल्या सर्वांचाच कुठं तरी कमीपणा आहे. या शहरामध्ये रिक्षाचालक,घरेलु कामगार यांची संख्या खुप मोठी आहे. आजच माझ्याकडे एक महिला आली होती ती म्हणली माझ्या दोन मुलांच अँडमिशन करायचं आहे माझ्याकडे पैसे नाहीत. त्या महिलेला घेवुन मॉडर्न शाळेमध्ये गेलो त्या सरांना विनंती केली त्यांनी सांगितले की, यांच्याकडे पैसे नाहीत यांच अँडमिशन कसं करायचं मी त्यांना सांगितलं की,यांच अँडमिशन करा मी यांचे तीन/तीन हजार रुपये देतो. असे हे छोटे,छोटे प्रॉब्लेम आहेत. जे कामगार वर्ग आहेत त्यांचे सुध्दा खुप हाल आहेत. हे सर्व जे छोटे,छोटे घटक आहेत ज्यांच्यावर आपण सर्वजण अवलंबुन आहोत त्यांचा कुठं तरी आपण विचार केला पाहिजे. आणि हा प्रस्ताव

पुन्हा एकदा आयुक्तांसमोर ठेवुन सर्वसामान्य गोरगरीबांना कशी मदत करता येईल हे पाहू या. मा.महापौर मी आपल्याला अजुन एक छोटीशी विनंती करतो की, गेल्या १५/२० दिवसापुर्वी भक्ती-शक्ती उड्डाणपुल चालू झालं असं आपण पत्र दिलेलं आहे. माझी इच्छा आहे की,या पुलाचं लवकरात लवकर उद्घाटन व्हावं अशी मी विनंती करतो.

**मा.महापौर -** सचिन, विषयांतर होत आहे.

**मा.आशा धायगुडे-शेंडगे -** मा.महापौर साहेब,मा.आयुक्त साहेब,सन्मा.सभागृह खरंतर माई,आम्ही तुम्हांला सांगत होतो की, कमिशनर साहेब येणार आहेत का? येणार असतील तर आम्हांला सांगा कारण आज सभागृहामध्ये पहिल्या बाकडयावरचे नगरसेवक ते शेवटच्या बाकडयावरचे नगरसेवक या सर्वांनी आज पोटतिडकीने विषय मांडला आहे आणि विषय मांडण्यामागचा हेतू होता कारण या विषयाच्या मागे तुम्ही कर्ता करविता होताच परंतु त्यांची पाल कुठं चुकचुकली हे जर या सभागृहाला कळालं तर तुमच्यावर जे आरोप होतात आणि आपण याच्यामध्ये कुठं तरी कमी पडतोय अशी कुठं तरी भावना आहे. कुठं तरी कमिशनरनी केलं नाही,मग कुठं तरी नेत्यांची नांव घ्यायची या नेत्यांच काही म्हणणं नाही या शहरामध्ये आपण १३३ जण निवडुन आलो आहोत नां या १३३ जणांवरती २५ लाख लोकांनी आपल्यावर जे प्रेम केलं,आपल्यावर जो विश्वास टाकला म्हणुन आपण या मंदिरामध्ये आपण सगळेजण आलो आणि निश्चितपणे तुम्हांला महापौरांचा सन्मान याठिकाणी मिळाला. राजकरण करण्यास आपण सगळेजण तयारच आहोत त्यामुळे आपण बोलतो. परंतु आज काही राजकारण करण्याची वेळ नाही. जग असेल,देश असेल,राज्य असेल एवढंच नाही तर आपल्या शहरापर्यंत कोरोनाची ही दुसरी लाट आलेली आहे.पहिल्या लाटेमध्ये आपण सर्वांनी लोकांना धान्य पुरवणे, जेवायला घालणे अशा सुविधा आपण पुरविलेल्या आहेत. मग त्या कोणत्या नियमाने पुरवल्या आहेत. आयुक्त साहेब,मागच्या वेळेस आपण या नागरीकांना जेवणाची सोय पुरवली होती ती कोणत्या नियमाने केली होती. खरंतर आज आपण आर्थीक दुर्बल घटकातील नागरीकांना आर्थीक मदत या शब्दामध्ये आपल्या सगळयांची जी भावना आणि कळकळ आहे नागरीकांच्या प्रती प्रेम आणि जिव्हाळा आहे. आज चांगले,चांगले लोक हातघाईला आलेली आहेत. ज्यांच उत्पन्न ५०/६० हजार रुपये आहे त्यांची सुध्दा आता दयनीय अवस्था आहे. कुठल्या मुलांची फी भरु कारण त्यांच्या अँमीनिटीज या वरच्या लेवलच्या होत्या त्यामुळे त्यांनाही आज सोपं राहिलेलं नाही. आणि ज्यांच हातावर पोट होतं सकाळी कामाला जायचं आणि संध्याकाळी अर्धा किलो तांदुळ आणायचं, पाव किलो डाळ आणायची आणि चुल पेटवायची आणि त्या चुलीवर हे शिजवायचं आणि खायचं या नागरीकांना वर्षभरामध्ये ना काम मिळालं ना रोजगार

मिळाला ,ना व्यवसाय मिळाला म्हणजे हाताला काम नाही आणि तोंडाला घास नाही. अशी या शहरातील जे आर्थीकदृष्टया जे दुर्बल घटकातील लोक आहेत त्यांची अत्यंत वाईट अवस्था झालेली आहे. आयुक्त साहेब,आपण औषधं खायला घालतो,दवाखान्याची व्यवस्था करतो ही आपली नैतिकता आहे म्हणजे औषधं खायला देतो पण पोटभर अन्न देणार नाही अशी तुमची क्रुर भूमिका दिसायला लागली आहे. अत्यंत वाईट भूमिका आहे. आयुक्त साहेब,आमच्या सगळयांची एकच भावना आहे की,माझ्या नागरीकांपर्यंत मदत पोहचली पाहिजे. साहेब,तुम्हांला तीन हजार रुपये तोडके वाटतात पण या तीन हजार रुपयांमध्ये एखादया कुटूंबाच दोन महिन्याचं रेशनिंग होतं तुमच्यामुळे या नागरीकांच्या घरातील चुल पेटली असती परंतु तुम्ही त्या पेटलेल्या चुलीमध्ये चक्क पाणी टाकायचं काम तुम्ही केलेलं आहे. साहेब,तुमच्या बरोबर सर्वांनी चर्चा केली होती परंतु तुम्हांला काही ठिकाणी अडचण सुध्दा असेल परंतु तुम्ही आमच्या महापौरांना आणि पक्षनेत्यांना फोन करुन बोलावल असतं तर आणि सांगितलं असतं की,राजानो असं,असं होणार नाही तुम्ही सगळे सन्माननीय आहोत परंतु असं म्हणण्याऐवजी याच्यामध्ये असं,असं करु शकतो तर निश्चितपणे आमचे महापौर आणि १३३ नगरसेवकांनी तुमचं स्वागत केलं असतं एखादया नियमात आणि चौकटीत काम करण्यास आम्हांला नक्की आवडतं. परंतु याला मार्गच नाहीत असं होऊच शकत नाही. मग दोन हजार रुपये कोणत्या कायद्यांतर्गत दिले सांगा. साहेब,तुम्हांला वाटलं,तुम्हांला पटलं तर पटलं, तुम्हांला नाही पटलं तर मग आमचं काय मगाशी अंबरभाऊ म्हणले की,तुम्ही आम्हाला चुना लावला आहे. दोन हजार रुपये तुम्ही प्लाझमा साठी देवु शकलो तर आता इथं या शहराती नागरीकांवर कोरोनासारखी परिस्थिती ओढवल्यामुळे आपली ही श्रीमंत महापालिका आहे आणि त्या खुर्चीवर आपण बसलेले आहात. तो बहुमान आम्हाला जो मिळतो नां शहरातील महापालिकेमध्ये काम करणं म्हणजेच वरच्या लेवलला काम करण्याची संधी आहे.आणि जर अशा वाईट काळामध्ये आमच्या नागरीकांना मदत करु शकलो नाही तर आम्हांला काय करायचं आहे या श्रीमंतीचं भूषण हे काय आम्हांला घरी न्यायचं आहे का, आमची काय इथं वैयक्तीक मक्तेदारी आहे का, श्रीमंत महापालिकेचा आम्हाला जो सन्मान लागला आहे नां, तो या शहरातील नागरीकांचा पै,पै रुपया जमा होतो आणि त्यामुळेच ही श्रीमंत महापालिका आहे. आणि ही श्रीमंती आमच्या गोरगरीबांच्या उपयोगी येणार नसेल तर आम्ही इथं काहीच करत नाही. आणि इथं आपण एकटयांनी निर्णय घेतलेला नाही तर महापालिका सभेने निर्णय घेतलेला आहे. मग कमिशनर साहेबांनी कोणत्या नियमाने नाकारले आहे हे सांगावे आणि कोणत्या नियमामध्ये बसवता येईल हे सुध्दा त्यांना सांगण्याचा अधिकार आहे. परंतु त्याला

कच-याची टोपली दाखवण्याचा अधिकार आपल्याला निश्चितपणे नाही. तुम्ही कलम ६६,६७ आणि ६८ च्या अंतर्गत सांगितलं. मग कोणत्या कलमाच्या अंतर्गत करता येईल ते तरी सांगा आम्ही तुमच्या मागे चालू. जर आम्हांला गरीबांना न्याय द्यायचा असेल तर आमच्या श्रीमंतीचं भूषण आमच्या नागरीकांच्या उपयोगात येत नसेल तर साहेब,ही श्रीमंती चाटायची आहे का? मी याठिकाणी सांगू इच्छिते की, आयुक्त साहेबांच कसं आहे माहिती आहे का मी राजा आणि ही माझी प्रजा, आयुक्त साहेब,खरं सांगते तुम्ही राजा आणि तुमचे सगळे अधिकारी/कर्मचारी हे प्रजा आहे लक्षात ठेवा साहेब,आम्ही तर १३३ जण कोणचं नाही. माझ्या शहरामध्ये जी २५ लाख लोकसंख्या आहे त्यांच्यामुळे हे सभागृह आहे,त्यांच्यामुळेच ही महापालिका आहे आणि त्यांच्यामुळेच तुम्ही या महापालिकेत अधिकारी / कर्मचारी म्हणुन काम करत आहोत. कोणत्या नियमात बसत नाही हे सांगण्याचा तुम्हांला अधिकारच नाही कोणत्या नियमात बसतं हे जर तुम्ही या सभागृहाला सांगितलं असतं आणि या,या नियमात हे बसु शकतं आणि या सभागृहाची ही चुक झालेली आहे. आणि आपण या,या नियमात करु शकतो त्यावेळेस तुमच्यातील माणुसकी किंवा या शहरवासियांसाठी काही तरी करण्याची तळमळ आहे असं आम्हांला निश्चितपणे वाटलं असतं आणि आमची चुक आम्ही कबुल केली असती आणि आयुक्त साहेब,आमचं जर चुकत असेल तर तुम्ही आम्हाला कलम सांगा,मार्ग सांगा. तुमचं हे आयुक्त पद असेल,उपआयुक्त पद असेल, जेवढे कर्मचारी असतील, नगरसेवक असतील हे सगळे जण या शहरातील करदात्यांच्यामुळे आहेत आणि या दुर्बल घटकांना मदत करण्याची इच्छाशक्ती या शहरातील जे काही थोडेसे आर्थीकदृष्टया चांगले असतील त्यांची तर आहेच आहे त्यांच्याद्वारे जमा झालेला निधीचा विनियोग चांगल्या प्रकारे करु शकत नसेल तर काय करायचं आपल्या सगळयांच. आयुक्त साहेब,आमचा जो चार महिन्यांचा जो कालावधी आहे नां मग आम्ही कोणत्या पक्षाला नांव ठेवायची,कोणत्या पक्षाला अंगावरती घ्यायचं हे सगळं कळतं आम्हाला पण हा काळ निश्चितपणे नाही. या शहरातील आर्थीक दुर्बल घटकातील नागरीकांना मदत करण्याचा काळ होता आणि त्याच वेळेला आपण आयुक्त साहेब आखडता हात घेतला. आम्हांला दु:ख याच आहे की,आमच्या नागरीकांना आम्ही मदत करु शकलो नाही. आणि ही मदत का करु शकलो नाही तर आमच्या पक्षातील किंवा विरोधी पक्षातील लोकांनी विरोध केला किंवा नाही याच्याशीही काही घेणं देणं नाही. आमच्या महापौर तयार होत्या,संपुर्ण सभागृह तयार होतं मग कमिशनर साहेब म्हणाले म्हणुन देता येत नाही का? साहेब,तुम्ही आमच्या कामाला डिवचता का, आयुक्त साहेब,आम्ही या शहराचे १३३ नगरसेवक आहोत आणि या महापालिकेचे आम्ही विश्वस्त आहोत. साहेब,तुम्ही डोक्यात एक विषय नक्की ठेवा की, तुम्ही या आयुक्त

आहात का? निश्चित आहात,तुम्ही एका वरच्या पोष्टला आहात का? निश्चित आहात, परंतु आम्ही १३३ नगरसेवक हे या संस्थेचे ट्रस्टी आहोत आम्ही या महानगरपालिकेचे एम्पलॉई नाहीत. यु आर एम्पलॉई अँण्ड यु आर टू गो डिसाईड व्हॉट बेटर दॅन टु माय सिटी माझ्या शहरातील नागरीकांना काय चांगल आणि काय उत्तम देवु शकता हे करण्याचं काम आहे. माझा फ्लॅटधारक कर भरणारचं आहे. माझा बारा हजार रुपये टॅक्स आहे आणि तो तुम्ही घेवु नका कारण त्याला आता भरता येत नसेल तर त्यांनी दोन हप्त्यात,तीन हप्त्यात भरलाच आहे. पण जे ख-या अर्थाने दुर्बल घटकातील नागरीक आहेत त्यांच्यासाठीचा हा विषय होता. आणि हा विषय कोणत्या नियमात बसत असेल तर तो बसवावा आणि माझ्या शहरातील नागरीकांना दिलास देण्यात यावा. मला सिमाताईंनी सांगितलं आहे की,आयुक्तांनी पुस्तक लिहिलं आहे. आणि त्या पुस्तकात काही मुद्दे पण सांगितले आहेत. आणि मला वाटलं की,आयुक्त साहेब खुप चांगल काम करतील साहेब,तुमच्या सगळयाच कामावर वाईट म्हणण्याचं कारणही नाही. परंतु ही आमची अत्यंत वाईट काळात हे शहर आहे आणि या शहरातील नागरीकांना सहकार्य करणं त्यांच्या प्रती आपुलकी निर्माण करणं हीच वेळ आहे.तुम्हांला चांगल्या काळात कोण म्हणणार नाही की,आम्हांला पैसे द्या.परंतु त्यांची ज्यावेळेस वाईट परिस्थिती आहे त्या वाईट परिस्थितीमध्ये त्यांच्या बरोबर उभं राहील तर त्यावेळेला तुम्ही आमच्या प्रजेचे पालनहार म्हणुन तुमच्याकडे बघितलं असतं परंतु आज मात्र आम्हांला तसं वाटत नाही. साहेब,तुम्हांला बघावंस वाटतं ना तर तुमच्या अधिका-यांकडे एकदा बघा नां, म्हणजे आता आमच्या राजेंद्र लांडगे यांनी त्यांच्या वॉर्डातील कामाच्या संदर्भात सांगितल आहे, विकास डोळसनी सांगितलं आहे. सगळयांनी सांगितले आहे म्हणजे शहरातील वर्कऑर्डर बघा तुमच्या अधिका-यांचे जे या पगारावर जगतात. शहरामधील कामांचे टेंडर कोणकोणते ओपन झाले,मुदत किती होती,दुसरं पाकीट कधी ओपन झालं आणि वर्कऑर्डर कधी दिली. माई,ठेकेदार ५/६ महिने वर्कऑर्डरच घेत नाही. तिथं तुमचा कायदा कुठं जातो. तुम्हांलाही माहिती आहे, सेकंड पाकीट ओपन केल्यानंतर ५ ते ६ दिवसामध्ये तुम्ही पीएसडी भरता त्यानंतर स्टँडींगला विषय कधी आणायचा आणि मग वर्कऑर्डर कधी देणार आणि वर्कऑर्डर ५/६ महिने वर्कऑर्डर ठेकेदार घेत नाही मग त्यांना का ही सवलत देता. राजा मी आहे ताई,आणि ती माझी प्रजा आहे तुमच्या १३३ शी काही संबंध नाही. इथं बोलताना पण मी प्रशासन म्हणुन काम करणार आहे. आणि फक्त प्रशासन म्हणुनच मी आहे. प्रशासन म्हणुन तुमचा पगार ज्यांच्या जिवावर होतो ना त्यांना दुर्लक्षित केलं तर आम्ही १३३ जण फक्त् याठिकाणी बांगडया घालून आलोत म्हणजे इथं बसणारे गप्प बसुन ऐकुण घेऊ आणि सहन करु असं जर तुमच्या डोक्यात असेल तर ते काढून टाका. याठिकाणी

आमचं काय होतं का, काय होणार आहे का, इलेक्शनला सामोरे जायचं आहे आमचे २३८ कोटी रुपये काढून काय घेतले जे काही करायचे आहे ते आमच्या बाबतीत पण माझ्या नागरीकांशी खेळण्याचा कसलाच अधिकार आम्ही तुम्हांला देत नाही. त्यामुळे तुम्हांला विनंती आहे की,या तीन हजार रुपयांची जी स्किम आहे, नागरीकांना द्यायचे आहेत ते तुम्ही योग्य चाकोरीमध्ये किंवा एका चौकटीमध्ये बसवुन देण्यात यावे असे मा.महापौर साहेब,तुम्ही त्यांना तसे आदेश देण्यात यावे. आयुक्तांच्या किती चुका आपण ऐकुण घ्यायच्या मा.महापौरांनी सांगितले होते की, ८ दिवसात स्पर्शचा अहवाल ठेवणेत यावा आज ९० दिवस उलटले तरी चक्कार शब्द नाही. आता आमच्या महापौरांनी आर्थीक दुर्बल घटकांना तीन हजार रुपये देण्याचा विषय मंजुर केला परत त्याला केराची टोपली. मा.महापौर साहेब,आपण हे किती वेळा सहन करायचं हे मोठे अधिकारी आहेत त्यांच्याकडुन चुक होऊच शकत नाही. त्यामुळे याच्यावरती निर्णय आपण घ्यायचा आहे. त्यांना आपण आदेश द्यावेत की,येत्या आठ दिवसात हे कायद्याच्या चाकोरीत कसं बसवता येईल हे त्यांनी नियम सांगायचं आहे आणि त्यांनी जे कलम सांगितले आहे कलम ६६ च्या उलटे कोणत्या कलमात बसवता येईल तसे तुम्ही आम्हाला सांगा आम्ही पुन्हा एकदा ठराव करु या सभागृहात आणि ती मदत त्या नागरीकांपर्यंत पोहचण्याचं काम करु मा.महापौर साहेब,आपण मला बोलण्याची संधी दिली त्याबद्दल धन्यवाद.

**मा.सिमा सावळे -** मा.महापौर साहेब,मा.आयुक्त साहेब,सन्मा.सभागृह आयुक्तसाहेबआज आम्ही सगळेजण धार लावुन आलेलो आहोत. तुमच्या भाषेत,सर ही महापालिका आहे इथं तुम्ही काय बोललात ना ते दुस-या मिनिटाला कळतंय त्यामुळे आम्ही धार लावुन आलो आहोत. आमच्या जिभेवर कायमच असती म्हणा ती, तो काही विषय नाही. पण आपण सुध्दा शब्द वापरताना कोणाच्या बाबतीत बोलतो, काय बोलतो याच्यावरती निश्चितपणे आपल्या शब्दावरती आपला कमांड हवाय, मला मान्य आहे की,तुम्ही ग्रामीण भागातले आहात ग्रामीण भागातले असल्यामुळे ते शब्द जरी आपण शहरी भागात रहायला आलो तरी ते बोली भाषेतले शब्द आहेत ते लवकर जात नाहीत परंतु एका मोठया खुर्चीवर बसल्यानंतर जबाबदारीच्या खुर्चीवर बसल्यानंतर अशा प्रकारचा शब्दप्रयोग आपण टाळला पाहिजे. आपण सार्वत्रिक राईट मध्ये आहोत आपली काही प्रायव्हेट लिमिटेड कंपनी नाही किंवा प्रोपरायटरशिप नाही.की,आपण काहीही बोललो तर ते कुणालाच कळणार नाही. मा.महापौर साहेब,आपण तीन हजार रुपये देण्याच्या संदर्भात तातडीने आपण याठिकाणी सभा बोलावली होती. मला वाटतं प्रशासनाच्या महापौरांचा जरी अधिकार असला तरी तो अजेंडा जो आहे तो कमिशनरांच्या बरोबर डिस्कस करुन मा.महापौरांनी,मा.पक्षनेत्यांनी सर्व पक्षाच्या गटनेत्यांनी

तो निर्णय घेतला होता. स्पेशल जी.बी.घेण्याचा, स्पेशल जी.बी. घेतल्यानंतर, विषय मंजुर केल्यानंतर त्याच्यावर १५/२० दिवस गेल्यानंतर साहेब,आपण आपला निर्णय सांगितला की,मी कलम ६६ च्या नुसार मला आपल्याला अशी मदत करता येणार नाही हे मी वृत्तपत्रात वाचलं. भाऊसाहेब,मगाशी तुम्ही म्हणलात की,आयुक्त हे कुठल्या पक्षाचे नाहीत, कुठला नेता चिल्लर राजकारण करणार नाही, मी तुमच्या मताशी सहमत नाही व्हेरी सॉरी, तुम्ही ज्येष्ठ आहात, तुमचा मान-सन्मान कायम माझ्यामध्ये असतो पण व्हेरी सॉरी, कमिशनर राजकारण करतात का? तर ते शंभर टक्के राजकारण करतात. अगदी राजकीय कार्यकर्त्याप्रमाणे साहेब,आपण आपला निर्णय घेतला आहे. आम्ही स्पेशल जी.बी.बोलावली त्याच्या आगोदर आपल्याशी डिस्कस केलं,आपल्याकडे अजेंडा मांडला.अजेंडा नगरसचिवांनी छापला तो सर्व नगरसेवकांना दिला आणि मग या जी.बी.मध्ये आपण सुध्दा उपस्थित होता. जर तुमचा नकार होता, तुम्हांला वाटत होतं की,आम्ही कायदयाच्या बाहेर जाऊन एखादा विषय करायचा म्हणतो तर त्यावेळेसच तुम्ही तो विषय थांबवायला पाहिजे होता. ही तुमची नैतिक जबाबदारी आहे. पण आपण नाही थांबवलं. आणि तसं होऊ देणार नाही, १३३ मध्ये कुठलेही पक्ष नाही, अँग्री, जसं कमिशनरांनी मी हे तीन हजार रुपये देवु शकत नाही हे जाहीर केल्यानंतर किती पक्षाचे नगरसेवक कमिशनरांचा निषेध नोंदवायला पुढे आले. आज भारतीय जनता पार्टी याठिकाणी सत्तेत असल्यामुळे आम्ही निषेध नोंदवायचा की, कमिशनरांच कौतुक करायचं, हा दुय्यम मुद्या आहे. परंतु कमिशनरांनी राजकारण केलं का? तर शंभर टक्के राजकारण केलं.अगदी राजकारण्यासारखं वागला आहात तुम्ही आणि म्हणुन मगाशी अनेकांनी नेत्यांची नांवे घेतली गेली. आम्हांला मा.उपमुख्यमंत्र्या बद्दल प्रचंड आदर आहे. कामाच्या बाबतीत वाघचं आहेत ते आणि त्या वाघांनी एक झेप घ्यावी आणि कमिशनरांना ऑर्डर करावी की,तीन हजार रुपये प्रत्येक गरीबांच्या घरी पोहचले पाहिजेत. तरच आम्ही समजु की,तुम्ही राजकारण करत नाही. मा.महापौर साहेब,कोरोनाच्या काळामध्ये गेली दोन वर्ष झालं पुर्ण शहर नाही तर सगळं जग झुंजतय, तुम्ही, आम्ही सगळेजण प्रतिकुल परिस्थितीमध्ये काम केलं आहे. साहेब, मागच्या वेळेस हार्डीकर साहेब होते त्यावेळेस त्यांनी देखील प्रचंड काम केलं आम्ही त्यांच्यावर रागावलो,त्यांच्यावर टिका पण केल्या पण एक होतं त्यांच्याकडे बॅरिकेटस् नव्हत्या. साहेब,त्यांच्याकडे कर्टन्स नव्हते. तुम्ही चांगल काम केलं कुणाला माहित तुम्हांला आणि तुमच्या टिमला, तुमच्याकडं यायला पत्रकारांना पण मज्जाव तुम्ही यांच्याशी बोलत नाही,नगरसेवकांशी बोलत नाही, तुम्ही नागरीकांना ज्या कुठल्या भेटता ती सुध्दा तुमच्या बद्दल बोलत नाही.तर आपण चांगले आहात हे आम्हाला कसं कळायचं, आमच्याकडे मार्गच

नाहीत. आम्ही तरी काय करणार आहोत. कारण तुमच्याकडे जर समजा आम्ही आलो तर तुमचा सिक्युरिटी गार्ड असतो. दुर्देवाने बघा त्यादिवशी मी आणि आशाताई ढाकणेसाहेबांकडे बसलो होतो गप्पा मारल्या आणि कमिशनर साहेबांच्या कानावर घालावं आणि निघावं. मास्क होता, त्याला माहिती होतं नगरसेवक आहेत म्हणुन पण त्यांनी गेल्या,गेल्या त्यांनी हात आडवा केला त्यांनी फक्त पाहिलं त्याच्याकडे तो म्हणला साहेब, मिटींग मध्ये आहेत साहेबांकडे फक्त एकच अधिकारी होता मी ते पाहिलं आणि त्याला सांगितलं दार उघड मी जाणार आणि मी गेले.साहेब,मागच्या वेळेस सुध्दा आम्ही चर्चा केली आम्ही आपल्याला प्रेमाने सांगण्याचा प्रयत्न करतोय हे नका ठेवु, तुमच्याकडे नागरीक येतात तुम्ही शंभर टक्के चांगल काम करताय म्हणुन तुमच्याकडे येत असतील, रिझल्ट तर काय अजुन दिसलेला नाही. पण हे जे काही तुमच्याकडे सिक्युरिटी गार्ड आहे त्यांनी तुमच्याकडे येणा-या सदस्यांना त्यादिवशी माझ्या आधी तीन नगरसेवक राष्ट्रवादीचे बाकडयावरती बसलेले होते मला अत्यंत वाईट वाटलं,खुप वाईट वाटलं मला एक क्षण मनामध्ये असं आलं की, आपण त्याठिकाणी जोरात आवाज केला पाहिजे होता पण जोरात आवाज केल्यानंतर काय होतं ठराविक लोकांना आमच्या विरोधात बोलण्याची संधी मिळते. साहेब,तुम्हांला माहिती आहे का आमचं मोठंपण काय आहे. जे,जे लोक आमच्या विरोधात टिका करतात, वाटेल तशा मनकवडया गोष्टी लिहीतात आम्ही त्यांना धन्यवाद म्हणतो कारण त्यांची पोरंबाळ आम्हांला शिव्या घातल्यानंतर त्यांच्या घरी जेअन्न जाते त्यांचे ते स्पॉनसर ठरतात तिथं पैसे ते त्यांना देतात त्यांची पोरंबाळ आमच्याच मिठावरती जगतात आणि म्हणुन आम्ही त्यांच्या विरोधात बोलत नाही. आम्ही असे दारोदारी फिरत नाही. “निंदकाचे घर असावे शेजारी” जितकी त्याची निंदा होईल तितका तो व्यक्ती स्वत:ला कार्यान्वीत ठेवत असतो. तुमचं कसं झालं आहे तुमच्यापर्यंत तुम्ही कोणाला येऊच देत नाही त्यामुळे तुमचं खरं रुपचं कळत नाही. तुम्ही चांगले आहात का? असाल,काही गोष्टी तुम्हांला समजुन घ्यायला वेळ लागतो. आम्हांला मान्य आहे परंतु तुम्ही चांगल काम केलं तर चांगल सांगा, चांगल केलं म्हणुन तरी सांगा, त्याच्यासाठी जर आपण कोणाला भेटणार नसाल तर आपला चांगुलपणा कसा बाहेर येईल. आणि मग आमच्याकडे टिका करण्याशिवाय दुसरा काहीच पर्याय नसतो. मा.महापौर साहेब,या सभागृहामध्ये तीन हजार रुपये आर्थीक दुर्बल घटकातील नागरीकांना देण्याचा विषय केला होता. खरंतर आयुक्त साहेब,आपण त्याचा कायद्याचा बागुलबुवा केला.कायदा हा माणसासाठी असतो साहेब, माणुस कायद्यासाठी नसतो. आमचं असं म्हणणं आहे की,आपण वारंवार विभागीय आयुक्तांकडुन अभिप्राय का मागता? म्हणजे अगदी आम्ही स्पर्श आणि जम्बोचा अहवाल मागितला तुम्ही विभागीय आयुक्तांकडे

गेला, काय संबंध आहे विभागीय आयुक्तांकडे जाण्याचा हे सभागृह सर्वोच्च आहे. हा महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम आपल्याला लागु आहे. यामध्ये ज्या,ज्याठिकाणी महानगरपालिका म्हणलेले आहे त्या,त्याठिकाणी अर्थ असा आहे की,महापालिका म्हणजेच नगरसेवक निवडुन आलेले लोकप्रतिनिधी यांनी जे,जे काही सांगितलं असेल ते कायद्याच्या चौकटीत बसवुन त्याच्यावर अंमलबजावणी करण्याचं काम मा.आयुक्त साहेब, आपलचं होते जे आपण केलेलं नाही. आपण विभागीय आयुक्तांकडे गेला आहात. आम्हांला तीन हजार रुपये हे वैयक्तीक हवे होते का? आम्ही सांगितलं महानगरपालिका हद्यीतील गोरगरीब जनतेला त्यामध्ये वेगवेगळे क्रायटेरिया असतील एखादया वेळेस असं समजा साहेब की, आमची भावना किंवा आमचं मांडण चुकलं असेल, पण भावना त्यामागची निश्चितच चुकीची नव्हती. त्या भावनेनं करायला पाहिजे. आपण जर मनात आणलं असतं ना, तर भाऊसाहेब शंभर टक्के मा.कमिशनर साहेबांनी अंमलबजावणी करु शकले असते. या महापालिकेच्या अधिनियमाच्या पुस्तकाचं तुम्ही अवमान करत आहात. ज्याच्यामुळे आम्ही निवडुन येतो,आम्हांला आमचे अधिकार समजले जातात.आणि तुम्ही त्याचा सुध्दा अनादर करता. मा.राजेश पाटील साहेब,ज्यावेळेस तुम्ही याठिकाणी नवीन येत होतात त्यावेळेस आपल्या बाबतीत बातम्या चालू होत्या २/४ दिवसात तुम्ही येणार म्हणुन तुमच्या बाबतीत बातम्या सुरु झाल्या आणि आम्हांला कळलं की,हार्डीकर साहेब जाणार आणि राजेश पाटील साहेब येणार तर त्यावेळेस आपल्या बाबतीत माहिती छापुन आली होती वेगवेगळया वृत्तपत्रामध्ये, वेबसाईटवरती त्यामध्ये आपण एक पुस्तक लिहिलं आहे त्यामध्ये असं लिहिलं होतं की, “ताई, मी कलेक्टर व्हईनु” खानदेशामध्ये आईला ताई म्हणतात मी कलेक्टर व्हईनु म्हणजे मी कलेक्टर झालो. साहेब,खरं सांगु का,ज्यावेळस मी ती ओळ वाचली त्यावेळेस माझ्या डोळयातुन पाणी आलं, म्हणजे मी तुमचं सगळं पुस्तक वाचलं,आणि वाचल्यानंतर कळालं की, इतक्या गोरगरीब घरातील मुलगा कलेक्टर होण्याचं स्वप्न पहातो खानदेशातला दुर्गम भागातला तळेगावातला एखादा पोरगा एखाद्या ध्येयाने झोपाटला जातो आणि भारतीय प्रशासन सेवेमध्ये सामील होतो ओरीसासारख्या राज्यामध्ये आपण त्याठिकाणी कलेक्टर म्हणुन काम केलं. आणि त्यानंतर आपण इथं प्रतिनियुक्तीवर आलात,डेप्युटेशनवर आलात अत्यंत अभिमान वाटला साहेब,तुमचा, का अभिमान वाटला तर अनेक गोष्टी या तुमच्या आमच्या सारख्या होत्या. आम्ही पण खुप गरीबी पाहिली साहेब, आम्हांला असं वाटलं होतं की,जे वाडयावस्तीवर रहातात जे गोरगरीब असतात त्यांना इतर मागासवर्गीयांचा,मागासवर्गीय

समाजाचा,गरीबांचा खुप कळवळा असतो. दुर्दैवाने आपण तो खोटा करुन दाखवला.खरं,खरं व्हायला पाहिजे होतं हे, कलेक्टर व्हायचं हे तुमच्या आई,वडीलांच स्वप्न होतं हे तुम्ही पुस्तकात लिहिलं आहे. तुम्ही उनाडक्या करायच्या,बेदम मार खाल्ला, तुम्ही वाईट संगतीमुळे वहावत गेला होता परत तुम्ही चांगल्या घरात एका वेगळया ध्येयाने कलेक्टर झालात त्यावेळेस वय लहान असतं,मातीचा गोळा असतो,जसा आकार दिला तसा तो होतो. आता मला असं वाटतं की, राजकीय वाईट वळण लागलं की काय? तसा निर्णय घ्यावा लागला. कारण ज्या कायद्याचा तुम्ही आधार घेतला त्याच कायद्यामध्ये कायद्याची तरतुद मी तुम्हांला वाचुन दाखवते. तुम्ही खुप शिकलेले आहात,हुशार आहात,जगाचा इतिहास वाचलेले आहात,भुगोल वाचला असेल, आम्ही आपलं छोटे,छोटे आमचं रोज जसा माणुस तसा आमचा रोल करणा-यांची आमची जमात म्हणजे राजकारणी,अत्यंत सेन्सेटीव्ह वेळप्रसंगी तुटून पडणारी,वेळप्रसंगी मार खाणारी, शिव्या खाणारी,अपमान झेलणारी साहेब,हे जे पद दिसतं ना त्या पदाच्या खालच्या वेदना जर का आपण पाहिल्या नां ,हा अपमान जर का आपण बघितला तर तुम्ही म्हणाल मी तर खुप सुखी आहे बाबा पण सगळयांनी जर का तसं ठरवलं ना तर इथं बसलेल्यांची संख्या कमी होईल आणि तुम्हांला जाब विचारायला लोक कमी पडतील आणि मग तुमचं राज्य येईल. आणि म्हणुन आम्ही त्या सगळया शिव्या,अपमान सगळं झेलतो आणि परत तुमच्या समोर नव्या ताकदीने उभा रहातो. मा.महापौर साहेब,विभागीय आयुक्तांकडं जाण्याचं काही कारण नव्हतं आम्ही आपल्याला महापालिकेची तरतुद सांगितलेली आहे. त्यांनी कलम ६६ सांगितला होता. तुम्ही तो ही फेटाळला. स्पर्शचा अहवाल,जम्बोचा अहवाल तुम्ही तो विभागीय आयुक्तांकडे दिला,त्यांनी इकडे पाठवला नाही.आमचे असतील,तिकडचे असतील जे कोणी असतील ते जातील चुकीचं काम केलं भोगायचं,पुढचे नीट रहातात मागचे नीट रहातात का, पण तुम्ही ते ही नाही केलं. परत तुम्ही विभागीय आयुक्तांकडे गेलात म्हणजे आज जर समजा याठिकाणी हे जे पुस्तक आहे महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमानुसार तुम्ही नगरविकास विभागाकडे जायला पाहिजे होतं. म्हणजे तुमचं एकनाथ शिंदे साहेबांच्या बरोबर जमत नसेल त्यांना पण सांगितलं असतं ना, साहेब,तुम्हांला माहित नाही,शिव वडा पाव केंद्र, झुणका भाकर केंद्र, शिवभोजन,गरीबांसाठी घरं,एसआरए योजना अशा अनेक योजनांसाठी स्वर्गीय बाळासाहेब ठाकरेनी दिलेला आहे. मला वाटतं त्यांना विचारावसं असं त्यांनी सांगितलं तर नेमकं आम्हांला काय करायचं, नक्कीच त्यांनी तुम्हांला परवानगी दिली असती. आपण गेलोच नाही,आपण विभागीय आयुक्तांकडे गेलो ते तुमच्यासारखेच अधिकारी ते काय सांगतील,ते सांगुच शकले नाहीत. आणि म्हणुन तुम्ही

त्यांच्याकडे गेलात त्याचा आम्हांला राग आहे. आणि तुम्ही कायद्यातनं पळवाट काढली. आणि म्हणुन ताई,मी कलेक्टर व्हईनू या पुस्तकात जे तुम्ही लिहिलं नां साहेब, प्रत्येक माणसाचा स्वत:चा एक गर्व असतो आणि तो तुमचा गर्वतसाच टिकवुन ठेवण्यासाठी तुम्ही एक तरी हाक गरीबांची ऐकली पाहिजे होती ती तुम्ही ऐकली नाही. तुम्ही अजितदादांना सांगितलं असत ना साहेब, त्यांनीही सांगितलं असतं द्या म्हणुन मा.महापौर साहेब,कमिशनरांनी कलम ६६ चा आधार घेतला. कलम ६६ काय सांगत आहे महापालिकेच्या निर्णयुनसार तरतुद करता येईल अशा बाबी त्यामधील १(ब) साहेब, नागरी क्षेत्रातील गरीबी कमी करणे. याचा अर्थ काय, काय करणार आहात,तुमच्या पगारातुन पैसे द्यायचे होते का, त्यातनं काय व्यवसाय चालू करुन द्यायचे होते का, अजिबात नाही. मग त्याच्यामध्ये काय आलं,तर महिला बालकल्याणच्या अनेक योजना आहेत,मागासवर्गीयांच्या अनेक योजना आहेत, दिव्यांगाच्या अनेक योजना आहेत, विद्यार्थ्यांच्या योजना आहेत या सगळया योजनांवरती तुम्ही मार्ग काढायचा तर शंभर टक्के मार्ग निघाला असता. महानगरपालिकेच्या शाळांमध्ये ज्यावेळेस तुम्ही ड्रेस वाटप करता त्यावेळेस ४८ हजार विद्यार्थी हजर असतात,ज्यावेळेस वह्या वाटप करता त्यावेळेस ३८ हजार विद्यार्थी हजर असतात. ज्यावेळेस चप्पल, बुट वाटप करता त्यावेळेस ३९ हजार विद्यार्थी हजर असतात. हे जे सगळे विद्यार्थी होते ते सगळे स्लम मध्ये रहाणारे विद्यार्थी होते. त्यांच्या खात्यावर जरी आपण तीन,तीन हजार रुपये टाकले असते तर या शहरातील ४० हजार नागरीकांच्या घरी तीन हजार रुपये पोहचले असते. आपल्याकडे बचत गट आहेत ज्या बचत गटांना आपण अडीच/अडीच लाख रुपयांच कर्ज देतो. त्यांना जरी तुम्ही तीन/तीन हजार रुपये दिले असते तर त्याठिकाणी सुध्दा तीस/तीस महिलांचा गट आहे. एक चार/पाच हजार महिला आहेत त्यामध्ये नांव टॅली करायला पाहिजे होतं. एका घरात डब्बल मदत जायला नाही पाहिजे या मताशी आम्ही शंभर टक्के सहमत आहोत. तिथं तुम्ही मदत देवु शकला असता, विधवा महिलांना तुम्ही मदत देवु शकला असता,हातगाडी वाल्यांचा सर्व्हे झालेला आहे तिथं तुम्ही मदत देवु शकला असता. रिक्षावाल्यांना आपण गॅसकिट दिलेलं आहे त्यांना तुम्ही मदत देवु शकला असता. अंध-अपंगानाआपण दोन हजार रुपयांची पेन्शन देतो त्याठिकाणी आपण तीन हजार रुपये देवु शकला असता, इच्छा शक्ती हवी असते. आणि जिथं इच्छा शक्ती नसते त्याठिकाणी पळवाट असते. आणि म्हणुन मा.महापौर साहेब,मगापासून मी सांगत होते की, कमिशनरांना खुलासा करायला सांगा. आज आम्ही पुस्तक घेवुन आलो आहे. आम्हांलाही बघायचं आहे. खरंतर हे पुस्तक आम्ही कमिशनरांनाच भेट देणार होतो. आम्हांला असं वाटलं की, एखाद्याचा अवमान करु नये. मगाशी भाऊसाहेबांनी म्हणले की, कमिशनरांचा अवमान

होऊ शकतो किंवा नेत्यांचा अवमान होतो. अवमान करण्याची अजिबात इच्छा नाही कमिशनरसाहेब, याच्यामध्ये पॉझिटीव्हली आम्ही तुमच्या बरोबर आहोत. तुम्ही आणि आम्ही बरोबर चाललो तर,तरच हे शहर चालणार आहे. आमच्या आमदारांनी विषय दिला म्हणुन तुम्ही त्याला खो घातला का? ही शंका रास्त आहे नां, रास्त आहे. कारण जोपर्यंत आम्ही स्पेशल जी.बी.घेत नाही तोपर्यंत तुम्ही आम्हाला सांगितलं नाही. आणि असं नसतचं साहेब, म्हणजे मला असं वाटतं की, मी तर असं म्हणते की, दिवसभरात शंभर,दोनशे,तीनशे लोकांना देते. कुठल्याही वॉर्डातला,भागातला व्यक्ती आला नां साहेब, तो जीवनाचं रहस्य कसं जगायचं हे तुम्हांला शिकवुन जातो. आणि त्यांच्याकडनं घ्यायचं असतं. पण तुम्हांला वाटलं,आम्ही काय? तुम्ही कलेक्टर, नाही साहेब,व्हेरी सॉरी, आम्ही राजकारणी आहोत ना साहेब, पण आम्ही माणसंच आहोत नां,आम्हांला भावना आहेत नां, भावना आहेत सर आम्हांला. भावना जर नसत्या नां साहेब तर मागच्या कोरोनाच्या काळात या महापालिकेच्या या सभागृहातील लोकांनी बोटावर मोजण्याइतक्या लोकांनी जेवण घेतलं असेल,आमच्या सारख्या लोकांनी ७०/७० दिवस आम्ही आमच्या खर्चानी वरण,भात,पोळी भाजी,संध्याकाळी भाकरी भाजी सगळया प्रकारच्या लोकांना अन्नदान केलेलं आहे परंतु त्याचा व्हीडीओ किंवा फोटो काढून प्रसिध्दीसाठी टाकला नाही. कारण त्याची गरज नाही. दान होतं ना अन्नदान म्हणुन ते करत नव्हतो. दान करत असताना या हातानं केलं तर त्या हाताला कळू द्यायचं नसतं. यावेळेस सुध्दा तशी परिस्थिती होती जितकी जमेल तेवढी मदत आम्ही केली फक्त या शहरातील नागरीकांना सांगायचं होतं की, महापालिका,प्रशासन या शहरातील असणारे सर्व राजकारणी तुमच्या बरोबर आहेत घाबरुन जाऊ नका, एवढंच त्यांना सांगायचं होतं. आणि नुसते फोटो काढले असते नां साहेब,लोकांना कितीही लेक्चर द्या लोकांना काही फरक पडत नाही. साहेब,मी बालाजीनगरच्या भागाचं प्रतिनिधीत्व करते.अभिमान आहे मला मी त्या भागाचं प्रतिनिधीत्व करते. माझ्या भागातला एकही माणुस कुणाकडेही हात पसरायला गेला नाही. तेवढे खमके आहोत आम्ही तिथं परंतु त्यांना दिलासा द्यायला महापालिका निश्चितच कमी पडली आहे. हे याठिकाणी खेदाने नमुद करावसं वाटतं. मा.कमिशनर साहेब,अजुनही वेळ गेलेली नाही, मा.महापौर साहेब,कायद्याच्या ज्या काही चौकटी घालुन घेतलेल्या आहेत त्यांनी स्वत: ला त्यातुन कमिशनर साहेब,तुम्ही थोडं मोकळं करा, जेणेकरुन तुम्हांला आणि आम्हाला चांगल काम करता येईल. गेल्या अनेक दिवसापासून साहेब आपल्याकडे कामाचा ओघ वाढलेला आहे हे आम्हांला कळतयं परंतु याच्यामध्ये सुध्दा हे काम तितकचं महत्वाचं होतं जे की,तुम्ही ते करण्यास नकार दिलेला आहे. आणि म्हणुन खरंतर आमच्या बोलण्याला धार लावुन आलो

आहोत. साहेब,कायदा कुणासाठी असतो. अगदी पुरातण काळामधील सुध्दा उदाहरण देता येईल महाभारत असेल, तुम्ही गीता वाचली असेल अनेकजण या ठिकाणी बसलेले आहेत तुम्ही कुणालाही विचारा साहेब,दान करण्याच्या बाबतीत आमची जमात खुप पुढं आहे. आणि ज्यांना गरज आहे नां, तो कोण आहे शोषित आहे अनेक वर्षांचा त्याच्या पाठीशी कोणी नाही साहेब, फक्त सन्मानाने त्याला मदत मिळावी एवढीच एक भूमिका होती. आणि ज्या प्रकारचं कलेक्टर म्हणुन तुम्ही स्वत:ला वर आणलं साहेब,सगळयांनाच ती प्रेरणा मिळत नाही. आणि म्हणुन अनेक लोक ज्याच्या त्याच्या पध्दतीने ते आयुष्य काढत असतात म्हणुन त्यांना एक मदतीचा हात द्यावा म्हणुन खरंतर आपण प्रयत्न करायला हवा होता. आणि एखाद्या गोष्टीसाठी साहेब, पुढे त्याचा रिझल्ट खुप चांगला येणार आहे. एखादया गरीबाला मदत होणार आहे,त्याचा जीव वाचणार आहे. कोणाचा भुकेने तडफडुन जीव जाणार नाही त्यासाठी तुम्ही जर का हा विषय केला असता नां साहेब तर निश्चितपणे देवाने आणि लोकांनी पण तुम्हांला खुप आशीर्वाद दिला असता साहेब पण आपण नाही केलं साहेब, गीतेमध्ये भगवान श्रीकृष्णाने अनेक वार नाही थांबवले उदाहरण द्यायचं झालं तर गांधारीने नव-याच्या डोळयाला पट्टी बांधली होती दुर्योधनाचे दुष्कृत्य इतके वाढले होते की, भगवान श्रीकृष्णाला माहिती नव्हते याचा जर का अंत करायचा असेल तर काय करावे लागेल म्हणुन त्यांनी चुकीचं काही सांगितलं समाजासाठी काय चांगलं होतं ते गांधारीनं सांगितलं की,मला माझ्या पुत्राला भेटायची इच्छा आहे. आणि जात असताना भगवान श्रीकृष्णाने अंर्तवस्त्र नेसुन जायला दुर्योधनाला सांगितलं. गांधारीने डोळयाला पट्टी बांधली होती नां तरी त्यांना इतकी शक्ती प्राप्त झालेली होती की,त्या बघु शकत होत्या. दुर्योधनावरती ज्यावेळेला हल्ला झाला अंर्तवस्त्र नेसुन गेला त्यामुळे तिथे त्यांच्या जांगेवरतीचगदा मारुन त्यांचा मृत्यु झालेला आहे. त्याच कारण कायआहे की,त्यांनी समाजासाठी चांगल काम केलेलं होतं. आणि चांगल्या कामासाठी लोक नेहमी पाठीशी उभी रहातात. पुरातन काळातले दाखले घेतले तर आज जे काही दाखले बघाल तरतुम्हांला सगळयामध्ये अनेक किस्से तुम्हांला सापडतील. आणि तुम्ही ते केले नाहीत म्हणुन तुमच्यावरती आमचा राग आहे. आपण कलम ६६ १ (ब) च चुकीच इंटरप्रिटेटेशेन केलेलं आहे. आणि त्यांना मा.महापौर साहेब, आपण त्यांना पैसे देवु शकतो. अशा, अशा पध्दतीनं त्यांना पैसे देता येतील असे मी मा.कमिशनर साहेबांना विनंती करणार आहे. साहेब,आपण ज्या समाजातुन,ज्या परिस्थितीतुन वर आला आहात त्या समाजातुन आम्ही सुध्दा वर आलेलो आहोत झोपडपट्टीत राहणारा,चाळीत राहणारा जो गोरगरीब वर्ग आहे हा जास्तीत जास्त मागासवर्गीय समाज आहे. आणि त्याच लोकांना ख-या अर्थानं मदतीची गरज होती. आणि ती

मदत आपण याठिकाणी नाकारलेली आहे. डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी जे संविधान लिहिलं आहे  त्यामध्ये अशा अनेक गोष्टी लिहून ठेवलेल्या आहेत. परिस्थिती आल्यानंतर पुढे काय केले पाहिजे आणि त्या परिस्थितीचा आपण खरंतर अभ्यास करुन काम करायला पाहिजे होतं. जे आपण केलं नाही आणि एक प्रकारे जो आर्थीकदृष्टया मागासवर्गीय समाज आहे त्यांच्यावरती आपण अन्याय केलेला आहे. तुम्ही जशा  परिस्थितीतुन वर आला आहात त्याच परिस्थितीतुन आम्ही पण वर आलो आहोत. आणि म्हणुन या परिस्थितीत काम करताना आपण खुप संवेदनशिलपणाने काम करायला पाहिजे होते ते आपण केलेलं नाही. आणि म्हणुन मा.महापौर साहेब,आपण कमिशनरांना सांगावं की, आपण ज्या कलमांचा आधार घेतलेला आहे आपण वारंवार विभागीय आयुक्तांकडे वारंवार जाऊ नका, आम्ही  कुठल्याही कलमाचा आधार घेतलेला नाही  त्यामुळे त्यांनी ज्या कलमाचा आधार घेतलेला आहे, कलम टाकलं असेल तर आम्ही तुम्हांला नवीन ठराव करुन देवु परंतु आपण हे देवु शकतो आणि आपण हे द्यावं त्याच बरोबर साहेब,आपल्या महानगरपालिकेच्या सर्व शाळा बंद आहेत.प्रायव्हेट असतील,महापालिकेच्या असतील या सगळया शाळा राज्य शासन मान्य करते. मा.कमिशनर साहेब,जसं राज्य शासन मुलांना धान्य देतं तसं आपण त्यांना या धान्यासाठी पैसे देवु शकतो. पहिली ते पाचवीच्या विद्यार्थ्यांना राज्य शासन पाच किलो धान्य देतात. ६० दिवसासाठी देतात ६ किलो तांदुळ, ५६ दिवसासाठी देतात साडेपाच किलो तांदुळ या सगळयासाठी पैसे पण लागतात नां, हीच मदत जसं राज्य शासन करतं तशीच मदत आपण पण केली पाहिजे. मा.कमिशनर साहेब,तुम्ही याठिकाणी चांगलं काम करावं सगळयांना समजुन घेवुन काम करावं. मगाशी राजेंद्र लांडगे यांचा जो विषय आहे तो खरंतर आमच्या प्रभागात आहे. पाण्याची टाकी बांधण्याचा विषय आहे.अजितदादा आपण बिल्डर आहात, तुम्हांला माहिती आहे टाकी बांधायला किती जागा लागणार आहे. आखी जागा जात नाही,तुम्ही जागेवरती या, खरंतर मी असे म्हणते की, पाण्याचा विषय आहे,लोकांना पाणी मिळत नाही. आणि त्याठिकाणी आम्ही चारही नगरसेवकांनी कुठलाही विरोध दर्शवलेला नाही. आणि म्हणुन आपण त्याठिकाणी पाणी टाकी केली पाहिजे,लोकांना  पाणी दिलं पाहिजे. आणि यासाठी आपण प्रयत्न केले पाहिजेत. मगाशी अनेक नगरसेवकांनी सांगितलं आहे की, अनेकांनी त्यांच्या वॉर्डामध्ये पोस्टर्स लावले आहेत,  पोस्टर्स लावल्याने काय होतय, आडातचं नाही तर पोह-यात कुठनं येणार आहे. राष्ट्रवादीला हे करावंच लागेल नाही तर लढायला जाऊ, विषय घेवुन रस्त्यांवर यावं लागेल. तुम्ही काहीच करत नाही, नुसतं पोस्टर बघताय, कृतीशुन्य पोस्टर्स लावण्यात काही मजा नसते. त्याच्यासाठी कृती लागते. आणि तुम्ही कृती करत नाही त्याच्यामुळे त्यामुळे अशा पोस्टर्सची

टेंशन घेण्याची गरज नाही. ते पोस्टर्सच लावले आहेत ते राजकारणी आहेत राजकारणात मी जिवंत आहे हे दाखवण्याचा एक त्यांचा प्रयत्न असतो.आणि म्हणुन ते प्रयत्न करतात. आणि ते प्रयत्न आपण सहनच केले पाहिजेत. तुम्ही आणि आम्ही सगळेजणांनी लक्षात घेतलं पाहिजे की, मी आपण सत्ताधारी आहोत आपल्याला सुध्दा जाग्यावर बसुन घाम यायला लागलेला आहे. आज जर का कोणी बोललं नाही तर, लक्षात ठेवा पुढच्या सहा महिन्यात टांगा पलटी घोडे पुढे करावं लागणार आहे. आणि जर असे पोस्टर्स लागलेअसतील तर त्याला पॉझिटीव्हली घ्या, आणि वॉर्डा,वॉर्डामध्ये,गल्ली बोळामध्ये घुसा आणि सांगा लोकांना की,आम्ही इतकी चांगली कामे केलेली आहेत,आम्ही लोकांच्यासाठी काम करतो, आम्ही लोकांच्या बरोबर आहोत. आपण चांगल्या कामाला सुरुवात केली,चांगल काम सांगायला सुरुवात केली तर निश्चितपणे अशा पोस्टर्सचा आपल्याला काहीही परिणाम होणार नाही. यामुळे मा.कमिशनर साहेब, मी तुम्हांला परत एकदा विनंती करते की,आपण या तीन हजार रुपयांचा विषय त्वरीत निकाली काढावा. अन्यथा आम्हांला आंदोलनाच्या स्थितीत यावं लागेल. आणि साहेब,तुम्ही जे कायदा,कायदा,कायदा सांगता नां साहेब, याच कायद्याचा आधार घेवुन मी तुम्हांला चार महिन्यापुर्वी स्मार्ट सिटीच्या संदर्भात पत्रं दिले आहे. साहेब,मी पत्रं देते नां ते कायद्याचं कलम टाकुन तुम्हांला पत्रं दिलं आहे. तुमची पत्र मला मुलांकडुन येतात साहेब, आपल्याकडे मुली बघण्याचा कार्यक्रम नाही की,या,या दिवशी असं,असं घडलं होतं साहेब,कायद्याचा आधार घेवुनच मला पत्राचं उत्तर द्या. तुम्ही नवीन आला होता तेंव्हापासून माझी सुनावणी पेंडींग आहे तुमच्याकडे वेळ असेल तर सुनावणी पण घ्या म्हणजे राष्ट्रवादीला चांगल काम करायला संधी आमच्या चुका झाल्या असतील तर दुरुस्त करायचं सुध्दा काम केलं आहे. तुम्हांला आम्ही संधी देणार नाही. पण साहेब,कायदा पाळण्याचीआमची जमात आहे आम्हांला पण कायदा पाळायला आवडतो. आणि म्हणुन आज जी कायद्याची तरतुद सांगितली आहे त्या कायद्यांमध्ये गरीबी दूर करणे, हा जो महत्वाचा निर्णय आहे. महत्वाचं म्हणजे महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमामध्ये १ (ब) मध्ये जे लिहिलेलं आहे. त्याची आपण अंमलबजावणी कराल सर्वशक्तीनिशी कराल आणि त्याचवेळेस ख-या अर्थानं ताई, मी कलेक्टर झाल्याचा जो सांगण्याचा अधिकार आहे नां साहेब,आम्ही पण तुमच्या आईला सांगू की,आई,तुमचा कलेक्टर पोरगां महापालिकेत येवुन गोरगरीबांच्यासाठी इतकी चांगली योजना राबवतो खरंच आई उदो म्हणुन जितकं धन्य धन्यता झाल नां,तितकंच आम्ही सुध्दा बहीण म्हणुन धन्य,धन्य होऊ धन्यवाद.

**मा.राहूल कलाटे -** मा.महापौर साहेब,मा.आयुक्त साहेब,सन्मा.सभागृह  गेल्या दोन/तीन तासांपासून या सभागृहामध्ये गोरगरीब लोकांना तीन हजार रुपये देण्यासाठी चर्चा करीत आहोत. आणि हे तीन हजार रुपये दिले गेले नाहीत म्हणुन आपण याठिकाणी चर्चा करत आहोत. ही योजना जाहीर झाली त्यावेळेस वृत्तपत्रात बातमी वाचून झाली त्यानंतर नऊ दिवसांनी मी स्वत: प्रेस घेतली आणि त्यामध्ये आपण ही योजना जाहीर करत आहात त्यावेळेस त्याचा फॉर्म कसा असेल, त्याची पुढची रुपरेषा कशी असेल, तीन हजार रुपये नाही,पाच हजार रुपये द्या लोकं अत्यंत वाईट परिस्थितमध्ये आहेत त्यांना अशा वेळेस मदत करणं आपलं काम आहे. आणि ही मदत करण्याची संधी आपल्या सर्वांना आली होती. आणि त्यादृष्टीकोनातून मी सुध्दा मागणी केली होती की,तीन हजार रुपयेच्या ऐवजी पाच हजार रुपये द्या. जी.बी.ठराव आला होता त्यावेळेस माई,आम्ही तुम्हांला सांगत होतो की,आम्हांला या विषयांवर बोलू द्या. आमचा कोणाचाच या विषयाला विरोध नाही. बिल्कुल नाही,आणि तीनच्या ऐवजी पाच हजार द्या. याला द्या नं,त्याला द्या असा कोणाचाही भेदभाव न करता ज्याला त्या पैशाची खरी गरज आहे. त्या प्रत्येकाला ही तीनच्या ऐवजी पाच द्या परंतु अचानक आपण जनरल बॉडीला विषय घेतला त्या विषयावर आपण बोलू पण दिलं नाही. एवढा महत्वाचा विषय असताना आपण त्या विषयावर का बोलू दिलं नाही. यागोष्टीचं देखील आश्चर्य वाटतयं कायद्यात बसतंय,नाही बसतयं,मला वाटतं राहूलदादांनी सांगितलं आहे की,असाच विषय दोन हजार रुपये देण्याचा हार्डीकर साहेब असताना झाला होता. त्यावेळेला हार्डीकर साहेबांनी सांगितलं होतं की,कायद्यात तरतुद नाही. त्यामुळे आपण देवु शकलो नाही. त्यावेळेस हार्डीकर साहेब देवु शकत नव्हते तर ते का देवु शकत नव्हते याचा खरंतर आपण माई,आणि आयुक्त साहेबांनी बसुन करायला पाहिजे होता. आणि मग ही योजना या शहरातील जनतेसमोर आणायला पाहिजे होती. मी या शहरातील कष्टकरी आणि रिक्षाचालकांच्या बाबतीत सुध्दा बोललो आहे. त्यांच आंदोलन इथं नव्हतं ते  विभागीय आयुक्तांकडे होतं. त्यावेळेस मी त्यांना विचारलं तुमचं नक्की काय मागणी आहे. त्यांनी सांगितलं की,आमच्या १४ हजार लोकांना ऑनलाईन पंधराशे रुपये आलेले आहेत राज्य शासनांकडुन आणि पाच हजार लोकांना आलेले नाहीत त्यातील चोवीसशे लोकं त्यांना परत संधी देणार आहेत त्यांच्याकडे काही डाक्युमेंटस काही चुकीचे होते. असं जर आपण म्हणलं तर या शहरामध्ये रिक्षाचालक हे तीस हजार आहेत. त्यावेळेस मी पण पक्षनेत्यांना विचारलं होतं की,तुमच्याकडे रिक्षाचालकांचा डाटा आहे का?  किती लोक आहेत,त्याच्यामध्ये कोण,कोण घेतले आहेत. फक्त रिक्षाचालक तीस हजार असतील तर बाकी सगळे मिळून एक/दोन लाख होतील त्यांच्यासाठी निर्णय जाहीर करताना सांगायला पाहिजे

होतं की,तुम्ही फॉर्म उपलब्ध करुन द्यायला पाहिजे. आमची अशी,अशी योजना आहे, महापालिकेने याला मंजुरी दिलेली आहे,राज्य शासनाने मंजुरी दिलेली आहे. असं न करता,आपण जाहीर केलेली योजना आम्ही या महापालिकेत असताना सुध्दा आम्हांला वृत्तपत्रातुन वाचायला मिळते की,ही योजना महापालिकेने जाहीर केलेली आहे. मी नऊ दिवस वाट पाहिली आणि नवव्या दिवशी प्रेस घेतली आणि मग मी अहवाल दिला. तुम्ही योजना जाहीर केली त्याचा फॉर्म कसा आहे,त्याची रुपरेषा काय आहे, मग त्याच्यामध्ये हा सोपस्कार पार पडला असता.हे जर आपण आगोदरच केलं असतं ना मला आयुक्त साहेबांची बाजु घ्यायची नाही. याचं कारण असं आहे की,हे सभागृहाला आता कुठं कळलं आहे की,आयुक्त साहेब,हे आपल्या विचाराचे नाहीत आज मला दिसतंय. पण एका बाजुला आपण सांगतो की, भाऊसाहेबांनी सांगितलं आहे की,भावना आणि कायदा याचा संयम घालू नका, ज्यावेळेस भारतीय जनता पार्टीने ही योजना जाहीर केली त्यावेळेस त्यांनी सर्वांना विश्वासात घ्यायला पाहिजे होतं की,आपण अशी,अशी योजना जाहीर करतोय आपण सगळेजण मिळून डिस्कस करु,त्याच्यावर मार्ग काढु, आयुक्तांशी चर्चा करु, डिव्हीजनल कमिशनरांनी ऑब्जेक्शन घेतलं आहे त्यांच्याशी चर्चा करु, राज्याकडं जाऊन चर्चा करु परंतु असं कुठलंही न करता मी तर म्हणेण की, आपण सवंग लोकप्रियतेसाठी ही योजना तुम्ही जाहीर केली. नाही तर तुम्ही ही योजना अभ्यास करुन आणली असती. मागच्या वेळेस आपण विविध माध्यमातून लोकांना मदत करण्याचा प्रयत्न केला आहे. यावेळेसचा पिरीएड जरी कमी असला तरी आपल्या इंडीयन मेंटलीप्रमाणे आपल्या माणसांची पैसे साठवण्याची सवय असते. मागच्या वेळेस लोकांनी कसे तरी दिवस काढले परंतु यावेळेस ती परिस्थिती नव्हती. त्यावेळेस पूर्ण लॉकडाऊन नव्हता तरी लोक हवालदिल झाले होते. आपण पाहिलं असेल,प्रत्येक घरात पेशंट होता. असं असताना देखील लोक इकडं तिकडं फिरत होती. कुणी तरी त्यांना मदत करावी,कोणी तरी त्यांना दोन गोड शब्द बोलावे. जेणेकरुन त्यांना त्याचा आधार मिळेल. आशा प्रकारे काही जण अशा अँटीबॉडीजची वाट पहात होती. आणि साहेब,ही सुध्दा एक अँटीबॉडीज आहे महानगरपालिका तीन हजार,पाच हजार देण्याचा जी काही प्रयत्न करत होती. ती सुध्दा या शहरातील नागरीकांसाठीच म्हणुन काम केलं असेल. परंतु काय झालं आज आपणच या सभागृहात आरोप प्रत्यारोप करतो आहे. परंतु आयुक्त साहेब,माझी आपल्याला या शहरातील नागरीक,नगरसेवक म्हणुन विनंती आहे की, आपल्याला खरंच असे पैसे देता येत असतील तर ते दिले पाहिजेत. नाही,तर आमचे अंबरनाथ कांबळे यांनी सांगितले प्रमाणे आम्ही १२८ जण आहोत प्रत्येक ठिकाणी बोर्ड लागतो की,काय? सिमाताईंनी आता सांगितलं आहे की, आपण जर आपल्या

कामावर विश्वास टाकला आणि जर आपला संबंध असेल तर तुम्ही आंदोलन करा,काही करा आम्ही तुमच्या बरोबर आहे. पण ताई,मला हे पण सांगायचं आहे की,आपण सांगितलं आहे की, मला वाटतं राष्ट्रवादी आंदोलन करायला कुठं तरी कमी पडत आहे. पण मला वाटतं बीजेपीचे तीनच सदस्य होते पण ते आंदोलनानी सत्तेत आले नाहीत. पटापटा उडया मारुन सत्तेत आले आहेत. इकडनं तिकडं अन तिकडनं इकडं परंतु राजकारण हा विषय गौण राहील.आयुक्त साहेब,आपल्याला असे पैसे देता येत असतील तर ते द्यावे निश्चित चांगलं होईल. खरंतर मी सिमाताईंचं अभिनंदन करायला हवं पण ताई,मी आगोदरच सांगतो. मी जे बोलतोय ते तुम्ही पॉझीटीव्हली घ्या. नाही तर तुम्ही सांगितलचं आहे निर्णय घ्यायला अजितदादा वाघचं आहेत. वाघ पण आला आणि अजितदादादा पण आला ताईंनी दोन्हींचं कॉम्बीनेशन केलं आहे. त्यांनी मनात आणलं तर लगेच आयुक्तांना पण सांगतील आणि विभागीय आयुक्तांना पण सांगतील तीन हजार रुपये देवुन टाका म्हणुन. ताई,असाच एक ५६ इंचाचा एक वाद या देशामध्ये आहे. तुम्ही त्यांनाही सांगा आम्ही सगळेजण १५ लाख रुपयांची सगळेजण वाट बघतोय. त्याची पण एक तारीख घ्या त्यांनी ते वेळेत दिले पाहिजेत. सात वर्षात आपल्याला काही वाटलं नाही,आपल्याला कोणी मदत दिली नाही दिली. सात वर्ष आपण वाट पाहिली आता गरज होती,आता काही गरज नाही,कसं तरी भागवतोय, पण आता लोकं हवालदिल झाले आहेत. ते १५ लाख रुपये कसे मिळतील याचा सभागृहाने एक ठराव करुन आपण तो केंद्राला पाठवून देवु. आणि तुम्ही पण आम्हांला हे १५ लाख रुपये द्या. म्हणजे हे १५ लाख रुपये मिळण्यासाठी कुठल्या कायद्यात बसते का ते बघा आणि केंद्राला पण गाईडलाईन्स द्या. आम्ही असे,असे पंधरा लाख मिळण्याचा ठराव पास केला आहे आणि ठराव सिमाताईंकडे द्या ते फडणवीसाकडे तरी जातील. आयुक्त आताच सर्वांनी पोटतिडकीने याठिकाणी बोलले आहेत. इलेक्शन आलेलं आहे आणि अशा प्रकारची योजना जाहीर होणं,त्याची अंमलबजावणी होणं, नाही तर नागरीकांना असं कुठं तरी वाटायला नको की,इलेक्शन आल्यामुळे ही योजना जाहीर केली आहे. आम्ही सगळेजण प्रामाणिकपणे आपल्या बरोबर आहोत. आयुक्त साहेब,याठिकाणी पक्ष वगैरे बाजुला ठेवुन मदत करावी.यापुर्वी हार्डीकर साहेब होते ते कोणत्या पक्षाचे होते हे आम्ही कधी बोललो नाही. किंवा त्यांच्यावर टिका करत बसलो नाही. आता राजेश पाटील साहेब,हे कुठल्या विचाराचे आहेत असं म्हणण्यापेक्षा त्यांच्या पदाचा जर आपण मान ठेवला तर बरे होईल.मा.महापौर देखील आयुक्तांशी बोलताना कधी पाहिलं नाही की,त्यांनी आयुक्तांची अवहेलना होईल अशा दृष्टीकोनातून बोलले नाहीत. सभागृहातील कुठलाच नगरसेवक त्यादृष्टीकोनातून बोलत नसतो. परंतु प्रत्येक नगरसेवकांना वाटतं की,आपण आपल्या भागातील

नागरीकांना मदत करावी. जेणेकरुन गोरगरीबांचा उदरनिर्वाह होईल. आणि आयुक्त साहेब,आपण पुन्हा एकदा या गोष्टीकडे पॉझिटीव्ह दृष्टीने पहावं.आणि विकासनी आता सांगितलं आहे की, तुळापुर ग्रामपंचायतीला पैसे देण्याचा विषय सांगितला आहे त्यामध्ये आपण लक्ष घाला. ज्यावेळेस आपण पाच लाख रुपये देण्याचा ठराव केला त्यावेळेस असं सांगण्यात आलं की,महापालिकेला पाच लाख रुपये देण्याचा अधिकार नाही. म्हणुन तो ठराव आपण दोन लाख नव्याण्णव लाख रुपये देण्याचा केला होता. कुठल्याही संस्थेला पैसे द्यायचे असतील तर तो तीन लाख रुपयेच्या आत पाहिजे. म्हणुन तो ठराव केला आणि परत अशा प्रकारचं उत्तर दिलं जात असेल तर तो आमच्या सर्वांच्या भावनेचा विषय आहे. संभाजी महाराज यांच्या संबंधित असं हे तुळापुर गाव आहे. आपण त्यात लक्ष घालावं. आणि जर आपल्याला असे पैसे देता येत नसेल तर आपण हे राज्य शासनाकडे पाठवून द्या. आपण सर्वजण मिळुन त्याचा पाठपुरावा करु. राहुल जाधव साहेब,तुम्ही हार्डीकर साहेबांचा कुठला विषय सांगितला होता. तुम्ही म्हणले होते नां,हार्डीकर साहेबांच्या काळात दोन हजार रुपये देण्याचा ठराव केला होता पण ते दिले नाहीत. पण त्यावेळेस तुम्ही या पध्दतीने त्यांच्या बरोबर भांडले नाहीत. कारण काय? त्यावेळेस ऑनलाईन जी.बी.होती. आयुक्त साहेब,हा विषय झाल्यानंतर मला अजुन एक अभिनंदनाचा ठराव करायचा आहे. प्राधिकरणाचे विलनीकरण पीएमआरडीए मध्ये केल्यामुळे महाराष्ट्र सरकारचं याठिकाणी अभिनंदन करावं लागेल. याठिकाणी थांबतो धन्यवाद.

**मा.राजु मिसाळ -** मा.महापौर साहेब,मा.आयुक्त साहेब,सन्मा.सभागृह आज या सभागृहात आर्थीकदृष्टया दुर्बल घटकांना तीन हजार रुपये देण्याच्या विषयावर चर्चा चालू आहे. मला वाटतं सिमाताई तुम्हांला या विषयांवर बोलायचं नव्हतं. तुम्ही नंतर एवढया जोमात का उठले हे मला कळलचं नाही. माई,ज्यावेळेस तुम्ही हा विषय दाखल करुन घेतला त्यावेळेस या विषयावर चर्चा न करता तुम्ही ती मिटींग संपवली. माई,ही एवढी वेळ आलीच नसती आता राहूलदादांनी सांगितलं आहे की, ज्यावेळेस तुम्ही असा विषय आणता त्यावेळेस त्या विषयावर चर्चा होऊ द्यां ना. एवढा विषय झाल्यानंतर नगरसेवकांच्या ऑफिसच्या बाहेर लोकांच्या रांगा लागणारंच नां, आज ब-याच नगरसेवकांच्या वॉर्डामध्ये आर्थीकदृष्टया दुर्बल घटकांची संख्या जास्त आहे. आणि त्यामुळे या नगरसेवकांच्या ऑफिसच्या बाहेर ही गर्दी झाली नसती. माई,तुम्हांला या सभागृहाचा फार मोठा अनुभव आहे तुम्ही सिनियर आहात तुम्हांला कोणी तरी सांगितलं आणि तुम्ही तो विषय घेतला. मगाशी असं सांगण्यात आले की,गटनेत्यांच्या मिटींगमध्ये ठरवण्यात आलं आहे. मी सभागृहाला सांगु इच्छितो की, या विषयाच्या बाबतीत कुठल्याही गटनेत्याला बोलावलं गेलं नव्हतं. गोरगोरीबांसाठी आर्थीक मदत देण्याचा असा

धोरणात्मक विषय आणायचा असेल तर आमच्याही वॉर्डामध्ये असे काही लोक आहेत. आयुक्तांना जसं तुम्ही दालनामध्ये बोलवून सांगितलं होतं तसं आम्हांला पण तुमच्या बरोबर घ्यायचं होतं ना ,आम्हांला जर बोलावलं असतं तर आम्ही पण सांगितलं असतं ना, आता आमच्या नेत्याचं नांव घेतलं गेलं की,हे न देण्यामाग कोण आहे, कोण मांजर आडवं गेलं हे असं काय,काय बोलण्यात आलं. मगाशी जसं अजितदादांनी सांगितलं तसे मी सभागृहाला सांगेन की, या शहराची जडणघडण ज्या माणसांने केली त्या माणसांच्या बाबतीत बोलताना थोडासा आदर ठेवुन बोलावे. कारण मला असं वाटतं की,या शहराच्या बाबतीत दादा हे या शहरामध्ये पालकमंत्री म्हणुन दर शुक्रवारी मिटींग घेतात. माई,ज्यावेळेस तुमची सत्ता होती त्यावेळेस पालकमंत्री म्हणुन कधी मिटींग घेतली होती का? आपल्या शहरामध्ये कधी आले होते,त्यांनी या शहराच्या बाबतीत कधी चर्चा केली होती का? कधीच नाही, दुसरी गोष्ट पीएमआरडीए चं ऑफिस हे आमच्या शहरामध्ये होते ते पुण्यामध्ये हलवलं आहे. तीन हजार रुपये देण्याचा जो विषय आहे या विषयाशी आम्ही सर्वजण सहमत आहोत गोरगरीबांना हे दिलं पाहिजे. मगाशी सिमाताईंनी कायदा वाचुन दाखवला.आयुक्त साहेब,जर हे होत असेल तर आणि जर आपल्याला हे देता येत असेल तर आपण या लोकांचा विचार करुन नक्की मदत देण्यात यावी. पण माई,तुम्ही या गटनेत्यांना विश्वासात घेवुन हा विषय आणला असता तर योग्य झालं असतं. या विषयावर चर्चा करण्यासाठी हात वर केला तर तुम्ही हा विषय मंजुर करुन दुसरा विषय घेतला होता. आज या सभागृहाचा एवढा वेळ वाया गेला नसता. आणि आयुक्त साहेबांच्या बाबतीत सांगितलं गेलं आहे की,आयुक्त साहेब,हे आपली कामे आडवायला आलेले आहेत. नकारार्थी भूमिका घेत आहेत तर मी असे म्हणेन की, हार्डीकर साहेबांच्या काळ हा आपल्या आयुष्यामधला यावर्षीमधला आपला जो काळ आहे तो सगळा काळ मी पाहिलेला आहे. त्याच्यानंतर याच्या पाठीमागचा पण काळ मी पाहिलेला आहे. हार्डीकर साहेबांच कसं होतं माहिती आहे का,जसा काळ असेल तसे ते थोडं इकडे व्हायचे तसा आमच्या राजेश पाटील साहेबांच तसं नसेल. आयएएस ऑफिसर आपल्याकडे बंड साहेब,शर्मा साहेब, राजीव जाधव साहेब होते.राजीव जाधव साहेबांनी तर महापालिका आणि हे सभागृह कशा पध्दतीनं सांभाळलं आताचे राजेश पाटील साहेब,हे ही सभागृह समजुन घेत आहेत. त्यांना हे समजुन घ्यायला अजुन थोडा वेळ द्या. कोविड मध्ये दोन महिने गेले आहेत. आयुक्तांनी पडदयाच्या आत मध्ये चांगल्या प्रकारे काम केलं आहे. यांची काम करण्याची पध्दत जरा थोडी वेगळया पध्दतीची असेल तर माझे म्हणणे आहे की, आयुक्त साहेबांनी आपल्या महाराष्ट्रात कुठंही डयुटी केलेली नाही ते डायरेक्ट ओरिसाहून आलेले आहेत. सिमाताई,आपण त्यांच्या पुस्तकाच्या ओळी

वाचून दाखविलेल्या आहेत त्या ओळीशी ते कटीबध्द असतील. त्यांनी जे पुस्तक लिहिलं आहे त्यातलं जे वाक्य तुम्ही त्यांना सांगितलं आहे त्या शब्दाला धरुन ते नक्की वागतील त्यांना थोडासा वेळ द्या. साहेब,तुम्हांला सांगायचं आहे की, हे तीन हजार रुपये देण्याच्या विषयामध्ये विभागीय आयुक्त हे आपतकालीनचे अध्यक्ष आहेत म्हणुन त्यांना आपतकालीन अध्यक्षांकडे जावं लागलं आहे. आयुक्त साहेब,ज्यावेळेस पालकमंत्री पुण्याच्या बैठकीसाठी येतात त्यावेळेस महापौरही त्या बैठकीला उपस्थित असतात मी पण त्या बैठकीला उपस्थित राहीन आणि त्यांच्या समवेत आपण चर्चा करुन तीन हजार रुपये देण्यासाठी आपल्याला काय करता येईल. आणि आयुक्त साहेब,आपण हे का देवु शकत नाही याचा सभागृहाला खुलासा हवा आहे. तो आपण करावा.आणि माई, एवढा वेळ लागला नसता. ज्यावेळेस माजी महापौरांनी काही तरी ठिणगी टाकुन  हे सभागृह चालवण्याचा एवढा प्रयत्न केला आहे त्याचवेळेस तुम्ही आयुक्तांना खुलासा करण्यास सांगितले असते तर त्यांनी लगेच खुलासा केला असता आणि या सभागृहामध्ये एवढी चर्चा झाली नसती. आमचे सहकारी अजित गव्हाणे म्हणायचे की,आपली जी.बी.पटकन संपवली जायची आणि आज तुम्ही हे सभागृह चालवायचं ठरवताय आम्हांला खूप चांगली गोष्ट  आहे. दापोडी ते निगडी डावी माझी उजवी तिकडची याचा आम्हांला पण खुलासा करायला पण खुप वेळ मिळेल. आणि मा.महापौर साहेब,तुम्ही यापुढे असेच सभागृह चालवत रहा  अशी विनंती करतो. आणि आयुक्त साहेबांनी याचा खुलासा करावा.

**मा.नामदेव ढाके -** मा.महापौर साहेब,मा.आयुक्त साहेब,सन्मा.सभागृह  जवळपास अडीच तासापासून या सभागृहामध्ये  एकमताने ठराव मंजुर करुन  आर्थीकदृष्टया दुर्बल घटकांना तीन हजार रुपये देण्याचा विषय केला. यामध्ये निकष काय असतील, तरतुद कशी करायची,मगाशी राहुलदादांनी सांगितलेप्रमाणे फॉर्म छापून झालेले होते. त्याच सॉफ्टवेअर त्याठिकाणी तयार झालेलं होतं. त्यासंदर्भामध्ये प्रशासनाकडुन या गोष्टीची पुर्ण तयारी झालेली होती. परंतु सन्मा.महापौर या विषयांकडे जात असताना या सभागृहामध्ये मला याठिकाणी नक्की लक्षात आलं की, सर्वाची या आर्थीकदुर्बल घटकातील नागरीकांना मदत करण्याची भूमीका ही नक्की आहे. आणि भारतीय जनता पार्टीच्या माध्यमामधुन ज्या नागरीकांचा या घटकामध्ये समावेश होता अशा या दुर्बल घटकातील नागरीकांना तीन हजार रुपये देण्याचा विषय आणला आणि आपल्या सगळयांचा हेतू हा स्वच्छ होता.आपण त्यांना कायमचा उदरनिर्वाह करण्यासाठी पैसे देणार नव्हतो. परंतु त्याला कुठं तरी आधार देण्याचं काम गेल्या दिड वर्षामध्ये ज्या कष्टक-यांच्या हाताला काम नाही, अशा प्रकारची परिस्थिती या शहरामध्ये निर्माण झालेली आहे. आणि सगळयांच्या माध्यमामधुन याठिकाणी सांगितल आहे की,ही नगरी कष्टक-यांची आहे,

बहुतांशी स्लम एरियामध्ये असणारा जो घटक आहे,त्या घटकांचा उल्लेख आपण या ठिकाणी घेतलेला होता. आणि मला असं वाटतं की,सन्मा.आयुक्तांनी हा तीन हजार रुपये देण्याचा विषय मंजुर करायला पाहिजे होता. सन्मा.महापौर साहेब,आपण सर्वानी या संदर्भामध्ये आयुक्तांकडे सहा ते सात वेळा पाठपुरावा केला. त्यावेळेस साहेबांनी सांगितलं की,आपल्याला हा विषय करायचा आहे. त्यानंतर साहेबांनी सांगितले की, या शहरामध्ये कोरोनाची संख्या मोठया प्रमाणामध्ये वाढते आहे. आणि कुठं तरी गर्दी होईल, लोकं बाहेर पडतील आणि कार्यालयामध्ये येतील आणि कुठं तरी बाधा होईल आणि म्हणुन आपल्याला हे देता येणार नाही अशा प्रकारची भूमिका आयुक्तांनी मांडली. आणि आम्हांलाही सर्व पदाधिका-यांना वाटलं की, साहेब,म्हणतात या कोरोनाच्या काळामध्ये या योजनेच्या माध्यमामधुन कोरोना संक्रमण होईल का, अशा प्रकारची भिती सुध्दा आम्हांला वाटली आणि या संदर्भामध्ये आयुक्त साहेब,म्हणतात त्याप्रमाणे कोरोना थोडा कमी झाल्यानंतर याठिकाणी फॉर्म वगैरे छापू परंतु मध्यंतरीच्या काळामध्ये आपल्या सर्वांना माहिती आहे की, चेअरमन होते,आम्ही होतो,उपमहापौर होते त्याठिकाणी आपण नागरवस्तीच्या विभागाकडुन यासंदर्भामध्ये ऑनलाईनच्या माध्यमामधुन आपल्याला पैसे देता येतील का, आत्मनिर्भराच्या माध्यमामधुन १६ हजार लोकांची यादी आपल्याकडे आहे.त्यामध्ये फेरीवाले असतील, घरेलु कामगार असतील, रिक्षावाले असतील, हे सर्व नागरीक असतील त्या सर्वांची यादी नागरवस्ती विभागाकडे त्यांच्या बँक अकौंटसह होती. आणि म्हणुन आम्ही आयुक्त साहेबांना सांगितलं की, साहेब,तुमच्या मनामध्ये योजना राबवायची आहे तीन हजार रुपये या आर्थीक दुर्बल घटकांना द्यायचे आहेत तर मग आपण या योजनेला सुरुवात करु या, आणि हे तीन हजार रुपये आपल्याकडे ऑनलाईनच्या रुपातआपल्याकडे यादी प्राप्त झालेली आहे. त्याला आपण हे देवु शकतो. अशा प्रकारची भूमिका सुध्दा आपण त्या मध्यंतरीच्या काळामध्ये मांडली. त्यानंतर याचे निकष काय असतील,फॉर्म कसा छापायचा, तरतुद कशी असेल या संदर्भामध्ये नागरवस्ती विभागामध्ये या फॉर्मची पुर्ण तयारी केली गेली होती. सन्मा.महापौर मी आपणांस विनंती करणार आहे की, खरं म्हणजे अनेक सदस्यांनी आपल्या भूमिका याठिकाणी मांडल्या आहेत. आर्थीकदुर्बल घटकांना आपल्याला कशी मदत करता येईल,कायद्याच्या चौकटीमध्ये कसे देता येतील, याठिकाणी सिमाताईंनी सुध्दा उल्लेख केला आहे. आणि आपण या संदर्भामध्ये आयुक्तांना वारंवार सांगितलं आहे. या सभागृहाने एक प्रामाणिक हेतुने तीन हजार रुपये देण्याचा विषय मांडलेला आहे. आणि याची अंमलबजावणी होणं आवश्यक होतं.मगाशी ताईंनी सांगितलं आहे की, ज्या कलमाच्या अंतर्गत आपल्याला त्याला थोडसं कायद्याच्या चौकटीत न बसवता जर का त्यांना देण्याची वृत्ती झाली असती तर

कलम ६६ च्या अंतर्गत १ (ब) किंवा ३९ च्या माध्यमामधुन आपल्याला देता आलं असतं आणि आयुक्तांनी आपल्याला सांगितलं होतं की,आपल्याला हे द्यायचं आहे वृत्तपत्रामध्ये त्यांनी उल्लेख केला होता की, कोरोनाच्या या महामारीची संख्या मोठया प्रमाणात आहे,संख्या वाढलेली आहे.त्यानंतर आपल्याला हा कोरोनाचा काळ कमी झाल्यानंतर देता येईल अशा प्रकारचं स्टेटमेंट सुध्दा त्यांनी एक/दोन वृत्तपत्रांमध्ये दिलं होतं. आणि त्यांनी तर आपल्याला वारंवार सांगितलं होतं की,आपल्याला हे द्यायचं आहे. परंतु त्यांनी काय केलं या महानगरपालिका अधिनियमाच्या अंतर्गत महापालिका सभेचा जो ठराव असतो तो ख-या अर्थानी महापालिका अधिनियम ६६ च्या अंतर्गत जसं ताईंनी वाचुन दाखवलं त्याअंतर्गत आपल्याला तरतुद करता येईल. अशा बाबी त्या संदर्भामध्ये या वेगवेगळया बाबींचा या ठिकाणी उल्लेख असताना सन्मा.आयुक्त साहेबांना सुध्दा आम्ही सांगितलं,आपले सन्मा.आमदार लक्ष्मणभाऊंनी याठिकाणी सांगितलं की, तो ठराव आपण नगरविकास विभागाकडे पाठवा आणि साहेबांनीही सांगितलं होतं की,मी पाठवतो,मी करतो पण साहेबांनी तो ठराव नगरविकास विभागाकडे न पाठवता ११ मे रोजी विभागीय आयुक्तांकडे आपत्ती व्यवस्थापनाच्या नावाखाली पाठविला आहे. परंतु हा विषय आयुक्तांनी शासनाकडे पाठविला असता तर शासनाने सुध्दा त्याच्यावर उत्तर दिलं असतं कारण शासनाने सुध्दा या आर्थीक दुर्बल घटकातील नागरीकांना दिड हजार रुपये दिलेले आहेत. म्हणुन याठिकाणी शासनाने सुध्दा सकारात्मक भूमिका घेतली असती. परंतु मला लक्षात येत नाही, सन्मा.महापौर आपण वारंवार आयुक्ताकडे भेटलेलो असताना सुध्दा जसं ताईंनी सांगितलं की,आयुक्तांची नेमकी भूमिका काय होती. साहेबांना नेमकं काय करायचं होतं,काय सिग्नल द्यायचा होता यासंदर्भात आम्ही सर्वजण अधांतरीच राहिलो. आणि उलटपक्षी त्यांनी ज्यासंदर्भमध्ये ताईंनी सांगितलं की, एखादया राजकीय पक्षाप्रमाणे त्यांनी प्रेस घेतली आणि आम्ही गरीबांना देतो आणि त्यांनी उलट लगेच स्टेटमेंट दिलं आणि त्याला प्रतिक्रिया देणं हे मला वाटतं या सभागृहाचा अवमान याठिकाणी सन्मा.आयुक्तांनी केलेला आहे. सन्मा.महापौर साहेब,यासंदर्भामध्ये उल्लेख झाला आहे की, मगाशी ताईंनी आणि राहुलदादांनी पण सांगितलं की, कलम ६७ अंतर्गत आपतकालीन परिस्थितीमध्ये या शहराच्या बाबतीत आयुक्तांना अधिकार घेता येतात. आणि त्या कायद्याच्या अंतर्गत या आर्थीक दुर्बल घटकांना ही मदत त्याठिकाणी देता आली असती. डीपीटीच्या माध्यमातुन याठिकाणी बोललं गेलं परंतु आपण जर बघितलं असेल तर पिंपरी चिंचवड महानगरपालिका आणि या महाराष्ट्रामध्ये अशा अनेक योजना आहेत की, ज्या योजनांच्या व्यतिरिक्त या योजना या महापालिकेमध्ये कार्यान्वीत केल्या जातात त्याच्यामध्ये

जवळपास ४८ योजनांचा समावेश आहे.आणि त्याच्यापैकी ३० ते ३५ योजना महाराष्ट्र शासन किंवा केंद्र शासनाच्या नसून या महापालिकेने अंमलात आणलेल्या आहेत. आणि ही एकमेव महापालिका आहे आणि म्हणुन या महानगरपालिकेमध्ये कष्टक-यांचा सन्मान करणं याठिकाणी अपेक्षित होतं. परंतु सन्मा.आयुक्तांनी या विषयाला खोडा घातलेला आहे. आणि भाऊसाहेब,जसं आपण सांगितलं खरं म्हणजे यासंदर्भामध्ये मी आपल्याशी पण बोललो होतो. कलावंताचा विषय याठिकाणी आपण घेतला आपण सुध्दा अखिल भारतीय नाटय परिषदेचे अध्यक्ष आहात. आणि या कलाकारांची काय परिस्थिती आहे हे आपल्याला सुध्दा माहिती आहे. परंतु यासंदर्भामध्ये ज्यावेळेला आपण उल्लेख केला की,आमची प्रामाणिक भूमिका आहे,भारतीय जनता पार्टीची सुध्दा प्रामाणिक भूमिका होती परंतु दुस-या बाजुला मात्र राष्ट्रवादीच्या माध्यमामधुन याठिकाणी सुभेदारी करुन भारतीय जनता पार्टीनी याठिकाणी माफी मागावी आपल्या शहरात एक पत्रक काढलं होतं, भारतीय जनता पार्टीनं तीन हजार रुपये देण्याचं गाजर दाखवलेलं आहे. अशी दुटप्पी भूमिका मला याठिकाणी राष्ट्रवादीची दिसते आहे. आणि म्हणुन सन्मा.महापौर याठिकाणी राष्ट्रवादी काय म्हणते याचं आम्हांला काही घेणं देणं नाही परंतु या शहरामध्ये असणारा आर्थीक दुर्बल घटक हा विशेष करुन स्लम एरियामध्ये असणारा घटक आहे. आणि त्यांना एक काठीचा आधार देण्याचा प्रयत्न आपण करणार होतो. मगाशी प्लाझमाच्या संदर्भात आपण दोन हजार रुपये दिले होते ते कशाच्या आधारावर दिलेले होते. हे आपण कुठल्या कायद्याने दिलेले आहेत. आपण डीपीटीच्या माध्यमातून प्लाझमा डोनेट करणा-यांना आपण त्यांना दोन हजार रुपये दिलेले आहेत. अशा अनेक योजना आहेत त्यामध्ये शिष्यवृत्ती असेल, तरी आपण या आर्थीक दुर्बल घटकांना तीन हजार रुपये देण्यासाठी कोणाच्या सांगण्यावरुन खोडा घातलेला आहे. हे आपण सन्मा.महापौर आपण आयुक्तांना विचारावं मला वाटतं राष्ट्रवादीची नेमकी भूमिका काय आहे हे त्यांनी सांगितलं आहे. यासंदर्भात गटनेत्यांची बैठक बोलावली होती परंतु विरोधी पक्षनेते यांनी सांगितले की, गटनेत्यांची बैठक बोलावली नव्हती म्हणुन तुम्ही याला खोडा घालता का? स्थायी समितीमध्ये पण तुमच्या पक्षाचे सदस्य होते त्यांनी पण सकारात्मक भूमिका घेतलेली होती. आणि म्हणुन हा विषय या महापालिका सभेला आलेला होता. आणि म्हणुन लोकांच्या मध्ये गैरसमज पसरवण्यामध्ये आम्हांला स्वार्थ नाही. शेवटी भारतीय जनता पार्टीची भूमिका ही शेवटच्या घटकातील लोकांना न्याय देण्याची भूमिका आहे. याठिकाणी ताईंनी सांगितलेप्रमाणे तुम्ही फलेक्स लावा काही करा त्याच्यामध्ये तुम्ही समाधानचं मानत रहा आम्ही मात्र याठिकाणी सर्वसामान्य गोरगरीबांना त्यांना मदत कशी मिळेल यासाठी आम्ही सातत्याने प्रयत्नशिल राहू.

यानिमित्ताने सन्मा.महापौर मीआपल्याला विनंती करतो की, याठिकाणी सर्व सन्मा.सदस्यांच्या भावना याठिकाणी लक्षात घेता आर्थीक दुर्बल घटकातील नागरीकांना तीन हजार रुपये देण्याचा मा.आयुक्तांनी सकारात्मक विचार करावा. आणि सन्मा.महापौर साहेब,मी विनंती करेन की, या सभेचा जो काही विषय असेल, तो नगरविकास खात्याकडे पाठवण्याची गरज असताना डिव्हीजनल कमिशनर साहेबांकडे पाठवून चुकीच्या पध्दतीने याठिकाणी मिसगाईड करण्याचं काम आयुक्तांनी केलेलं आहे. आणि या गोरगरीबांच्या भावना दुखावण्याचं काम त्यांनी केलेलं आहे. आयुक्तांनी व विभागीय आयुक्तांनी ही त्यांच्या आदेशामध्ये सांगितलं आहे की, एकच योजना जर राज्य शासन देत असेल तर पुन्हा तीच मदत आपल्याला देता येत नाही. परंतु अशा किती योजना आहेत की,केंद्र सरकार शेतक-यांना अनुदान देतं आणि तेच अनुदान राज्य शासन सुध्दा देतं आणि मग हा विषय न करण्यामागचा नेमका हेतु काय होता. सन्मा.महापौर साहेब,आयुक्तांना आपण आदेश द्यावे की, या आर्थीक दुर्बल घटकातील नागरीकांना तीन हजार रुपये देण्याचा जो विषय आहे तो कायद्याच्या चौकटीत बसवुन तो आम्हांला द्यावा अशी विनंती करतो.

**मा.महापौर –**जवळ जवळ तीन तास दहा मिनिटे आपण या महत्वाच्या विषयावर चर्चा करत होतो. चर्चेनंतर मार्ग हा सापडतोच म्हणुन आपण चर्चा केलेली आहे. त्यामध्ये सगळयांनी भाग घेतलेला आहे त्यांच मी अभिनंदन करते. आयुक्तांनी या सभागृहाच्या भावना विचारात घेवुन त्यांच्या भावना काय आहेत हे समजुन घेवुन त्या भावनांचा आदर करणं हे प्रत्येक आयुक्तांच कर्तव्य आहे. नगरसेवकांची कामे होत नाहीत म्हणुन नगरसेवक तुमच्यापर्यंत येत असतात आणि तुम्हांला विनंती करतात. आणि आयुक्त हे कायद्याच्या चौकटीमध्ये बसवुन काम करतात. त्याच बरोबर आपण या श्रीमंत महापालिकेचे आयुक्त आहात आणि या संपुर्ण देशावर आलेली आपत्ती आहे आणि आपल्या शहरावरही आलेली आहे त्यामुळे माझ्या नगरातील कष्टाळु नागरीक यांच्या चुली बंद झालेल्या आहेत. कष्ट करुन त्यांनी या नगरीचा विकास केला आहे,ही नगरी मोठी केली आहे. आणि आशिया खंडात या पिंपरी चिंचवड महापालिकेचं नांव ज्यांनी कमवून दिले आहे ते म्हणजे या शहरातील आर्थीक दुर्बल घटकातील नागरीकांच्यामुळे झालेले आहे. आणि अशा नागरीकांवर आता वेळ आलेली आहे की,आपल्याकडुन त्यांना काही तरी मदत मिळावी म्हणुन आपण फक्त तीन हजार रुपये देण्याचा विषय सभेमध्ये पास झाला. आम्ही सुरुवातीला तुमच्या बरोबर बोललो त्यावेळेस आपण सांगितले की,काही हरकत नाही देता येईल आणि म्हणुन आम्ही ही तीन हजार रुपयांची अट लावून धरली होती. आणि हा विषय सर्वपक्षीय सदस्यांनी पास केला म्हणुन मी आपल्याला एक सांगु इच्छिते की, कायद्याची चौकट ही

माणसालाच करता येते, माझ्याच जनतेला माझेच पैसे द्यायचे आहेत पण हे पैसे कसे देता येतील याचा तुम्ही अभ्यास करा, आणि ज्यांच्या चुली बंद आहेत, कोणाचे काही प्रश्न असतील, असे अनेक प्रश्न आहेत. कोणाला वही घ्यायची आहे,कोणाची फी भरायची आहे.नुसतं धान्य वाटप करायची आणि चपाती द्यायची असे नसुन त्याच्या पलीकडे त्यांच्या मुलांचे शिक्षण पैशामुळे अडणार नाही त्यासाठी आपल्याला हे पैसे द्यायचे आहेत. ते कसे देता येतील याचा आयुक्तांनी अभ्यास करावा आणि पुढच्या मिटींगपर्यंत प्रयत्न करा आमच्या सारख्याच्या शुभेच्छा तुमच्या पाठीशी आहेत. आणि मग आम्ही म्हणु की,आपण या श्रीमंत महापालिकेचे कमिशनर आहात,आणि तुम्ही बुध्दीने श्रीमंत आहात ही वेळ सिध्द करण्याची आलेली आहे. आणि तुम्ही ते सिध्द कराल अशी अपेक्षा करते. आणि पुढच्या विषयाला सुरुवात करणेत येत आहे. तत्पुर्वी एक विषय राहिलेला आहे. तो घेणेत यावा.

**मा.संदीप वाघेरे -** मा.महापौर साहेब,मा.आयुक्त साहेब,सन्मा.सभागृह ऐनवेळचा विषय आहे असे समजा, दोन तारखेचा विषय आहे. आणि मला खेदाने म्हणावं लागतयं की, “कटीबध्द जनहिताय” असं आपण म्हणतो. म्हणजे आपण लोकांबद्दल समर्पण आहे. आणि आम्ही लोकांची कामे करण्यासाठी आहोत. परंतु आता खेदाने असं म्हणायची वेळ येते की, “ कटीबध्द ठेकेदार हिताय” दोन तारखेला निगडीमध्ये जो काही प्रकार झाला. एक मृत व्यक्ती होती एक तारखेला निगडी स्मशानभूमी मध्ये दहा मयती झाल्या तिथं बारा बेड आहेत आणि विद्युत दाहिनी पण आहे त्याच्यानंतर तिथं रात्री एकच्या दरम्यान एक मयत झाली एक वाघ आणि अडीच /तीनच्या दरम्यान एक निंबाळकर म्हणुन यांची झाली होती. त्याच्यानंतर तिथं दुस-या दिवशी दोन मयती झाल्या त्याठिकाणच्या मयतीचा मी व्हीडीओ पण घेतला आणि माहिती पण घेतली. म्हणजे तिथं लाकडं,गोव-या कमी टाकल्या की काय हे माहित नाही. पण ते जे काही प्रेत होतं ते व्यवस्थित ठेवण्यात आलेलं नाही साधारणपणे लोखंडाची जाळी होती तिथं ठेवण्यात आलं आणि त्या व्हीडीओ मध्ये क्लिअरकट दिसतयं की, एक प्रेत तिथं जळालेलं दिसतयं त्याच्या अस्थी तिथंच आहेत, तिथंच दुसरं प्रेत जळतंय मी रॉय साहेबांना भेटलो ते म्हणाले ठिक आहे, मीच आपल्या महापालिकेच्या माणसांना विचारलं म्हणजे ते डेड हाऊसच्या संबंधित जे कर्मचारी असतील मी कोणाचं नांव घेत नाही माझ्याकडे व्हाईस रेकॉडींग पण आहे. ते म्हणले माणसाचाच पाय दिसतोय त्या पायाचा काही पार्ट जळालेला आहे,कुत्रं खातयं आणि विशेष म्हणजे ते कुत्रं तेथुन गायब केलेलं आहे. या मयतीची विल्हेवाट लावण्यासाठी ज्या कोणाचं टेंडर असेल त्यांना आपण सुरुवातीला सहा हजार रुपये देत होतो त्यानंतर पंधरा दिवसांनी आपण

आठ हजार रुपये देत होतो. अकरा रुपये किलो लाकुड, दहा रुपये शेण गवरी साधारणपणे २०० गव-या,३०० किलो लाकडं असं काही तरी ते टेंडर देण्यात आलं. ढाकणे साहेबांना मी १० एप्रिलला एकाची ऑडीओ क्लिप फॉरवर्ड केलेली होती. त्यात तुम्ही म्हणले की,मी कारवाई करतो त्याच्यानंतर मी रॉय साहेबांना पत्र दिलं की,असं,असं आणि माझ्या पिंपरीतल्या एका माणसाचे सात हजार रुपये घेतले म्हणुन त्याच्या घरातील माणुस डेड झाला संबंधित लोकांनी घेतले होते त्याच्यानंतर तुम्ही एक महिन्यांनी कारवाई केली. साधारणपणे पाच तारखेला आणि मी एप्रिलला पत्रं दिलं होतं एक लाख रुपये त्या ठेकेदाराला दंड केला. मा. महापौर साहेब,मला काय म्हणायचं माहिती आहे का, या महापालिकेमध्ये असं काम चाललयं दिखाऊ धंदा आणि फसावु काम, म्हणजे आपण दाखवतोय की,आम्ही अशी,अशी कामं करतोय, पण सगळी फसवणुक करतोय, पुर्वी असं म्हणलं जायचं की,इथं आता बरेच जण म्हणले की,मयताच्या टाळुवरचं लोणी खायचं पण आता असं झालं आहे की, मेलेल्या प्रेताची लचकेच तोडू लागलेत. सकाळ पेपरला बातमी आली, तिथं त्यांनी जाऊन बघितलं, त्यांनी ते सगळं रेकाँर्डींग वगैरे सगळं केलं. आणि काही महाभाग असं म्हणतात की, हे निगडी स्मशानभुमीतील नाही, मग ते कुठलं आहे. रेकॉर्डींग बघितलं,सत्य परिस्थिती बघितली तर बेड कुठं आहे,काय आहे बाकीच्या गोष्टी बघितल्या तर सगळं दिसतयं महापौर साहेब,याच्यावरती कारवाई झाली पाहिजे. महापौरांनी आयुक्तांना आदेश दिले होते की,स्पर्श बाबतीत २० दिवसात असा,असा अहवाल द्या. काय ती सत्यता पडताळून पाहू पण आज तीन महिने झाले त्याची आपण काय कारवाई केली किंवा नाही हे आम्हांला काही माहिती नाही. त्यावेळेला जे संबंधित अधिकारी होते म्हणजे अतिरिक्त आयुक्त (२)अजित पवार साहेब, परिस्थिती अशी आहे की, त्या अति.आयुक्तांना जात पडताळणीचा चार्ज होता. त्यांचा पगार तिकडनं निघत होता त्यांनी आपल्या महापालिकेत १८ महिने काम केलं. म्हणजे थोडक्यात असं म्हणावं लागेल की, ते एक अधिकारी म्हणजे एक तोतया अधिकारी होते. मला त्या व्यक्तीनी दहा वेळा सांगितलं असेल की,तुम्हांला कुठलं टेंडर वगैरे भरायचं असेल तर भरा, मी म्हणलं बाबा,तु कोण देणारा पण ज्यावेळेस मी त्याची माहिती मागवली तेंव्हा मला संबंधित अधिकारी मला म्हणाले की,तुम्ही एवढया मोठया माणसाची माहिती कशाला मागवताय, का म्हणजे, जे चुकीचं आहे ते चुकीचंच आहे. आज आपण अठरा महिने या ठिकाणी सांभाळलं,पोसलं,बाकीच्या गोष्टी केल्या त्यांनी किती टेंडरवरती आणि ऑर्डरवरती सह्या केल्या,किती बोगस बिलं वाटली, आयुक्त साहेब,तुम्ही तीन महिन्यापुर्वी एक कमिटी नियुक्ती केली होती नां,तशीच एक कमिटी नियुक्त करा, अजित पवार यांनी असे बेनामी कुठले,कुठले उद्योग केले आहेत याची माहिती काढा कारण हे जनतेचे

पैसे आहेत. आम्ही सगळे इथे विश्वस्त म्हणुन आलेलो आहोत. आणि इथं कोणाचे ना कोणाचे तरी लागेबांधे आहेत, बरं ठिक आहे टेंडर घेतात, ठेके घेतात त्याच्या मागे काही नेते पण आहेत. ते सोक्षमोक्ष लावा, आणि दुसरं बोगस एफडीआर प्रकरणामध्ये १८ ते २० ठेकेदारांची नांवे आलेली आहेत त्यातील गरीब,गरीब पाच ठेकेदारावरती आयुक्तांनी गुन्हे दाखल केली आहेत. पण जे मोठे ठेकेदार होते,ज्यांची व्यवस्थित परिस्थिती आहे त्यांच्यावरती गुन्हे दाखल करण्यात आलेले नाहीत. ते या महापालिकेचे जावई आहेत का? म्हणुन मी तेच म्हणतोय की, “कटीबध्द जनहिताय” याऐवजी “कटीबध्द ठेकेदार हिताय” हे ब्रीदवाक्य करा,आणि महापौर साहेब, याच्यावरती निर्णय घेण्याची काळाची गरज आहे.कारण सहा महिन्यांनी इलेक्शन आलेलं आहे. आणि इथं एक/दोघांच्या लागेबांध्यामुळे याठिकाणी पक्ष बदनाम होत आहे. आज निगडी स्मशानभुमी मध्ये जो काही प्रकार झाला आहे तो भारतीय जनता पार्टीच्या काळामध्ये झालेला आहे. जसं मागच्या वेळेला राष्ट्रवादीची सत्ता गेली झालेला घोटाळा किंवा न झालेला घोटाळा बाहेर आला आणि सगळीकडे बोंबाबोंब झाली तशी ही चर्चा सगळीकडेच होत आहे. आणि आज हे डबक्या आवाजात आहे.उद्या याची सुनामीत रुपांतर झालं तर सगळयांना अवघड जाईल. महापौर साहेब,तुम्ही आयुक्तांना क्लिअरकट आदेश द्या की, जो कोणी ठेकेदार असेल त्याला काळया यादीत टाका, आणि याची सुरुवात आज केली तर उद्या त्याची फळं चांगले मिळतील. आयुक्त साहेब,मला याच्यावरती खुलाशाची अपेक्षा आहे.

**मा.अभिषेक बारणे -**मा.महापौर साहेब,मा.आयुक्त साहेब,सन्मा.सभागृह खरंतर आजच्या सभेमध्ये हा विषय जरी नसला तरी बाकीच्या झालेल्या चर्चेनुसार, हा विषय देखील तितकाच महत्वाचा आहे. प्राधिकरणाचं विलीनीकरण पीएमआरडीए मध्ये झालं आणि ज्या प्रभागाचं नेतृत्व मी करतो माझ्या बरोबर कैलास बारणे असतील,अर्चनाताई बारणे असतील, मनिषाताई पवार असतील आम्ही चौघे मिळुन ज्या प्रभागाचं नेतृत्व करतो तो ८० टक्के प्रभाग हा प्राधिकरण आरक्षित आहे. याच्यावरती अर्धा गुंठा,एक गुंठयावरती घरे झालेली आहेत. आणि त्या घरावरती टांगती तलवार आणि त्या घरांचा प्रश्न आतापर्यंत मिटलेलाच नाही. त्याची एक थोडक्यात पार्श्वभुमी सांगायची झाली तर, अनधिकृत बांधकाम असेल,प्राधिकरणाचे विषय असतील, याच्यासाठी सातत्याने आमदार लक्ष्मणभाऊ जगताप पाठपुराव घेत होते. २०१४ मध्येच त्यांनी या अनधिकृत बांधकामाच्या संदर्भात त्यांनी पदाचा राजीनामा दिला होता. आणि या लोकांची घरे नियमीत कशी होतील त्यासाठी पाठपुरावा घेत होते. ते घेत असताना,त्याच्यानंतर जे सरकार आलं त्या सरकारने ते सरकार आल्यानंतर त्या पक्षामध्ये

जाऊन निवडणुक लढली त्यावेळेस मी माझ्या प्रभागातल्या नागरीकांना एकच सांगितलं सत्येत असलेला पक्ष,हाच आपला प्रश्न मिटवू शकतो. आणि फक्त नि फक्त त्याच कारणासाठी मी त्या पक्षाबरोबर होतो. माझ्या प्रभागातील जी ८० टक्के घरं प्राधिकरण आरक्षित आहेत त्यांची घरे नियमित होतील या उद्देशाने  मी गेलो आणि सातत्याने प्रयत्न करत राहिलो त्यावेळेस जे सरकार होतं त्या सरकाने जी.आर.सुध्दा काढला की,ही घरं आपण अशा,अशा पध्दतीनं नियमित करु, त्याचा पाठपुरावा चालू होता. त्याच्यामध्ये काही जाचक अटी होत्या की,ज्याच्यामध्ये साईडमार्जीनचा विषय असेल, बांधकामाच्या नियम आणि अटी भरपूर होत्या त्यासाठी आम्ही पुन्हा एकदा पाठपुराव करत राहिलो. पण आम्ही निर्धास्त झालो होतो की, आता किमान सरकारची भूमिका अशी ठरली की, प्राधिकरण आरक्षित घरांना नियमित करायचं त्यानंतर सरकार बदललं त्यानंतर आता जे विलीनीकरणाचा जो निर्णय आला आहे. याच्यामध्ये अशा अडचणी आहेत की, ज्यावेळेस या जागा प्राधिकरणाच्या ताब्यामध्ये होत्या त्यावेळेस प्राधिकरणाला हक्क होता की, त्याची मालकी पुर्णपणे प्राधिकरणाची होती. आणि त्यावेळेस जो तिथं रहातो त्या माणसाला प्राधिकरण थेटपणे घरे देवु शकत होती. पण आता काय झालं,की, हे विलनीकरण करताना कुठंच असं गाईडलाईन्स आलेल्या नाहीत की,त्या घराचं करणार काय? मोकळया भूखंड पीएमआरडीएच्या मार्फत विकुन ते राज्य शासन चालवतील त्याचा महापालिकेला काय फायदा आहे. आज आपण महापालिका म्हणुन जी कामे करतो त्याच्यामध्ये रस्ते,ड्रेनेज,पाणी,विदयुत अशा सुविधा पुरवितो आणि या सुविधा पुरविताना होणारा खर्च हा आपल्याला कुठून तयार होणार आहे. त्यासाठी हे जे मोकळे भूखंड होते ते या महापालिकेच्या ताब्यात द्यायला पाहिजे होते. त्याच्यानंतर ही जी घरे आहेत जो तिथं रहातो त्या माणसाच्या नावावरती किमान शुल्क घेवुन ते त्यांना दिले पाहिजे होते. किमान शुल्क असं म्हणायचं कारण नाही. आज आमचे राजाभाऊ प्राधिकरणावरती पोटतिडकीने बोलत होते.शेतक-यांना अजुन साडेबारा टक्के परतावा अजुन भेटलेला नाही. याठिकाणी जेवढे भूमिपुत्र आहेत यांच्या सगळयांच्या जागा प्राधिकरणामध्ये गेल्या त्यातील काही शेतक-यांना साडेबारा टक्के परतावा भेटला काही शेतक-यांना भेटला नाही. ज्यांना भेटला नाही त्यांना भेटला पाहिजे. आणि ज्यांना भेटलेला नाही त्यांच्यापैकी काही लोकांच्या ताब्यामध्ये त्या जागा होत्या आणि त्याठिकाणी विकास न झाल्या कारणाने त्यातील अर्धा गुंठा,एक गुंठा,दिड गुंठा या जागा या शेतक-यांनी त्या गोरगरीब लोकांना विकल्या आहेत. आता जर उद्या प्राधिकरण आरक्षणामधुन जर या लोकांना थेट पध्दतीने जागा नाही दिली आणि असा काही नियम आला तर आणि मुळ मालकाच्याच नावावरती जागा झाल्या तर काय करायचं ?

त्या लोकांनी कुठं जायचं, परत तेच हे करण्यापेक्षा माई,मी तर आज ठामपणाने सांगतो की, जर त्यांनी  विलीनीकरण त्यांनी केलं आहे त्याला माझा विरोध तर आहेच आणि जर केलं नाही नां तर महापालिकेच्या हद्यीत आपण यांना जागा दिल्या आहेत नां, तर या सभागृहामध्ये मी सर्व नगरसेवकांना विनंती करीन की, जर आपल्याला हक्क दिले तर आपण ठरवणार की,ज्याठिकाणी जी घरं आहेत ती घरं त्या लोकांना देवुन टाका,त्या लोकांनीकुणाला तरी पैसे दिलेले आहेत,ती लोक टॅक्स भरतात त्यासाठी असा जर निर्णय झालेला आहे तर माझी तुम्हांला माझ्या प्रभागातील चारही नगरसेवकांच्या वतीने विनंती राहील की, आज या सभागृहामध्ये असा निर्णय द्या की, तुम्ही जर ही घरे आमच्याकडे वर्ग केलेली आहेत,ज्या जागेवरती घरे झालेली आहेत तर त्या जागा आम्ही असा प्रस्ताव पाठवतो की, त्या जागेवर तो जिथं रहातो,जो त्या घराचा टॅक्स भरतो त्याच्या नावावरती थेट पध्दतीने हे घर करुन द्यावं असा ठराव मी तुम्हांला सुचित करतो आणि तो ठराव व्हावा अशी मी तुम्हांला विनंती करतो.

**मा.अर्चना बारणे -** मा.महापौर साहेब, अभिषेक बारणे यांनी जो विषय मांडला त्याला माझे अनुमोदन आहे.

**मा.राहूल जाधव -**  मा.महापौर साहेब,मा.आयुक्त साहेब,सन्मा.सभागृह प्राधिकरणाचं आता पीएमआरडीएकडे विलीनीकरण  करण्यात आलं आहे. खरंतर ब-याच वेळा विरोधकांनी नांव ठेवली की,पिंपरी चिंचवड शहराचे दोन भाग झाले आहेत.पिंपरी चिंचवड शहर तोडलं गेलं आहे. आता ख-या अर्थानं पिंपरी चिंचवड शहर हे तोडलं गेलेलं आहे. कोणी तोडलं,कसं तोडलं हे सर्वांना सर्वश्रुत आहे. ख-या अर्थानं पिंपरी चिंचवड शहरामध्ये पिंपरी चिंचवड महानगरपालिका आणि पिंपरी चिंचवड नवनगरविकास प्राधिकरण  विलीनीकरणचं  करायचं होतं तर पिंपरी चिंचवड महानगरपालिकेमध्ये करायला पाहिजे होतं म्हणजे एक अखंड एक शहर झालं असतं, त्याच कारणही असं आहे की, आतापर्यंत प्राधिकरणाचे प्रलंबीत विषय हजारो प्रलंबित विषय आहेत. त्यामध्ये साडेबारा टक्के परतावा असेल, या परताव्या मध्ये काही बांधकामे झालेली आहेत. याठिकाणी बिल्डींग उभ्या राहिलेल्या आहेत. त्या बिल्डींगचे अजुन देखील कम्पलीशन झालेलं नाही. असे अनेक विषय आहेत. आता काही भूखंड पिंपरी चिंचवड महानगरपालिका आणि काही भूखंड पिंपरी चिंचवड नवनगरविकास प्राधिकरण एकत्रितपणे आहेत नां, आमच्या प्रभागात आहेत असे अनेक प्रभागात असतील म्हणजे हा गुंतागुंतीचा विषय आहे. आणि हा सोडायचा असेल तर किती अडचणी निर्माण होणार आहेत. आणि प्रशासनाकडे असं कधी होत नसतं की,आज आपण विषय मांडला की दुस-या दिवशी तो लगेच मार्गी लागतो. बरेच महिने,वर्ष देखील जातात. परंतु असे विषय काही सुटत नाहीत. त्यामळे पिंपरी

चिंचवडमहापालिकेचा एखादा ठराव राज्य शासनाला पाठवणे गरजेचं आहे. या शहराचे दोन भाग न करता, एकत्रितपणे पिंपरी चिंचवड महानगरपालिका असं पुर्ण शहर होईल तसंही पिंपरी चिंचवड नवनगरविकास प्राधिकरणाने ज्या,ज्याठिकाणी सेक्टर तयार केले ते सेक्टर नंतर पिंपरी चिंचवड महानगरपालिकेकडेच हस्तांतरीत केले आहेत. आणि त्याची देखभाल दुरुस्ती ही पिंपरी चिंचवड महानगरपालिकेकडे आहे. त्यामुळे अशा ब-याच मिळकती आहेत. त्यामुळे आपण सुध्दा हा ठराव राज्य शासनाकडे पाठवणं गरजेचं आहे. जेणेकरुन पिंपरी चिंचवड महानगरपालिका ही एकच पिंपरी चिंचवड शहरामध्ये पिंपरी चिंचवड महानगरपालिका म्हणुनच कार्यरत राहीली पाहिजे. यासाठी आपण प्रयत्न करणं गरजेच आहे. यासंदर्भात आपण कोर्टात सुध्दा जाण्याचं आदरणीय महेशदादा लांडगे,मा.लक्ष्मणभाऊ यांनी पत्रकार परिषद घेवुन त्यांना बोलून दाखवलेलं आहे. आणि आजही या सभागृहाच्या वतीने या विषयाला १०० टक्के विरोध करुन आपण सुध्दा ठराव करणं गरजेचं आहे. धन्यवाद.

**मा.विकास डोळस -** मा.महापौर साहेब,मा.आयुक्त साहेब,सन्मा.सभागृह प्राधिकरणाचा पीएमआरडीए मध्ये विलीनीकरणाचा जो विषय आहे या पीएमआरडीए मध्ये विलीनीकरणांमुळं पिंपरी चिंचवडचे जे नागरीक आहेत,जे शहरवासिय आहेत त्या सर्वांचं नुकसान झालेलं आहे. मुळात प्राधिकरणाची जी स्थापना झाली ती याच कारणासाठी प्राधिकरण काही ठिकाणचे डेव्हलपमेंट करणार होते त्यासाठी ज्या जमीनी संपादीत करण्यात आल्या होत्या त्या इकडच्या भूमिपुत्राच्या होत्या. आज ज्या जमीनी आहेत त्या पिंपरी चिंचवडच्या हद्दीमधील आहेत. आणि त्या जमीनी पीएमआरडीए कडे वर्ग करायच्या ,आपल्या प्राधिकरणाचं पीएमआरडीए कडे वर्ग करायचं याचं एक साधा कार्यकर्ता म्हणुन,एक साधा नागरीक म्हणुन मला याचं लॉजिक सापडतं नाही. आज पिंपरी चिंचवडकरांनी ज्यांनी हे निर्णय घेतले आहेत त्यांना बरंच काही दिलेलं आहे. आज या सभागृहातील जेवढे नगरसेवक आहेत ते सर्वजण पिंपरी चिंचवडकर आहेत. बरेच स्थानिक नगरसेवक पण आहेत.यांच्याही जमीनी गेलेल्या आहेत जसं राहूलदादांनी सांगितलं आहे.साडेबारा टक्के परताव्याचा प्रश्न प्रलंबित आहे. अभिषेकनी सांगितलं आहे की, जे अनाधिकृत बांधकामं आहेत त्यांचा प्रश्न प्रलंबित आहे. मग हा पिंपरी चिंचवडचा हा लचका तोडुन पीएमआरडीए मध्ये देण्यामध्ये काय अर्थ आहे हे मला समजत नाही. आणि जे भूखंड आहेत या भूखंडाचं आपण पीएमआरडीए मध्ये वर्गीकरण करुन काय करणार आहेत. या गोष्टी सर्वसामान्य नागरीकांना पण समजतात. पण हे सगळं करत असताना एक गोष्ट लक्षात ठेवायला हवी होती की,या पिंपरी चिंचवडकरांनी आपल्याला बरीच वर्ष सत्ता दिली,या शहराने आपल्याला मान दिला आणि या भूमिपुत्राच्या मुळावरती आपण

उठलेलो आहोत. प्राधिकरणाच्या हद्दीत जी घरं बांधलेली आहेत त्यांचा हक्क पीएमआरडीए कडे आहे. प्राधिकरणाच्या ज्या ठेवी आहेत त्या पीएमआरडीए कडे आहेत. जो विकसित भाग आहे,ज्यांना सुविधा पुरवायच्या आहेत त्या पालिकेकडे आहे. जो विकसित भाग आहे त्यांना सुविधा कोणी पुरवायच्या पालिकेने पुरवायच्या,त्यांच्या समस्या कोणी सोडवायच्या पालिकेने सोडवायच्या म्हणजे मलिदा पीएमआरडीएनी खायचा आणि सुविधा पालिकेनी पुरवायच्या एक सर्वसामान्य नागरीक म्हणुन मी याचा निषेध करतो. राहुलदादा आणि अभिषेकनी सांगितलं आहे की,एक ठराव करुन राज्य शासनाकडे पाठवावा आणि माझी सर्वपक्षीय नगरसेवकांना विनंती आहे की, चुकीला चुक म्हणण्याची हिंमत आपण ठेवली पाहिजे. मग समोर कोणीही असु दे, जर आपल्यावरती अन्याय होत असेल तर आपणहून पुढं आलं पाहिजे आणि त्या अन्यायाला वाचा फोडली पाहिजे. मला बोलायची संधी दिली त्याबद्दल धन्यवाद,जयहिंद जयमहाराष्ट्र.

**मा.आशा धायगुडे-शेंडगे -** मा.महापौर साहेब,मा.आयुक्त साहेब,सन्मा.सभागृह खरंतर माई,आपल्या शहरात ज्या काही प्राधिकरणाच्या पेठा आहेत या पेठांचा विकास त्यांनी केला आणि त्या नागरीकांना ज्या काही नागरी सुविद्या द्यायच्या आहेत त्यामध्ये ज्या काही मुलभूत गरजा आहेत त्यामध्ये पाणी,रस्ते,लाईट,ड्रेनेज या ज्या सुविधा आहेत आपल्याकडनं पुरवल्या जातात. आता आम्ही काय केलं,खुप भारी केलं आता कोणत्याही पक्षावर टिका करण्यापेक्षा माझ्या शहराची जी काही अयोग्य विभागणी होत आहे. त्या विभागणीला माझ्या वतीने कडकडीत विरोध याठिकाणी दर्शविते. आपल्याला विनंती करते की, आपण हा प्रस्ताव करुन राज्य शासनाला कळवलं पाहिजे. आता राहूलदादांनी सांगितले की,आमच्या शहराचे दोन भाग केले किंबहुना पिंपरी विधानसभा,चिंचवड विधानसभा,निगडी विधानसभा आता नवीन आपल्याकडे येणार आहे ते पुन्हा एकदा पीएमआरडीए कडे जे वर्गीकरण केलं आहे. त्याबाबतीत आपल्याला पहायला मिळेल. म्हणजे आताच आपल्या सर्व बाजुनी जर विकास करायचा असेल तर पुर्वी पिंपरी चिंचवडचा विकास झाला आहे. किंवा पुर्वीचं गावठाण होतं किंवा आपल्याला आता जरी पिंपरी चिंचवडचा विकास करायचं ठरवलं तरी आपल्याला जमत नाही. एकीकडे पिंपरी आहे,चिंचवड आहे, एकीकडे भोसरी विधानसभेचा भाग असताना आता नवीन खेळ आपल्याकडे मांडला जात आहे. आता आमच्या डोळसनी साध्या,सोप्या,मार्मीक भाषेत सांगितलं आहे की, विकसित झालेला भाग तुमच्याकडे म्हणजे महानगरपालिकेने बघायचं याठिकाणच्या सगळया गरजा महानगरपालिकेने बघायच्या परंतु जो काही मलीदाचा भाग आहे,जे काही भूखंड आहेत ते आमच्याकडे द्यायची उदाहरण द्यायचं झालं तर सिमाताईच्या प्रभागामध्ये

सेक्टर १२ मध्ये साडे अकरा हजार घरे होणार आहेत. असा भाग विकसित करणार आणि त्यांच्या सुविधाचा बोजा हा आपल्याकडे टाकणार आहेत. आणि मग आपण त्या लोकांना सुविधा कशा द्यायच्या आता राजेंद्रनी म्हणलं की,आमच्याकडे पाणी नाही,म्हणजे आज आपल्या शहराची अशी अवस्था आहे की,आपल्या शहरामध्ये मुबलक पाणी नाही. आपल्याकडे अनेक गोष्टीच्या त्रुटी आहेत,कमतरता आहे ज्यावेळेला पाणी येईल त्यावेळेला बघता येईल परंतु आज त्यांनी असे मोठ,मोठे टॉवर बांधले,बिल्डींग विकसित केल्या तर त्यातुन येणारा निधी ते स्वत:कडे ठेवणार आहेत. त्या निधीवर आपलं लक्ष आहे का,आपला डोळा आहे का, तर अजिबात नाही. घ्यायचं असेल तर अखंड ठेवा त्याच्यामध्ये विकसीत भूखंड असतील, किंवा जे मोकळे भूखंड असतील त्याच्यासहीत त्यांनी आपल्याकडे वर्ग केला तर निश्चितपणे तो भाग आपल्याच शहराचा आहे त्यामुळे तो भाग आपल्याकडे घ्यायला हरकत नाही. परंतु मोकळे भूखंड तुमच्याकडे ठेवणार आणि विकसित भाग हा आमच्याकडे ठेवणार असंही चालणार नाही. दुसरा भाग असा आहे की,एक तर आपण स्विकारायचं काही कारणचं नाही. आणि समजा स्विकारलचं तर त्यांनी सुध्दा आपल्याला सांगितलं पाहिजे की, हे,हे असे भूखंड आहेत १००/२०० भूखंड आहेत आणि या भूखंडावरती आमचं अशा प्रकारचं नियोजन आहे. जे उद्या आपल्या शहराला पेलवणार आहे की नाही याचा सुध्दा आपण विचार केला पाहिजे. त्यामुळे आपल्याला विनंती आहे की, आपण आपल्या महापालिकेचा एक ठराव करुन शासनाकडे पाठविला पाहिजे. आणि साहेबांना चांगल माहिती आहे की,कोणाकडे कसे ठराव पाठवायचे असतात तसे ठराव पाठवून द्या. साहेब,नक्की आपल्याला गाईड करतात की, आपल्याला या ठरावाचं सकारात्मक उत्तर आलं पाहिजे. आणि आता आमचे विरोधी पक्षनेते याठिकाणी नाहीत त्यांनी माझ्या लक्षात आणुन दिलं की,ताई तुम्ही नक्की काय बोलला आहात माझा अजिबात तसा हेतू नव्हता. गरज असेल त्यावेळेस आम्ही नांव घेवुन बोलू पाठीमागे वार करण्याची जमात आमची निश्चित नाही. आम्ही अगदी प्रांजळ मनाने सांगितलं होतं की, कमिशनर साहेब, आपल्याकडे कोणती मांजर आडवी गेली असेल,पाल चुकचुकली असेल तर निश्चितपणे आपण परत तीन पाऊले मागे जाणार नाही अशी योजना करा. धन्यवाद.

**मा.संदीप कस्पटे -** मा.महापौर साहेब,मा.आयुक्त साहेब,सन्मा.सभागृह प्राधिकरणाचा पीएमआरडीए मध्ये विलीनीकरणाचा जो विषय झाला आहे त्याचा प्रथम मी निषेध करतो. वास्तविक पहाता आपल्या शहरातील गोरगरीब,कष्टकरी,कामगार वर्गाला स्वस्त दरात घरे मिळावीत या हेतुने या प्राधिकरणाची स्थापना करण्यात आली आहे. प्राधिकरणाने त्या काळात याठिकाणच्या भूमिपुत्राच्या जमीनी कवडीमोल दरात संपादीत केल्या होत्या आणि त्या शेतक-

यांना अजुन त्याचा साडेबारा टक्के परतावा देखील मिळाला नाही. अशा जागांना आता सोन्याचा भाव आलेला आहे. आणि अशा हजारो कोटीच्या जागा,शेकडो कोटीच्या ठेवी याच्यावर डोळा ठेवुन याचं पीएमआरडीए मध्ये विलीनीकरण करणं म्हणजे पिंपरी चिंचवडवासियांच्या घरांवर दरोडा टाकल्यासारखंच आहे. वास्तविक पहाता मागच्या सरकारने देखील विलीनीकरणाचा प्रस्ताव आणला होता परंतु आमच्या शहरातील दोन वाघ आमदार लक्ष्मणराव जगताप आणि आमदार महेशदादा लांडगे यांनी त्या प्रस्तावाला विरोध केला. आणि तत्कालीन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी ते विलीनीकरण थांबवलं.आता राज्यामध्ये महाविकास आघाडीचं सरकार आहे.आता आपल्या शहरातील महाविकास आघाडीच्या नेत्यांनी देखील असं धाडस दाखवून या विलीनीकरणाला विरोध करावा अशी मी याठिकाणी मागणी करतो.

**मा.सिमा सावळे -**मा.महापौर साहेब,मा.आयुक्त साहेब,सन्मा.सभागृह प्राधिकरणाचं विलनीकरण म्हणता येणार नाही.पहिलं प्राधिकरण बरखास्त केलं नंतर शासनाने ताब्यात घेतलं आणि मग पीएमआरडीए कडे गेलं. गेल्या अनेक दिवसापासून बातम्या येत होत्या आणि आपल्याला माहिती होतं की, प्राधिकरणाचं अशा प्रकारचं म्हणजे खाडेसर अध्यक्ष असताना अशी काही तरी बातमी होती. पण एक प्रामाणिकपणे असं वाटत होतं की, प्राधिकरण बरखास्त होऊन हे संपुर्ण क्षेत्र महापालिकेकडे येईल असं वाटलं होतंजेणेकरुन एक सुंदर विकास आपल्याला करता येईल.दुर्देवाने तसं झालं नाही.गेल्या अनेक वर्षापासून या प्राधिकरणाच्या बरखास्तीच्या बातम्या येत होत्या. प्राधिकरणाच्या कमिटीवर मा.कमिशनर साहेब आपण पण होता एकाच दिवसात निश्चितपणे अशा प्रकारचा कुठलाही निर्णय होत नाही. आणि हा निर्णय होत असताना खरंतर आपण त्याठिकाणी संचालक म्हणुन होता आपण या महापालिकेचे हित लक्षात घेता आपण सुध्दा आपलं म्हणणं त्याठिकाणी मांडायला पाहिजे होतं. मा.महापौर साहेब,माझ्याकडे महाराष्ट्र शासन नगरविकास यांची अधिसूचना आहे दि.७/६/२०२१ ला काढली आहे. या अधिसूचनेची प्रत पिंपरी चिंचवड महानगरपालिका,पिंपरी आपल्याकडे पण आलेली आहे. आजच्या सभेतील अजेंडयावर जो विषय आहे त्यातील शेवटचा विषय आहे. शासकीय पत्र सभागृहाच्या पटलावरती ठेवायचे दि.७ /६/२०२१ रोजी राज्य शासनाकडुन पत्र आलं आपला अजेंडा १० तारखेला निघाला अपेक्षित होतं की,हा सुध्दा विषय सभागृहाच्या समोर यावा.आम्ही तर वृत्तपत्रांमध्येच वाचलं प्राधिकरणाचं विलीनीकरण,बरखास्तीकरण ज्या काही घडामोडी त्याठिकाणी झालेल्या आहे त्यासंदर्भात सेक्टर १ ते १३ हे इंद्रायणीनगर भागामध्ये येतो आणि निश्चितपणे एक सुसज्ज अशा पेठा निर्माण करुन प्राधिकरणाने

त्याठिकाणी काम करायला पाहिजे होतं. हे काम काही अंशी झालं आणि काही ठिकाणी पुर्णपणे फेल गेलेलं आहे. मा.महापौर साहेब,ज्यावेळेस युडीचा आदेश निघाला ख-या अर्थानं हा विषय आमच्या अजेंडयावरती आला असता मा.नगरसचिव साहेब,आपण पण सुध्दा लक्ष देवुन ऐका या अशा सगळया विषयावरती राज्य शासनाबरोबर केलेला पत्रव्यवहार हा फक्त आयुक्तांसाठी नसुन महापालिकेसाठी असतो.आणि तुम्ही नगरसचिव आहात,तुम्ही हुशार आहात,तुम्हांला आम्ही सांगण्याची गरज नाही. महापालिका म्हणजेच नगरसेवक आमच्या माहितीकरीता असणारे सगळे विषय हे सभागृहाच्या पटलावरती आणण्याचं काम तुम्ही आयुक्तांच्या निदर्शनास आणुन द्यायला पाहिजे. आणि हे सगळया विभागांनी निदर्शनास आणुन द्यायला पाहिजे. तसं परिपत्रक नव्याने काढण्याची तशी गरज नाही. मा.श्रीकर परदेशी हे याठिकाणी आयुक्त असतांना त्यांनी अशा प्रकारचं एक परिपत्रक काढलं होतं आणि तशी कायद्यामध्ये सुध्दा तरतुद आहे. हे अचुकपणे व्हायला पाहिजे. त्यासाठी ज्या ज्या विभागाला वारंवार अशा प्रकारची आठवण करुन द्यावी लागते नां त्या,त्या विभागाला दोषी धरले पाहिजे. आमचं म्हणणं आहे की,हे सगळे पत्रव्यवहार आमच्या पुढे आणा नेमकं काय चाललंय हे आम्हांला कळलं पाहिजे म्हणुन आम्ही त्याचा आग्रहच करतोय. आम्ही लोकप्रतिनिधी आहोत,राज्यामध्ये काय चाललयं, प्राधिकरणात काय चाललयं,महापालिकेमध्ये काय चाललयं, आणि आता पीएमआरडीए मध्ये काय चाललयं हे आम्हांला कळलं पाहिजे. आणि म्हणुन अशा प्रकारचा पत्रव्यवहार आमच्या समोर आणला गेला पाहिजे. परिपत्रक,अहवाल आमच्यासमोर आणले गेले पाहिजेत. या सगळया गोष्टींची कायद्यामध्ये तरतुद असताना सुध्दा जेंव्हा तुम्ही कायदा पाळत नाही आणि म्हणुन अशा प्रकारच्या निर्णयाचं आम्ही निषेध करण्याच्या पलिकडे किंवा कोर्टाचं दार वाजवण्याच्या पलिकडे आम्ही काय करु शकतो. म्हणुन मा.महापौर साहेब,आपण प्रशासनाला आदेश करावेत आणि ते कडक स्वरुपात केले पाहिजेत. महापालिकेच्या अधिनियमाचं प्रशासनाकडनं वारंवार जे उल्लंघन होत आहे ते जर आमच्या सारख्या नगरसेवकांकडनं झालं असतं तर आपलं सदस्यत्व रद्द का करण्यात येऊ नये म्हणुन नोटीसा बजावण्यात आल्या असत्या. आता कमिशनर साहेब,तुम्ही सांगा आम्ही नोटीसा कोणाला बजावयाच्या. आमचा अधिकार आहे त्या अधिकारापासून तुम्ही आम्हांला वंचित ठेवलं आहे. हे जे अनेक विषय आहेत ज्याच्या संदर्भातील आलेले आहेत.शासनाकडुन आलेले आदेश,परिपत्रक,अहवाल आमच्यासमोर आणले जात नाहीत. मा.महापौर साहेब,राज्य शासनाने प्राधिकरण बरखास्त केलं आपण सगळयांनी वृत्तपत्रांमध्ये वाचलं दोन्ही आमदारांनी याठिकाणी निषेध नोंदवला हायकोर्टात जाण्याची याठिकाणी घोषणा सुध्दा झालेली आहे.

खरंतर प्राधिकरण बरखास्त झालं याचा माझ्या सारख्या नागरीकांला प्रचंड आनंद आहे. माझ्यासारखं अनेकांना आनंद झाला आहे. तर हा आनंद द्विगुणीत कधी झाला असता जर हे संपुर्ण क्षेत्र महापालिकेच्या अखत्यारित आलं असतं तर, सर काय होतं आपल्या हद्यीत प्राधिकरण आहे,महापालिका आहे,एमआयडीसी,म्हाडा किती संस्थांनी काम करायचं,कोणाचा ताळमेळ कोणाच्या बरोबर नाही. आणि म्हणुन काम करण्यास अडचणी उभ्या रहातात. त्यामुळे हे जर महानगरपालिकेकडे आलं असतं तर जास्त चांगल्या पध्दतीनं आणि जलद गतीनं त्या पेठांचा विकास झाला असता आणि म्हणुन या विलनीकरणाला आमचा विरोध आहे. मा.महापौर साहेब,प्राधिकरणाची जी चल,अचल जी संपत्ती आहे ती खरंतर मनपाकडे हस्तांतरीत व्हायला पाहिजे होती. कारण तेथुन आमच्या सारखे नगरसेवक निवडुन येतात निगडी प्राधिकरण,किंवा मोशी इंद्रायणीनगर प्राधिकरण असेल तिथुन नगरसेवक निवडुन येतात. खरंतर महानगरपालिकेच्या अंतर्गतच तिची रचना व्हायला पाहिजे. का,केली नाही हा मोठा संशोधनाचा विषय आहे. आणि पीएमआरडीए खास करुन ग्रामीण भाग कसा विकसित होईल. जलद गतीने ग्रामीण भागाचा विकास कसा करता येईल याच्यासाठीच पीएमआरडीएची स्थापना करण्यात आलेली आहे. पण पीएमआरडीए शहरात पण घुसतयं,ग्रामीणला पण तेच, महानगरपालिका बरखास्त करण्याचा विचार आहे का त्यांचा असेल तर तसं स्पष्ट करावं. जर पीएमआरडीए मध्ये विलनीकरण करायचं होतं तर प्राधिकरण काय वाईट होतं. ते तसंच ठेवायला पाहिजे होतं. नेमकं शासनाची भूमिका याठिकाणी कळून येत नाही. प्राधिकरणाच्या इतक्या जाचक अटी होत्या आणि आहेत. साहेब,एक घर विकत घेतलं नां राज्य शासनाला आपण खरेदीखताचे पैसे भरतो आणि परत इथे ट्रान्सफर फी ऐंशी हजार,नव्वद हजार भरावी लागते. जितक्यावेळ ट्रान्सफर होईल तितक्या वेळ ट्रान्सफर फी भरावी लागते. सुविधाच्या नावाने बोंबा बोंब, तिथं गेलो तर अत्यंत उर्मटपणाने बोलणारे अधिकारी, ज्या हेतुने प्राधिकरणाची स्थापना झाली होती. गोरगरीबांच्यासाठी घरे उपलब्ध करुन द्यावी जसं म्हाडा आहे. परंतु याठिकाणी ना म्हाडा घरं बांधतयं नां प्राधिकरण घरं बांधतयं. साहेब,मागच्या वेळेस प्राधिकरणाने भूखंडाचे लिलाव केले,लिलाव तीन गुंठा प्लॉटसाठी दिड,दिड कोटी रुपयांमध्ये लिलाव केला आहे. अशा प्रकारे प्राधिकरणाचं काम चाललं होतं म्हणुन प्राधिकरण बरखास्त झालं याच्यामध्ये माझ्यासारख्या कार्यकर्त्याला प्रचंड आनंद झाला. पण तितकचं दु:ख झालं की, पीएमआरडीए केलं. पीएमआरडीएला दिवसे साहेब आहेत जागांच्या बाबतीत प्रचंड अनुभव असणारे अधिकारी आहेत. आणि अशा अधिका-यांकडे गेल्यामुळे जास्त भिती वाटायला लागली आहे आता त्यांचे काही प्रोजेक्टस आहेत काळेवाडी

फाटयावरुन कलाटेंच्या घरांकडे जातो दोन्ही बाजुचा १०० ते १२५ एकरचा भूखंड त्याचं ऑलरेडी वाटप करण्याच्या हालचाली झालेल्या आहेत. त्याच्यावरती मी खुप बोंबाबोंब मारली म्हणुन काही अंशी ते थांबलेलं आहे. पण सगळं ठरलेलं आहे. आणि अशा प्रकारचे भूखंड लँडमाफियांच्या घशात घालायचे या उद्देशानेच पीएमआरडीएकडे वर्ग करण्यात आले आहे. आणि म्हणुन या विलनीकरणाला विरोध आहे. ज्या शेतक-यांच्या जमीनी १९७२ साली प्राधिकरणाने भूसंपादन केलं,जमीनी ताब्यात घेतल्या म्हणजे त्यावेळेस एक रुपयाने घेतलेल्या जमीनींची किंमत आज कोटयावधी रुपये झालेले आहे. आणि त्या जमीनी त्यांनी आता लिलाव पध्दतीने विकायला सुरुवात केलेली आहे. मराठी शाळा चालवणा-यांना त्याठिकाणी एकही भूखंड मिळालेला नाही. त्यांचा जो डी.पी. आहे त्या डीपी मध्ये मराठी शाळेसाठी भूखंड आरक्षित असतात त्याठिकाणी मराठी शाळा चालवल्या गेल्या पाहिजेत. असा नियम आणि कायदा आहे. कारण मराठी शाळेचा जो संचालक/मालक असतो एक तर मराठी शिकणारी मुलचं कमी झालेली असल्यामुळे त्याला त्या भूखंडाचे दरच परवडत नाहीत. आणि म्हणुन ते त्याठिकाणी ते भूखंड विकत घेवु शकत नाहीत. आणि म्हणुन त्यांच्या विलनीकरणाला विरोध आहे. मा.महापौर साहेब,प्राधिकरण बरखास्त करुन सेक्टर ५,८,९,११ व १२ च्या अंतर्गत असलेले सुमारे ३७५.९० हेक्टरचे क्षेत्र म्हणजेच सुमारे ९३८.२० एकर जमीन शासनाने पीएमआरडीएला दिलेली आहे. हा त्यांचा आदेश आहे. आज जर काशासनाच्या रेडीरेकनरनुसार आपण दर काढला तर त्याठिकाणी २२ ते २५ लाख रुपये गुंठयाला रेट आहे. या जमीनीचे मुल्य सुमारे १२ हजार कोटीच्या घरात आहे. साहेब,हे जे आहे नां ते आपल्याकडे आले असते नां आपण प्राधिकरणामध्ये सोयीसुविधा देतोय,हे आपल्याकडे यायला पाहिजे होतं. आणि इतक्या मोठया स्वरुपाची जमीन पीएमआरडीए कडे नवनगरविकासाच्या नावाखाली,गोंडस नावाखाली आपण त्यांच्याकडे दिलेली आहे. त्यांचा हेतू तर स्पष्ट आहे विलनीकरण का केलं यामध्ये नागरीकांच काय म्हणणं होतं मगाशी काहींनी म्हणले की,नागरीक खुप खुश आहेत. राजाभाऊ जसं तुम्ही खुश आहात नां तसे आम्ही पण खुश आहोत प्राधिकरणाच्या जाचातनं. तुम्ही अधिसूचना वाचा या अधिसूचनेमध्ये आपली जी घरे आहेत नां ती सुध्दा पीएमआरडीए कडे आहे. आता आम्हांला नवीन सासर आहे. मा.महापौर साहेब, याठिकाणी आपण गेल्यानंतर हे अधिकारी आपलं ऐकत नाहीत आम्ही त्याठिकाणी वारंवार गेल्यानंतर आम्हांला आंदोलनाची भाषा करावी लागते. ही सगळी घरं, या घराची भूखंड आपल्या आजुबाजुचा विकसित परिसर आहे त्यात असलेले मोठे भूखंड संपुर्णपणे पीएमआरडीए कडे वर्ग केलेले आहेत. यासाठी आपण विशेष सभा बोलावली पाहिजे. मी विलनीकरणाला विरोध करीत आहे.

मा.महापौर साहेब,ही मोठमोठी भूखंड पीएमआरडीए कडे गेलेली आहेत आणि आपल्याला नजीकच्या काळात दिसुन येईल की,हे कुठल्या तरी प्रायव्हेट बिल्डरच्या घशात घालणार. सेक्टर १२ माझ्याच प्रभागामध्ये ११५३७ घरांचा प्रकल्प राबविण्यात येत आहे. गरीबांसाठी आहे म्हणुन अजिबात विरोध करत नाही. ईडब्ल्युएस सारखी योजना त्याठिकाणी राबवली जात आहे. साहेब,साधं गणित आहे. साडे अकरा हजार लोक येणार शासनाच्या हिशोबाने केलं तर एका घरात पाच लोकं  जवळपास ५५ हजार ते ६० हजारांनी आमच्या भागातील लोकसंख्या वाढणार आहे. आजच आम्हांला सगळया सेक्टर मध्ये एक वेळ पाणी देतांना आमची तारांबळ उडते आहे. आणि त्याठिकाणी आम्ही लोकांना पुरेसं पाणी देवु शकत नाही. आणि त्याच ठिकाणी साडेअकरा हजार घरे होत आहेत. यांच्यासाठी प्राधिकरणाने पाण्याची सोय केलेली नाही. आता या घराचा एक  ड्रॉ झालेला आहे. ते पीएमआरडीएकडे वर्ग केलं आहे. लोकांच्या घरांच्या किंमती अवाच्या सव्वा केलेल्या आहेत. साडे बत्तीस लाखाला टु बीएचके चा फ्लॅट काढलेला आहे. त्यामध्ये १० बाय १० चा हॉल, म्हणजे तो दिड बीएचके पण नाही. याच्यामध्ये प्रधानमंत्री आवास योजनेचे अडीच लाख रुपये  कट करुन साडे बत्तीस लाख रुपये किंमत काढली आहे.  त्या लोकांना पाण्याची व्यवस्था नाही. मी स्टँडींग चेअरमन असताना स्पाईन रोडला लागुन टेल्को रोडला लागुन रस्ताआहे तो १०० फुटाचा केला, साई चौकातनं परत टेल्को रोडला गवळीमाथ्यावरुन येणारा रस्ता तो १०० ते १२५ फुटाचा केला हे छोटे,छोटे रस्ते होते. हे सगळे रस्ते आम्ही मोठे केले आहेत. का,तर आताच त्याठिकाणी जड वाहतुक करणारी वाहतुक असते, एमआयडीसी मोठया प्रमाणात आहे आणि  लोकांचे जीव जाण्याचे प्रमाण जास्त असते. म्हणुन हे माझ्या कालावधीमध्ये केलेलं काम आहे. आता ही ६० हजार लोकसंख्या वाढणार आहे. यांच्यासाठी नवीन रस्ता नाही,यांच्यासाठी दवाखाना नाही,मंडई नाही, कम्युनिटी हॉल नाही, यांना सगळया सुविधा या आपल्याला द्याव्या लागणार आहेत. आणि म्हणुन हा भाग आपल्याकडे यायला पाहिजे होता. म्हणुन मा.महापौर साहेब,या विलनीकरणाला विरोध आहे. त्याठिकाणी आंतरराष्ट्रीय प्रदर्शन केंद्र होत आहे. आख्खी जागा,भूखंड तुम्ही  पीएमआरडीएला दिली आहे. आपल्याकडे यायला पाहिजे होती. आपलं उत्पन्न वाढलं असतं, आपण त्याठिकाणी रस्ते मोठे केले असते, पण ते झालं नाही आणि हेतुपुरस्पर होऊ देत नाहीत की काय अशी शंका मनात यायला लागली आहे. आणि म्हणुन मा.महापौर साहेब,विलनीकरणाला विरोध आहे. त्याच बरोबर प्राधिकरणाचे जेवढे मोकळे भूखंड असतील कमिशनर साहेब,आपल्याला विनंती आहे की, असं ठरलं होतं की, जे आरक्षण आहेत ती आरक्षणं प्राधिकरणाने विकसीत करावीत. प्राधिकरणाने काय केलं त्यांच्या विकास

आराखडयानुसार १९७२ सालापासून २३७ आरक्षणं होती. माझा जन्म १९७० सालचा आहे. म्हणजे जवळपास ४८ वर्ष झाली त्यावेळेसची २३७ आरक्षण होती त्यापैकी केवळ ३७ आरक्षणं प्राधिकरणाने विकसित केलेली आहेत. आणि त्यातही ७ ते ८ आरक्षणं महापालिकेच्या सहकार्याने विकसित केलेली आहेत. आणि २०० आरक्षणं अजुन तशीच आहेत. आता ही जी आरक्षणं राहिलेली आहेत प्राधिकरण बरखास्त झाल्यानंतर प्राधिकरणाच्या विकास आराखडयातील क्षेत्र मनपाकडे हस्तांतरीत केल्याचे वृत्तपत्रांमधुन समजले. शासनाने प्राधिकरणाकडे उपलब्ध असलेला निधी पीएमआरडीए कडे दिलेला आहे. साहेब,डीपी त्यांचा,आरक्षणं त्यांची,पेठा त्यांनी विकसित केल्या आहेत ,लोकांना हजाराचे भूखंड लाखो रुपयांना विकले आहेत,कोटयावधी रुपयांना विकले आहेत. मग आरक्षण त्यांनी विकसित करायला पाहिजे होते. त्यांनी २०० आरक्षणं विकसित केले नाहीत म्हणुन त्यांनी निधी तर आपल्याला द्यायला पाहिजे होता. तो संपुर्ण निधी पीएमआरडीए कडे वर्ग केला. साहेब,तुम्हांला सांगते, मी स्टँडींग कमिटीची चेअरमन झाले पहिल्याच मिटींगला माझ्या वॉर्डामध्ये जलतरणचा विषय होता,टेंडर काढलेलं होतं पहिल्याच स्टँडींगला विषय आला आमचे तत्कालीन अध्यक्ष लक्ष्मणभाऊ जगताप यांनी सांगितलं की, सिमाताई प्राधिकरण कोटयावधी रुपये कमवते आहे. त्यांनी आरक्षण विकसित केले पाहिजेत. आणि त्यांना ते बंधनकारक आहे आणि म्हणुन हा जलतरण तलाव तुम्ही रद्य करा दुर्देव साहेब,पहिल्याच मिटींगला मोठया जड अंतकरणाने मी निर्णय घेतला होता. का, आमचे तत्कालीन अध्यक्ष लक्ष्मणराव जगताप मला सांगु शकले असते,काय हरकत नाही करुन टाक, काय फरक पडतो,ही संस्था आहे आणि ती ही संस्था आहे. पण नाही साहेब,आम्ही त्यावेळेस महापालिकेचं हित जपलं, महापालिकेचे पैसे ग्रामीण भागामध्ये कसे जातील याच्याकडे आम्ही लक्षं केंद्रीत केलं आणि आम्ही तो स्विमींग पुल रद्य केला. तो याच्यासाठी नाही की आम्हांला तो करायचा नव्हता, आम्हांला तो करायचा आहे पण ज्याठिकाणी आरक्षण आहे आणि त्याच बरोबर ज्यांनी ते आरक्षण टाकलं ते म्हणजे प्राधिकरण होतं त्यांनीच ते आरक्षण विकसित करावं,त्यांनीच ते पैसे त्या कामाला द्यावेत. आणि म्हणुन आम्ही तो रद्य केला. नाही,केलं ना साहेब त्यांनी आमच्याकडनं सगळया प्रकारचे टॅक्स वसुल केले आणि आमच्याकडचं आरक्षण विकसित केले नाही म्हणुन या विलनीकरणाला विरोध आहे. मा.महापौर साहेब,आज हजारो कोटीचा निधी हा संपुर्ण पीएमआरडीएकडे गेलेला आहे. तो निधी आणि हे सगळे भूखंड आपल्याकडे कसे येतील यासाठी आपण राज्य शासनाकडे,पालकमंत्र्याकडे मागणी केली पाहिजे. या सभागृहात मा.विरोधी पक्षाचे सर्व नेते, आता जे नेते उपस्थित आहेत त्यांनाही मी विनंती करेन की,आपण पालकमंत्र्यांकडे मागणी

करा, मला चांगल माहिती आहे,भाऊसाहेबांचा पण विरोध आहे. पीएमआरडीए मध्ये विलनीकरणाला आहे. आपल्या महानगरपालिकेकडे हे सगळे भूखंड आले तर निश्चितपणे आपण जास्त चांगल्या प्रकारे विकसित पण करु शकतो. आपल्या निधीमध्ये पण भर पडणार आहे. आणि म्हणुन या प्राधिकरणाच्या विलनीकरणाला विरोध यासाठी करेन की,ज्या थकबाकी रक्कमा आहेत त्या महापालिकेने वसुल करायच्या आहेत. पण जे चांगले आहे ते ही आमच्याकडे द्या. जेणेकरुन आम्हांलाही लोकांना सांगता येईल आणि आमची भूमिका त्याठिकाणी चांगली आहे हे लोकांच्या लक्षात आलं तर लोकं त्याठिकाणी पैसे पण भरतील आणि आपला सुध्दा महसुल वाढेल. आणि म्हणुन मा.महापौर साहेब,प्राधिकरणाच्या विलनीकरणाला विरोध असण्याचे अनेक कारणं आहेत त्याचबरोबर साहेब,आपण प्राधिकरणात संचालक असताना अशा प्रकारचा ज्यावेळेस ठराव होत होता त्यावेळेस एक जागरुक आयुक्त म्हणुन तुमचं सुध्दा त्यावरती लक्षं असलं पाहिजे होतं. आणि आमच्यासारखे प्राधिकरणाच्या भागामधील जे नगरसेवक होते त्यांना जरी तुम्ही कळवलं असतं तर आम्ही सुध्दा आमच्या पध्दतीने विरोध दर्शवला असता,कोर्टाचं दार वाजवलं असतं आणि हा भाग आपल्याकडे कसा आला येईल यासाठी आम्ही जास्तीत जास्त प्रयत्न केले असते. मा.महापौर साहेब,अशा प्रकारचा ठराव करुन आपण राज्य शासनाला पाठवावा नगरसदस्यांच्या भावना,महापालिकेच्या भावना या राज्य शासनाकडे गेल्या तर निश्चितपणे राज्य शासनाकडनं पॉझीटीव्हली करुन घेण्याचं काम याठिकाणी राष्ट्रवादीचे नेते आणि शिवसेनेचे नेते करतील आपण त्यांना सपोर्टींग भूमिका घेवु या एवढंच याठिकाणी सांगते आणि थांबते.जयहिंद,जयमहाराष्ट्र.

**मा.झामाबाई बारणे -**मा.महापौर साहेब,मा.आयुक्त साहेब,सन्मा.सभागृह प्राधिकरणाच्या विषयाच्या संदर्भात आताच सिमाताईंनी आणि अनेक नगरसदस्यांनी बोलून दाखवलेलं आहे. ज्यांचे,ज्यांचे भाग प्राधिकरणात आहेत ज्या,ज्या भागामध्ये गोरगरीब जनतेनी,आणि बाहेरुन आलेल्या नागरीकांनी त्यांनी ज्या काही भूमिपुत्राच्या जमीनी घेतलेल्या आहेत गुंठा/अर्धा गुंठा जागा घेऊन त्यांनी घरं बांधलेली आहेत. त्या जमीनी आपल्या शहरातील शेतक-यांच्याच आहेत. त्यामध्ये कलाटे असतील,बारणे असतील, कस्पटे असतील, वाल्हेकर असतील या भूमीपुत्राच्या ज्या जागा आहेत प्राधिकरणाच्या लोकांना तर मला वाटतं मी प्राधिकरणाच्या कमिटीवर होते त्यावेळेस दोन लेडीज आणि एक जेन्टस हे नेहमी येऊन बसायचे आणि सांगायचे आम्हांला साडेबारा टक्का परतावा मिळालेला नाही. त्यावेळेस आमच्या भागामध्ये गोरगरीबांना तीन हजार रुपये गुंठयांनी जागा दिलेली आहे. म्हणजे त्यावेळेस थेरगांव असेल,वाकड असेल,काळेवाडी असेल प्राधिकरण संस्था स्थापन झाल्यानंतर ज्या शेतक-यांना

भिती होती त्यावेळेस शेतक-यांनी आपल्या जमीनी कवडीमोल किंमतीला विकलेल्या आहेत. आणि काही शेतक-यांच्या जमीनी अजुन पण आहेत पण त्या जमीनीचा ताबा प्राधिकरणाने घेतलेला नाही. आणि ज्या लोकांनी गुंठा,अर्धा गुंठा जागा घेतलेल्या आहेत आणि त्यांनी त्याठिकाणी घरे बांधलेली आहेत. आणि ही घरे पीएमआरडीए कडे गेली तर आपलं काय होणार अशी भिती या लोकांना वाटत आहे. प्राधिकरणाच्या जागेमध्ये ज्यांनी घरे बांधली आहेत त्या प्राधिकरणाचा शिक्का अजुन काढलेला नाही. ही घरे जर महापालिकेमध्ये आली तर त्या लोकांना दिलासा मिळणार आहे. आणि याठिकाणी जी घरे झालेली आहेत त्याठिकाणी काहीच सोयीसुविधा प्राधिकरणाने केलेल्या नाहीत. गेली १० वर्ष मी त्या भागातून निवडुन आलेले आहे. त्या भागामध्ये अक्षरशा ओपन गटार होते. श्रीनिवास पाटील साहेब महापालिकेत आयुक्त होते आणि प्राधिकरणाचे अध्यक्ष होते. त्या जनतेचे एवढे हाल होत होते त्याठिकाणी लाईट,पाणी,रस्ते,गटर काहीच नव्हते. त्यावेळेस आपण काही स्केअरफुटावरती रक्कम दिली मला वाटतं १४ रुपये स्केअरफुट रेट होता. त्यानंतर पवार साहेब या भागामध्ये खुप लक्षं घालत होते त्यावेळेस पवार साहेबांनी श्रीनिवास पाटील साहेबांना सांगितलं की,ज्या त्या भागामध्ये सुविधा या द्यायलाच पाहिजे. आणि मग त्यावेळेला प्राधिकरणाची एनओसी मिळाल्यानंतर त्या भागामध्ये सुविद्या मिळायला सुरुवात झाली. प्राधिकरणामध्ये ज्या ज्या लोकांच्या जागा गेलेल्या आहेत त्यांना काही तरी दिलासा मिळावा अशा पध्दतीने लोकांच्या अपेक्षा वाढलेल्या होत्या. परंतु आता याच्यामधुन जर का त्यांची सुटका झाली तर बरे होईल. ज्या लोकांनी बाहेरुन येऊन याठिकाणी जागा घेतलेल्या आहेत आणि त्यांनी घर बांधतांना आली प्राधिकरणाची गाडी आली की त्यांच बांधकाम सपाट करायचे. म्हणजे एवढया भितीच्या वातावरणामध्ये त्या लोकांनी घरे बांधलेली आहेत. आणि अजुन पण त्यांच्या डोक्यावरती टांगती तलवार आहे. तरी माझा सुध्दा या विलनीकरणाला विरोध आहे एवढंच मी सांगते. आणि थांबते धन्यवाद.

**मा.अजित गव्हाणे -** मा.महापौर साहेब,मा.आयुक्त साहेब,सन्मा.सभागृह याठिकाणी प्राधिकरणाच्या विषयाला सुरुवात केली.सिमाताईंनी एक गोष्ट मान्य केली आहे की,प्राधिकरण बरखास्त केलं या गोष्टीचा सर्वांनाच आनंद आहे. प्राधिकरण निर्माण करण्याचं उद्दिष्ट असं होतं की,याठिकाणी आपली औद्योगिक नगरी निर्माण झाल्यानंतर याठिकाणी मोठया प्रमाणात कारखानदारी आली आणि त्यानंतर या कारखान्यात काम करण्यासाठी म्हणा किंवा व्यवसायाच्या निमित्ताने राज्यातुनच नाही तर देशाच्या कानाकोप-यातून लोक येऊन राहू लागली. आणि या लोकांना स्वस्त दरात अधिकृत घरे मिळावी किंवा त्यांना प्लॉट मिळावा

अशा प्रकारचा भूमिका घेवुन त्यावेळेस प्राधिकरणाची निर्मीती करण्यात आली. त्यावेळेस सुध्दा असा विषय आला असेल की, महापालिका आहे, प्राधिकरण आहे तर अशा दोन वेगळया संस्था का ठेवायच्या याच्यामध्ये मी ब-याचदा खोलात जाण्याचा प्रयत्न केला तेंव्हा प्राधिकरणाचं जे काम आहे ते महापालिका करु शकत नाही कारण प्राधिकरणाने ज्या शेतक-यांच्या हजारो एकर जागा भूसंपादन केल्या आणि त्याची डेव्हलपमेंट करुन त्यांनी विक्री करायची आणि अपेक्षित असं होतं की,ते रिझनल दरामध्ये याठिकाणी राहणा-या कामगारांना किंवा आजुबाजुच्या परिसरातील नागरीकांना स्वस्त दरामध्ये उपलब्ध करुन द्यावीत.पण नंतरच्या काळामध्ये आपण पाहिलं की त्याचे दर एवढया मोठया प्रमाणात वाढले की, प्राधिकरणात ही प्लांन्ट सिटी असल्यामुळे,रस्ते मोठ,मोठे असल्यामुळे त्याचे दर इतके वाढत गेले की, कामगारांना त्याठिकाणी घरं घेणं शक्य नव्हते. कालांतरान या शहराची डेव्हलपमेंट मोठया प्रमाणात झाल्यामुळे त्याठिकाणी आपल्याला जे अपेक्षित होतं त्याला कुठं तरी बाधा निश्चितपणे आलेली आहे. आणि हे करत असताना दोन गोष्टी आपल्यासमोर उभ्या राहिलेल्या आहेत . पहिला प्रश्न आहे की,प्राधिकरणाने आपल्या शेतक-यांच्या ज्या जमीनी ताब्यात घेतल्या त्यांना साडेबारा टक्का परतावा मिळण्याची भूमिका जेंव्हा घेतली गेली ज्यावेळेस ८३ च्या पुढच्या शेतक-यांनी ज्यावेळेला जमीनी दिल्या परंतु ७२ ते ८३ च्या दरम्यान ज्या शेतक-यांच्या जमिनी ताब्यात घेतल्या होत्या त्यांना आजतागायत साडेबारा टक्के परतावा मिळाला नाही. याबाबतीत आपल्या तीनही आमदारांनी प्रयत्न केलेले आहेत. परंतु ज्यावेळेस प्रॅक्टीकल सोल्युशन काढण्याचा विचार पुढं आला त्यावेळेस त्याच्यामध्ये असं लक्षात आलं की,या शेतक-यांना जर या जमिनी दिल्या तर प्राधिकरणाचं फार मोठया प्रमाणात नुकसान होईल आणि मोठया प्रमाणात जमीनी जातील. अशा प्रकारचं कॅलक्युलेशन त्याठिकाणी करण्यात आलं. आणि त्याच्यानंतर त्याच्यामध्ये एक मार्ग काढण्यात आला या शेतक-यांना साडेबारा टक्के परतावा न देता त्यांना दुस-या जागेच्या स्वरुपात एफएसआयच्या स्वरुपात द्यायच्या अशा प्रकारची भूमिका आपण राष्ट्रवादीच्या काळात त्यानंतर भाजपच्या काळात सुध्दा त्या,त्यावेळेस मांडली. परंतु दुर्देवाने दोन्ही गर्व्हेमेंटच्या काळामध्ये आपल्या अपेक्षेप्रमाणे निर्णय झाला नाही. आणि दुसरं आता अभिषेक बारणे आणि झामाताई बारणे यांची विषय मांडला आहे. काळेवाडी,रहाटणी,वाकड,थेरगांव भोसरी या भागातल्या मुळ शेतक-यांनी प्राधिकरणाला जमीनी हॅण्डवर्क केलेल्या आहेत. कारण त्यांची उपजिविका ही त्याच्यावरती होती. त्यामुळे त्या शेतक-यांनी इथं येणा-या कामगारांना अर्धा गुंठा, एक गुंठा जमीनी विकल्या आणि त्या जागेमध्ये लोकांनी घरं बांधली. आणि ती घरं त्या लोकांच्या नावाने अधिकृत कशी

होतील याची मागणी आपल्या सर्व पक्षीय सदस्यांची राहिली आहे. मला वाटतं आमचे अंकुशभाऊ लांडगे यांनी धावडेवस्तीमधील पुर्ण परिसर जो आहे यासंदर्भात त्यांनी अनेक वर्ष प्रयत्न केलेले आहेत. परंतु तो पण विषय अजुन मार्गी लागलेला नाही. आपल्या सगळयांना अपेक्षा आहे की, ज्या कामगारांनी घरे घेतली आहेत त्यांच्या नावाने त्यांचा ७/१२ असावा ती घरे त्यांच्या मालकीची व्हावी त्याच्यामध्ये असा एक मुद्या पुढं आला आहे की, त्यांच्याकडे प्राधिकरणाने त्यांचा जो काही प्रिमियम आहे त्याचे काही परसेन्टेज चार्ज करुन ती घरे त्या कामगारांच्या नावाने करणेत यावी पण तो ही प्रश्न अद्याप सुटलेला नाही. हे दोन मुख्य प्रश्न आहेत आणि या प्रश्नांसाठी आपण भांडतोय आणि ज्या भूमिपुत्रांच्या जमीनी गेल्या आहेत त्यांनाही मोबदला नाही. या दोघांनाही आपल्याला न्याय द्यायचा आहे. खरंतर माई,या महाविकास आघाडीने प्राधिकरण बरखास्त केल्यामुळे या सरकारचं अभिनंदन केलं पाहिजे. प्राधिकरणाचं पीएमआरडीए मध्ये वर्ग केल्यामुळे याठिकाणी प्रत्येकाची मतं वेगळी आहेत. प्रत्येकजण याला वेगळया अँग्लनी पहातो. तुम्हांला वाटतयं पीएमआरडीए मध्ये वर्ग केली ही त्यांची चुक झाली पण आम्ही याच्या खोलामध्ये जाऊन अभ्यास केला. आम्हांलाही या जमीनी महापालिकेच्या ताब्यात आल्या असत्या तर आम्हांलाही निश्चित आनंद झाला असता. परंतु महापालिकेच्या ताब्यात या जमीनी आल्या असत्या तर महापालिका हे प्लॉट विकु शकत नाही. ब-याच जमीनी अशा आहेत की,त्याची अजुन विक्री करायची आहे. माझ्या माहितीप्रमाणे महापालिकेचे जे कर्तव्य आहे त्याच्यामध्ये अशा प्रकारचे प्लॉट महापालिकेला विक्री करण्याचे अधिकार नाहीत. म्हणुन कदाचित शासनाला हा निर्णय् घ्यावा लागला की,तुम्हांला आता काही सेक्टर सिमाताईंनी वाचुन दाखवले त्याच्यामध्ये मुख्यता जे सेक्टर पीएमआरडीएनी त्यांच्याकडे ठेवले आहेत इंटरनॅशनल कन्व्हेन्शन सेंटर हे शरद पवार साहेबांच एक मोठं स्वप्न आहे. त्या स्वप्नाची पुर्तता आजपर्यंत झालेली नाही. माई, इंटरनॅशनल कन्व्हेन्शन सेंटर जर उभं राहिलं तर आपल्या पिंपरी चिंचवड शहराचंच नाही तर पुर्ण पुणे जिल्ह्यातील लोकांना याचा फायदा होणार आहे. ज्या काही सर्व्हीसेस द्याव्या लागतील त्याचा जास्त लोकांना फायदा मिळेल. इंटरनॅशनल एअरपोर्ट चाकणला करण्यामागची भूमिका हीच होती की, इंटरनॅशनल कन्व्हेन्शन सेंटर हे आपल्या पिंपरी चिंचवड मध्ये मोशी याठिकाणी होणार होतं. ज्या ज्या शहरामध्ये इंटरनॅशनल कन्व्हेन्शन सेंटर आहेत त्या शहराची जर आपण माहिती घेतली तर त्या परिसराचं अर्थकारण पुर्ण बदलून जातं त्या परिसराला प्रचंड फायदा होत असतो. आणि त्यादृष्टीने त्या शहरामध्ये इंटरनॅशनल कन्व्हेन्शन सेंटर काढण्याची भूमिका ठेवली होती. दुर्देवाने ते आजतागायत झालेलं नाही परंतु जर हे महाराष्ट्र शासनाकडे राहिलं तर आता आपण

माहिती घेतलेली आहे की,आपण आता पीएमआरडीए कडे जे क्षेत्र ठेवलेलं आहे त्याच्यामध्ये महापौर म्हणुन तुम्ही सुध्दा सदस्य असणार आहात, स्टँण्डींग चेअरमन सदस्य आहेत, आपल्या विभागातील आमदार सुध्दा त्याठिकाणी सदस्य असणार आहेत. त्यामुळे त्याठिकाणी डेव्हलपमेंट करताना आपल्याला विश्वासात घेतलं जाणार नाही अशातला भाग नाही. त्यामुळे डेव्हलपमेंट होत असताना पीएमआरडीएच्या माध्यमातुन सुध्दा त्या भागातील डेव्हलपमेंट ही आपल्या हिताचीच होणार आहे. दुसरी जी भिती आपल्या सगळयांच्या मनामध्ये आहे आपल्याकडील मोठया प्रमाणातील निधी तो पीएमआरडीए कडे जाणार आहे आणि तो वेगवेगळया ठिकाणी खर्च केला जाणार आहे असं आपल्याला वाटतं. परंतु तसं होणार नाही. मा.महापौर साहेब, तुम्ही त्याठिकाणी या भागाचे प्रतिनिधी असणार आहात त्यामुळे तुम्ही त्याठिकाणी बारकाईने लक्ष घालणार आहात. आणि आम्ही पण मुख्यमंत्र्यांशी बोलू,दादांशी बोलू आमचा जो निधी पीएमआरडीएकडे नेला आहे तो निधी आमच्याच भागातील विकासासाठी वापरणेत यावा अशा प्रकारची देखील मागणी आम्ही दादांकडे केलेली आहे. आणि येणा*-या काळातआम्ही सुध्दा तुमच्या बरोबर दादांना बोलणार आहे. परंतु प्राधिकरण बरखास्त झालं त्याचा आनंद आपल्या सगळयांना आहे. प्राधिकरणाचा अनुभव मी पण घेतलेला आहे. पुर्वी प्राधिकरणाचा प्लॅन सॅक्शन करायचा असेल तर इतक्या कटकटी असायच्या सर्वसामान्य माणसांच्या आवाक्या बाहेरचा विषय होता. प्राधिकरणाच्या अधिका-यांची वागणुक ही प्रचंड त्रासदायक होती. आमचे राजाभाऊ यांचा संपुर्ण प्रभाग हा प्राधिकरणाचा आहे. त्यामुळे त्यांना जास्त अनुभव असेल त्यामुळे आपल्या शहराची त्या प्राधिकरणामधुन सुटका झालेली आहे. जुने अधिकारी होते ते आता रिटायर झालेले आहेत ते इतके भयानक काम करायचे ते लोकांना इतका त्रास द्यायचे जणु काय ते लोकांना त्रास देण्यासाठी ठेवले आहेत की काय असे वाटायचे अशा प्रकारचं त्यांच वागणं होतं. काही काळापुरते प्राधिकरणामध्ये भाऊसाहेब भोईर,झामाबाई बारणे, बाबासाहेब तापकीर यांना त्याठिकाणी प्रतिनिधीत्व करण्याची संधी मिळाली. त्याठिकाणी लोकप्रतिनिधी होते त्यावेळेस चांगल काम झालं,नागरीकांनाही मदत झाली,भूमिपुत्रांनाही मदत झाली. त्यामुळे अशा कामकाजामध्ये जोपर्यंत लोकप्रतिनिधीची इन्व्हॉलमेंट होत नाही तोपर्यंत त्याठिकाणी चांगल्या प्रकारे कामकाज होत नाही. मागच्या गव्हेंमेंटच्या काळामध्ये सुध्दा प्राधिकरण बरखास्त करण्याचा निर्णय ऑलमोस्ट घेतला होता. त्यांचीही भूमिका हीच होती की,प्राधिकरण बरखास्त करावं. आणि त्यावेळेस सुध्दा टेक्नीकल अडचण हीच होती त्यावेळेस तुमच्या लोकांनी जाऊन सांगितलं की, हे करु नका. परंतु आज सुदैवाने या जिल्ह्याचे पालकमंत्री अजितदादा आहेत या शहराची

जी काही जडणघडण झाली आहे त्याच्यामध्ये अजितदादाचं मोठं योगदान आहे. आणि या पिंपरी चिंचवडवर अन्यायकारक काम दादाकडनं झालेलं नाही. आणि नजिकच्या काळामध्ये पण होणार नाही. दादांनी जेवढं बारामतीवर प्रेम केलं आहे तेवढंच प्रेम पिंपरी चिंचवड शहरावर केलेलं आहे हे आपण पाहिलेलं आहे. पिंपरी चिंचवड महापालिकेची फाईल कुठल्याही मंत्र्याकडे असली तर ती फाईल थांबत नव्हती कारण ही फाईल अजितदादांची आहे. दादांच ज्या शहरावरती नेतृत्व आहे.त्या शहराची ही फाईल आहे. पिंपरी चिंचवड शहरातील प्रत्येक कामाला शासनाची मदत झालेली आहे. त्यामुळे निश्चित रहा की,या सगळया विषयावर आपल्या शहराचा फायदाच होणार आहे. याची मला खात्री आहे. त्यामुळे प्राधिकरण बरखास्त करुन पीएमआरडीएमध्ये विलनीकरण करण्याचा जो शासनाने निर्णय घेतला आहे त्याचं आपण अभिनंदन करावं अशा प्रकारची मी सूचना मांडतो.धन्यवाद.

**मा.मिनल यादव -** मा.महापौर साहेब,मा.आयुक्त साहेब,सन्मा.सभागृह खरंतर महाविकास आघाडीने जो ऐतिहासिक निर्णय घेतला आहे त्यामुळे त्यांच कौतुक करते. त्याच बरोबर प्राधिकरणाचा जो विकसित क्षेत्र आहे तो पुर्णपणे महापालिकेकडे हस्तांतरीत केले आहे आणि त्यांचे जे बांधकाम परवानगीचे जे अधिकार आहेत ते आपल्या महापालिकेला मिळाले आहेत त्याच्यामुळे ९९ वर्षाच्या लिजचे ओझं जे आपल्या डोक्यावर होतं. सर्वसामान्य जनतेच्या डोक्यावर होतं ते उतरल्यामुळे या गोरगरीब लोकांना याचा आनंद आहे. त्याच्यामुळे जी अनधिकृत बांधकामे आहेत ती आपण लिगल करु शकतो. त्याच बरोबर प्राधिकरणामधील ज्या भूखंडावर अनधिकृत बांधकामे आहेत ते आपण अधिकृत करणार आहोत त्याचे सर्व अधिकार आपल्याकडे आहेत ही देखील जमेची बाजु आपण लक्षात घेतली पाहिजे. प्राधिकरणाचा उद्देश होता की,याठिकाणच्या गोरगरीबांना स्वस्त दरात घरे मिळाली पाहिजेत. त्यांना सर्व सोयीसुविधा मिळाल्या पाहिजेत. गेल्या ५० वर्षापासून जे प्राधिकरण आहे त्याठिकाणी नागरीकांची कुठलीच कामे होत नव्हती त्यामुळे हे प्राधिकरण बरखास्त झालं याचं महाविकास आघाडी सरकारचं मी कौतुक करते. प्राधिकरणात आताजी घरे आहेत त्यांना ती विकता येत नाहीत किंवा त्याच्यावर कर्ज सुध्दा काढता येत नाही. ती घरे असुन नसल्यासारखी झालेली आहेत. त्यामुळे याचा निश्चितच या गोरगरीबांना फायदा होणार आहे.धन्यवाद.

**मा.अर्चना बारणे -** मा.महापौर साहेब,मा.आयुक्त साहेब,सन्मा.सभागृह माई,माझा प्रभाग २३ आहे. आणि हा प्रभाग जवळ जवळ ७० ते ८० टक्के भागामध्ये प्राधिकरण आहे. या भागातील लोकांना कष्ट करुन एक गुंठा,अर्धा गुंठा जागा घेवुन घरे बांधलेली आहेत. म्हणजे अक्षरशा पोटाला चिमटा घेवुन त्यांनी घरे घेतलेली आहेत. आणि ही लोकं बाहेरुन येऊन याठिकाणी पोटं

भरायला आलेली आहेत. त्यामुळे माझी आपल्याला कळकळीची विनंती आहे की, आपल्या भागातून प्राधिकरण हे सुटलं पाहिजे. आणि या गोरगरीबांची घरे वाचली पाहिजेत. धन्यवाद.

**मा.राहुल कलाटे -**मा.महापौर साहेब,मा.आयुक्त साहेब,सन्मा.सभागृह पीसीएनटीडीए चे विलनीकरण या विषयावर बराच वेळ या सभागृहामध्ये चर्चा चालू आहे. प्राधिकरणाची निर्मीती करण्यामागचा उद्देश हा होता की, याठिकाणच्या कामगार वर्गांना चांगल घर मिळावं आणि चांगली प्राईम सिटी व्हावी यासाठी झाली होती. परंतु आपण पाहिलं असेल की,मागच्या काही काळापासून प्राधिकरण त्या उद्देशापासून भरकटलेलं होतं. असं असताना मला वाटतं मागच्या कालावधीतच पीएमआरडीए ने जो प्रस्ताव राज्य शासनाला पाठवला आहे त्यावेळेस ते अभ्यास करत असतील त्यामुळे ते होऊ शकलेलं नाही. परंतु आज निर्णय घेत असताना आपण पाहिलं असेल की,हा जो सर्व परिसर आहे एक गुंठा,दोन गुंठा जागा घेवुन लोकं रहात आहेत. जवळपास ही जागा पंधराशे हेक्टर ही महापालिकेकडे त्यांनी दिलेली आहेत. हे देत असतांना ज्यांनी कोणी हे गॅझेट काढल आहे त्यांनी या महापालिकेचा खरंच अभ्यास केलेलाआहे. त्यांनी काय केलं आहे निगडी प्राधिकरण पेठा, जो लिजडीडची टांगती तलवार जी वर्षानुवर्ष त्या लोकांच्या डोक्यावरती होती. त्यातुन त्यांची मुक्तता केली आहे. लिजडीड कॅन्सल झालं म्हणजे काय झालं, ते त्या जागेचे मालक झाले. म्हणजे टिका करण्याच्या ऐवजी तो जर जी.आर.आपण वाचला तर त्याच्यामध्ये ब-यापैकी स्पष्टता आहे. त्याच्यामध्ये सेक्शन दिलेले आहेत ४० ब प्रमाणे पुणे महानगर विकास प्राधिकरणाची विशेष नियोजन प्राधिकरणाची निर्मीती करणे. ४० ब हे जर आपण वाचलं तर त्यात स्पष्ट म्हणलं आहे की, त्याच्या नियोजनाची बॉडी सिडकोसारखी असेल त्या कमिटी मध्ये महापौर असतील,आमदार असतील आणि ते निर्णय घेतील.म्हणजे मला असं वाटतं की,थेरगांव,वाकडचा जर विचार केला तर वाकड पोलिस स्टेशनच्या पाठीमागे एक एकरचा प्लॉट आहे. या प्लॉटचा मालक पिंपरी चिंचवड महानगरपालिका आहे. मी यासंबंधित अधिका-याशी बोललो तर ते म्हणले पिंपरी चिंचवड महापालिकेच्या ताब्यात १५०० हेक्टर जागेची मालकी येणार आहे. आणि या महापालिकेने चांगला दृष्टीकोन ठेवुन व्यवस्थित डेव्हलपमेंट केलं तर आणि याचा सर्व निर्णय महापालिकेने घ्यायचा आहे. आणि आता जी एक गुंठा,दोन गुंठा घेऊन ज्यांनी घरे बांधली आहेत ते त्या जागेचे मालक होतील का? तर हा निर्णय या सभागृहाने घ्यायचा आहे. पण आता आपण जी टिका करतोय, कोण आनंद व्यक्त करतोय हे म्हणत असताना याचे डिटेल पुढच्या काही दिवसात येतील. आता काय होत आहे त्याठिकाणी बांधकाम करायला गेलो तर १० टक्के विकसन शुल्क त्याठिकाणी भरावे लागतात. प्राधिकरणाच्या सेक्टरचा रेट काय आहे.

हजार,हजार रुपये बांधकाम कर्मर्शीयलचा रेट आहे. त्याच्यावर १० टक्के शुल्क भरावा लागला तर आज प्राधिकरणातील बरीचशी घरं ही काय रेग्युलाईझ झाली नाही पण आता काय झालं आहे त्याचा पुर्ण अधिकार महापालिकेला दिलेला आहे. म्हणजे हे महापालिका सभा ठरवणार आहे की,ती घरं नियमित करताना एक रुपया घ्यायचा का,काहीच घ्यायचं नाही,का जी घरे आहेत त्यांच्या नावची करुन द्यायची जो काही निर्णय घ्यायचा आहे तो अधिकार या सभागृहाला आहे. मागच्या काळात प्राधिकरणाचं पीएमआरडीए मध्ये विलनीकरण करण्याचं शासनाकडे गेलं त्यावेळेस आम्ही आंदोलनं केली ती यासाठी केली की,हा जो डेव्हलप झालेला भाग आहे तो आमच्याकडे द्या.याठिकाणी रस्ते,लाईट,पाणी,ड्रेनेज आम्ही देतोय आणि मला वाटतं याचा पुर्ण अंतर्भाव याच्यामध्ये आहे. आणि याच्यानंतर जर काही त्रुटी असतील तर मला वाटतं ४० ब जर तुम्ही वाचला तर त्यात क्लिअर म्हणलेलं आहे ४० ब प्रमाणे याची प्लॅनिंग अथॉरिटी कोण असेल याचं कशा प्रकारे प्लॅनिंग करेल, ४० ब मध्ये या बॉडीमध्ये महापौर, स्टँडींग चेअरमन, आमदार असणार आहेत. ही एवढी सगळी लोक असताना स्टेट गर्व्हेमेंट जर अशा पध्दतीचा निर्णय घेतला आहे. आणि त्या बॉडीमध्ये दादा पण आहेत. ते लोक विचार करतील ना, या लोकांना आपल्याला न्याय द्यायचा आहे. आता कोणी तरी सांगितलं की,सन्मा.आमदारानी इललिगल बांधकामे लिगल न झाल्यामुळे राजीनामा दिला. याचा जर आपण व्यवस्थित पाठपुरावा केला असता तर हे सगळे विषय संपले असते. इथं काही,काही आमदारानी पुररेषेतील स्वत:च्या इललिगल शाळा स्टेटकडं जाऊन लिगल केल्या आहेत. पण ते गोरगरीबांना न्याय देवु शकले नाहीत. तर हे शासन गोरगरीबांना न्याय देण्याचं काम करीत आहे. असं असताना आपण घाई करतोय, नक्की त्यात कुठे काय,काय आहे. आजच आपण त्यांचा निषेधही करतोय,आणि स्वागतही करतोय. आम्ही महाविकास आघाडी म्हणुन घेतलेला हा निर्णय चांगला म्हणतोय,आणि भारतीय जनता पार्टी हा चुकीचा निर्णय झालेला आहे असे म्हणतात हा झाला पॉलीटिकल अजेंडा पण या शहराचा मी स्वत: नागरीक म्हणुन सांगतो वेणुनगर पोलिस लाईन जर पाहिलं तर आमच्या आजोबांच्या जागेत आहे त्याचा परतावा घेतला त्याठिकाणी मी ७० गुंठयामध्ये स्किम केली. मला काय मिळालं पाच मजली बिल्डींग बांधली, त्यात जीना फ्री नाही,टेरेस फ्री नाही पी+फोर अशी पाच मजली बिल्डींग बांधली स्किम संपली. म्हणजे ८ एकरच्या जागेचा मोबदला मला एक एकर मिळतोय आणि आज ८ एकर जागा असती तर त्याची काय व्हॅल्यू झाली असती म्हणजे कुठं तरी स्थानिक शेतक-यांवर प्राधिकरणांकडुन झालेला अन्याय आज जर त्याच्यामध्ये जर तुम्हांला एफएसआय वाढणार असेल, डेव्हलपमेंट वाढणार असेल याच्यामध्ये मला एक मुद्दा पटतोय की, शेतक-

यांच्या साडेबारा टक्क्याचं काय? याचे अधिकार पीएमआरडीए कडे दिले आहेत नां, आणि पीएमआरडीए कडे जे भूखंड दिले आहेत त्यातले काही भूखंड तुम्ही इंजिनियरिंग कॉलेजला दिले आहेत. त्यातील दहा एकर आरटीओ मागत आहे. पोलिस कमिशनर ऑफिस सुध्दा मागणी करतय. या भूखंडावर ज्या सोयीसुविधा होणार आहेत त्याचा उपभोग आपल्या शहरातील नागरीकच घेणार आहेत. आता आपण एक साधं उदाहरण घेवु या, आज प्राधिकरणाची बिल्डींग तिथं पीएमआरडीए ची बिल्डींग म्हणुन होणार आहे. म्हणजे थोडचं पीएमआरडीचं ऑफिस हे शहराच्या बाहेर जाणार आहे. असं जर मुंबई आणि नवी मुंबईनं म्हणलं असतं तर एमएमआरडीए आणि सिडको डेव्हलपच झालं नसतं त्या धर्तीवर प्राधिकरणाचं विलनीकरण झालेलं आहे. मागच्या १०/१५ वर्षात महापालिकेची जी ग्रोथ झालीपण प्राधिकरणामुळे ते झाकलं गेलं आहे. कारण प्राधिकरणापेक्षा खुप चांगल प्राईम सिटी म्हणुन आपल्या शहराची डेव्हलपमेंट झालेली आहे. त्यात विविध संस्थेनी काम केलेलं आहे. म्हणजे १९८४ साली या शहराचं डी.पी.प्लॅन हा आदरणीय टाटांनी करुन दिला. म्हणजे या महापालिकेची ज्यावेळेस निर्मीती झाली त्यावेळेस या शहरात ४५,३०,२४ मी. असे मोठमोठे रस्ते ठेवलेले आहेत. आता पुणे शहरामध्ये गेल्यानंतर त्याठिकाणच्या पेठांमधील रस्त्यांची काय अवस्था आहे. त्याठिकाणी छोटे,छोटे रस्ते, छोटया,छोटया गल्ल्या ६ मीटरच्या,९ मीटरच्या आहेत त्याठिकाणी आपल्याला जाता येत नाही. आणि म्हणुन कुठं तरी पिंपरी चिंचवड महानगरपालिकेची स्थापना ही फार मोठं व्हीजन म्हणुन स्थापन झालेली आहे. आज प्राधिकरण आणि महापालिका याच्यामध्ये समन्व्य घातला गेला नाही, का, घातला गेला नाही. माझी जागा होती प्राधिकरणात मी काय केलं गुंठा,दोन गुंठे करुन जागा विकली आणि या जागा या शहरातील गोरगरीब नागरीकांनीच घेतल्या आहेत. या शहरात जे नोकरीच्या निमित्ताने आले त्यांनी त्या जागा घेतल्या आहेत. आज त्यांना जर मालक व्हायची संधी मिळत असेल तर याच्यासारखा द्विगुणित आनंद त्यांना दुसरा कुठला असेल, आणि ते कधी होणार आहे आपल्या या सभागृहाच्या मान्यतेने होणार आहे. हा अधिकार आपल्याला आहे. आपण प्रत्येक कलमच्या सेक्शन मध्ये गेलात तर तुम्हांला थोडंस जास्त अभ्यास करावा लागेल. कलम ४ ब, १६०,१६१ अधिका-यांचे अधिकार हे राज्य शासन घोषित करीत आहे. या कलमांचा देखील आपल्याला अभ्यास करावा लागेल. आणि आपणचं नाही तर,मंत्रालयातील डिपार्टमेंट सुध्दा काम करतयं ज्यावेळेस आम्ही नगरविकास खात्याला विचारलं हे कोण काम करतयं तर ते म्हणले आम्ही नाही टाऊनप्लँनिंग डिपार्टमेंट काम करतयं आणि हे टाऊनप्लॅनिंग डिपार्टमेंट काम करत असताना विविध प्रकारचे कन्सलटंट, या विभागाबद्दल आत्मीयता असणारे व्यक्ती हे सगळेजण मिळून त्याठिकाणी काम करतात. हे करत

असताना आताच आपण कोणी  तरी निषेध करायचा, जनरल बॉडी मध्ये ठराव करुन पाठवायचा हे सगळं पॉलिटिकली करेक्ट आहे. जो तो आपआपल्या भूमिकेवर ठाम आहे. आम्ही म्हणतो चांगलं केलं आहे तुम्ही म्हणताय चांगलं केलं नाही. पण वेळ, या सगळया  प्रश्नांची उत्तरे देणार आहे. माझ्या भागात थेरगांव,वाकड,काळेवाडी,रहाटणी,वाल्हेकरवाडी या भागातला शेतकरी एक,एक गुंठा जागा घेवुन जाणारा शेतकरी ज्याच्या ७/१२ वर नवनगरविकास  प्राधिकरण हे नांव होतं उद्या त्या  ७/१२ वर पिंपरी चिंचवड महानगरपालिका असे नांव असणार आहे. आणि मा.महापौर साहेब, तुम्हांला अधिकार असणार आहे त्या लोकांना मालक करायचं की,एसआरए करायचं त्याठिकाणचे जे मोकळे भूखंड आहेत ते देखील आहेत. त्याला पब्लिकच्य अँम्युनिटीमधुन कसा उपयोग करता येईल याचा निर्णय घेण्याची जबाबदारी महापालिकेची आहे. आणि ही जागा जवळ,जवळ पंधराशे एकर आहे. आपण तीनशे हेक्टर,तीनशे हेक्टर असं जर लिहिलं गेलं असेल तर या शहरातल्या विविध अँम्युनिटीजसाठी वापरलेल्या जातात. या शहरातील नागरीकांसाठी वापरल्या जातात. आता राहिल्या ठेवी, ठेवी या दिडशे कोटी आहेत. या भागातले  जे रिर्झेव्हेशन आहेत ते पीएमआरडीए  डेव्हलप करणार आहेत. त्यावेळेस त्यांना तो खर्च करावा लागणार आहे. आणि त्यात किती बारकावा  केला गेला आहे आणि त्यांची पण  प्लॅनिंग अँथॉरिटी आपणच आहोत. त्यांना सॅक्शनला आपल्याकडे यायचं आहे. म्हणजे  कुठं तरी छोटा विचार करुन हा जी.आर.काढलेला आहे.आणि  हा जी.आर.काढत  असताना शेतक-यांना साडेबारा टक्के परताव्याच्या विषयामध्ये राज्य शासनाने लक्ष घातलं आहे. ८४ चे सर्व शेतकरी साडेबारा टक्केच्या परताव्यासाठी पेंडींग आहेत. त्यामध्ये वाल्हेकरवाडी आणि आकुर्डीचा भागातील शेतक-यांचा प्रश्न प्रलंबीत आहे.त्यांच्यामध्ये काही लिगल प्रॉब्लेम आहे.  प्राधिकरण बरखास्त होण्याच्या शेवटच्या दिवसापर्यंत  साडेबारा  टक्के परतावा मिळण्याची कारवाई चालू होती पण ती कुठली होती   जे लिगलप्रकरण आहेत ज्याचा ताबा दिला गेलेला आहे. म्हणजे कुठं तरी प्रत्येक माणसाला सॅटीसफाईड करण्याचा प्रयत्न केला आहे. आता सिमाताईंनी सांगितलं आमच्या काळेवाडी फाटयावरुन गेलो तर त्याठिकाणी दोन्ही बाजुच्या असलेल्या मोकळया जागेच्या केसेस चालू आहेत. अशा केसेस या शहरामध्ये प्रत्येक भागामध्ये चालू  आहेत. आणि या सुप्रिम कोर्टात केसेस चालू होत्या सुप्रिम कोर्टाने या केसेस हायकोर्टात  रेफर केलेल्या आहेत आणि  तुम्ही याच्यावर निर्णय घ्या. मी तर असे म्हणेन  की, प्राधिकरणातले तलाव पण गायब झाले आहेत. काळेवाडी फाटयावर मोठा तलाव होता त्या तलावाचा मुद्या खुप लोकांनी उचलून धरला होता. कालांतराने ज्यांनी हा मुद्या उचलून धरला तो शांत झाला,ज्यांनी उचलून धरला

तो शांत झाला. म्हणजे कुठं तरी निसर्गाशी पण खेळण्याचं काम या प्राधिकरणाच्या आडून खुप लोकांनी केलं आहे. प्राधिकरणात जर आपण गेलो तर त्याठिकाणी शेतक-यांपेक्षा त्याठिकाणी साडेबारा टक्के परताव्यासाठी काम करणारे एजंट, जागा मिळवून देतो म्हणणारे एजंट, लोकांना घरे मिळवून देतो म्हणणारे एजंट अशा प्रकारे काही काळ या एजंटाच अतिच झालं होतं. भविष्याचा वेध घेवुन या महानगरपालिकेशी समन्वय साधुन जर गोरगरीब लोकांना न्याय देण्याचं काम महाविकास आघाडीचं सरकार करतयं, उद्या जर त्यात काही चुकीचं आलं तर शहराच्या नागरीकांच्या वतीने आम्हांला पण टिका करावी लागणार आहे. पण जर काही चांगल होत असेल तर काय हरकत आहे. मला वाटतं सिमाताईंना आनंद झाला आहे. फक्त तो द्विगुणीत करता आला तर आम्ही सुध्दा आपल्या पाठीशी आहोत. कारण हा प्रश्न या शहरातील नागरीकांचा आहे. आज आमच्या थेरगांवच्या सर्व नगरसेवकांनी सांगितलं आहे की, आमचं थेरगांव पुर्ण त्यात आहे. या भागातील प्रत्येक नगरसेवक त्या नागरीकांच प्रतिनिधीत्व करत आहेत. प्रत्येक भागाचा यामध्ये अंतर्भाव करण्यात आला आहे. आणि जर झाला नसेल तर आजही आपण महाविकास आघाडीकडे जाऊ शकतो. हे जे प्रश्न आहेत हे देखील सोडवून घ्या. आणि मला वाटतं त्यांचा पण स्वभाव पाहिला तर ते ऐकुण,समजुन निर्णय घेणारे नेते आहेत. पण आज आपण लोकांची दिशाभूल करण्यापेक्षा, त्यांना घाबरवण्यापेक्षा त्यांची घरे त्यांच्या स्वत: च्या मालकीची कशी होतील, जी काही कमिटी होईल त्या कमिटीमध्ये महापालिकेचं कितपत ऐकलं जाईल त्या कमिटी मध्ये असंही म्हणलं आहे की, त्या भागातले आमदार, महापौर या सर्वांना विश्वासात घेवुन पुढे पीएमआरडीए कशा पध्दतीने काम करेल हे देखील आपण सर्वजण पहाणार आहोत. फक्त हा समन्वय साधत असताना आपण काय केलं पाहिजे, काय नाही केलं पाहिजे. आम्ही पण म्हणेन की,थेरगांवला वेगळं प्रतिनिधीत्व असावं,रहाटणीला वेगळं प्रतिनिधीत्व असावं, वाल्हेकरवाडीला वेगळं प्रतिनिधीत्व असावं आमच्या भागातल्या दहा/पंधरा गल्ल्या तिकडे आहेत त्या इललिगल आहेत. त्यातल्या दोन गल्ल्या आपल्याकडे आहेत. फक्त साहेब,हे होत असताना माझी देखील आपल्याला विनंती आहे की, ज्या पध्दतीने आपण भविष्यात होणार,भविष्यात होणार, मी मालक होणार, मी मालक होणार पण ज्यादिवशी आपल्याला ऑर्डर येईल आणि आपण त्याचे मालक असाल त्यानंतर जर आपण स्वत: त्या त्या भागात काम करणा-या प्रतिनिधींना विश्वासात घेतलं आणि तुर्त लगेच काय करता येईल. म्हणजे मी आता कायदा आहे म्हणुन भांडत सुटलोय, मोकळया जागेवर ताबा घेतलाय असं काही न करता जर आपण त्या त्या भागात काम करणा-या प्रतिनिधींना विश्वासात घेतलं तर आपल्याला देखील त्यांच्या अडचणी कळतील. आणि जर याच्यामध्ये

काही अमेंडमेंट होत असतील तर या कायद्यामध्ये दोन/चार तरी अमेंडमेंट होतील. आणि त्या अमेंडमेंट होत असताना या भागातल्या शहरातील नागरीकांना,लोकप्रतिनिधींना, साडेबारा टक्के परतावा वासियांना यांच्या ज्या जागा प्राधिकरणामध्ये गेल्या आहेत त्यांना विश्वासात घेवुन त्यांनी जर काही चांगल्या सूचना याठिकाणी दिल्या तर त्या सुचना या सभागृहात येणार आहेत त्याचा आपण ठराव करुन राज्य शासनाकडे पाठवणार आहोत. जेणेकरुन त्याची अंमलबजावणी करताना देखील राज्य शासनाला त्या गोष्टी सोप्या जातील. एवढा मोठा निर्णय घेताना एखादा, दुसरा निर्णय राहून जातो. आणि म्हणुन आज आपण काय म्हणतो की,जीएसटी सारखा निर्णय घेत असताना भारतासारख्या देशाला दिड हजार,दोन हजार अमेंडमेंट कराव्या लागतात. प्राधिकरणाचे पीएमआरडीए मध्ये विलनीकरण करताना त्यामध्ये दोन/चार अमेंडमेंट होत असतील तर त्या करण्यासाठी या सभागृहाने मार्गदर्शन करावं. शहराने मार्गदर्शन करावं की, आमच्या या,या गोष्टींचा अंतर्भाव केला तर आमचा या शहरात फायदा होईल. मला वाटतं अभिनंदनाचा ठराव करायचा असेल तर करा, निषेधाचा ठराव करायचा असेल तर करा. पण या शहरातील नागरीकांचे जे मत आहे. ज्यावेळेस विस्तृत अधिसूचना येईल,त्यानंतर ज्यावेळेस कारवाई सुरु होईल त्यानंतर जर आपल्याला वाटलं हे चुकीचं आहे,ते चुकीचं आहे मला वाटतं त्यावेळेस महापौरांच्या अध्यक्षतेखाली या भागातील त्या,त्या भागातल्या नगरसेवकांच्या,नागरीकांच्या चांगल्या सूचना घ्याव्यात आणि त्याचा एकमताने ठराव मंजुर करावा. आणि तो ठराव आयुक्तांच्या मार्फत राज्य शासनाकडे द्यावा. मला वाटतं दादांकडे आमच्या पेक्षा विरोधी पक्षाचेच जास्त नगरसेवक गेलेले दिसतात. म्हणजे बरेच बीजेपीचे पण दिसतात,बरेचजण वेगवेगळया पक्षाचे दिसतात. मला वाटतं आमच्या आगोदर पण जे दादाकडे जातील कारण आता इलेक्शन पण आहे. कारण प्रत्येक नगरसेवकाला आपआपल्या भागातील अडचणी सोडवायच्या आहेत. आणि आपल्या शहरातील रिंगरोडचा एक प्रश्न आहे या रिंगरोडमध्ये एकाही नागरीकाचं घर जाणार नाही अशा पध्दतीने रिंगरोड न्या, आणि हे आपण पालकमंत्र्यांना पण सांगितलं आहे. आणि त्यांनीही सांगितलं आहे की, हा रिंगरोड झाला तर त्याच्यामध्ये एकाही नागरीकाचं घर जाणार नाही. म्हणजे या शहराचे डेव्हलपमेंट करताना या शहरातील ज्या नागरीकांनी एक/दोन गुंठे जागा घेवुन घरे बांधली आहेत आपल्याला त्या नागरीकांच्या हिताचा निर्णय घ्यावा लागेल. त्यामुळे माझी या सभागृहाला विनंती आहे की,ज्यावेळेस ही अधिसूचना येईल ती अधिसूचना या सभागृहासमोर ठेवावी. असे सिमाताईंनी सुध्दा सांगितले आहे. त्यावेळेस या सभागृहात याच्यावर चर्चा होणं

अपेक्षित होतं. पण मला माहित नाही,पुढचे विषय फार पटपट चालवायचे असतील. त्याच्यामुळे या विषयाची आगोदरच चर्चा केली आहे. धन्यवाद.

**मा.भाऊसाहेब भोईर -** मा.महापौर साहेब,मा.आयुक्त साहेब,सन्मा.सभागृह खरंतर या विषयावर बरेचजण विस्तृत बोलले आहेत. खरंतर या विषयावर बोलण्याचा माझा खरा नैतिक अधिकार आहे. कारण प्राधिकरण सदस्य म्हणुन नियुक्ती केल्यानंतर त्याठिकाणी काम केलेलं आहे. कारण मी या सभागृहाचा जास्त वेळ घेवु इच्छित नाही. राहुलदादांनी पण त्यांची भूमिका मांडलेली आहे. त्या भूमिकेशी मी पण सहमत आहे. कोणताही क्रांतीकारी निर्णय अचानक झाल्यानंतर लोकशाहीमध्ये दोन मतप्रवाह निश्चित असतात. साहजिक आहे निवडणुका आलेल्या आहेत. निर्णय असा आहे की,प्राधिकरणाची संकल्पना अशी असते की, काही नगरपालिकेची महानगरपालिका होण्यासाठी महाराष्ट्रामध्ये काहींना ११० वर्ष लागले,काहींना १२७ वर्ष लागले,काहींना ८० वर्ष लागले आहेत. भारतामध्ये सर्वात गतीमान नगरपालिकेची महानगरपालिका अवघ्या बारा वर्षामध्ये पहिली होणारी आपली पिंपरी चिंचवड महानगरपालिका आहे.आणि इतक्या झपाटयाने ग्रामपंचायतीचे कायदे माहिती आहेत किंवा नाही तोपर्यंत नगरपालिका आली, नगरपालिका होत नाही तर लगेच महानगरपालिका आली आणि या शहरामध्ये अण्णासाहेब मगर यांच्या पुण्याईने उद्योगधंदे इतके वाढले की, त्यामुळे अनधिकृत बांधकामांचा इतका सुळसुळाट झाला आणि त्यावेळेस सगळयात मोठा व्यवसाय होता तो खोली भाडयाने देण्याचा त्यामुळे या शहराचे विद्रुपीकरण होत असताना त्यावेळेस अण्णासाहेब मगरांनी नवीन नगरी निर्माण करण्याचा प्रयत्न झाला. त्यावेळेस नियोजित शहर,सुंदर शहर, आकर्षक शहर या शहरात बघण्यासारखा कोणता परिसर करावा यासाठी त्यांनी १९७२ साली त्यांनी दुरदृष्टी ठेवुन प्राधिकरण तयार केलं. प्राधिकरणाचा मुळ उद्देशच असतो की, हुडको असेल,सिडको असेल,महाडा असेल, एमआयडीसी असेल या स्वायत्त संस्था निर्माण करण्यामागचा उद्देश हा की, विकास आणि डेव्हलपमेंट प्लॅन जो असतो, नियोजित आराखडा असतो, त्या भागाचा गतीमान विकास करावा म्हणुन ती स्वायत्त संस्था असते. म्हणुन प्राधिकरणात एक गुंठयासाठी १० कि.मी.रस्त्याचे कामकाज थांबलेले आहे. आणि महानगरपालिकेचे कायदे वेगळे आहेत. त्यामुळे आपण सहजासहजी म्हणतो की,इकडचे पैसे तिकडे द्या तिकडचे पैसे इकडे द्या असं इतकं सोप नसतं आणि हे पीएमआरडीए मध्ये विलनीकरण केलेलं आहे ते थोडचं चायनामध्ये केलेलं आहे. पीएमआरडीए ही संस्था पुणे जिल्ह्यामध्ये आहे, पुणे जिल्ह्यामध्ये पिंपरी चिंचवड आहे.त्यामुळे आपल्या ज्या शंका आहेत,संशय आहे, बिल्डरधार्जीण्य आहे. आता मी स्वत: बांधकाम व्यवसायिक आहे. माई,मी

तिथं प्राधिकरण सदस्य होतो. आम्ही निविदा प्रक्रिया काढल्या कोणताही ठेकेदार तिथं पार्टनर झाला नाही आणि साडेबारा टक्क्यातील एक गुंठाही घेतला नाही. बिल्डरधार्जीण्य हे कोण आहे, काय आहे हे सगळया जगाला माहिती आहे. परंतु हा काही राजकीय अड्डा नाही की त्यावर भाष्य करावं. पण प्रश्न असा आहे की, नियोजित आराखडयानुसार गतीमान विकास करण्यासाठी पीएमआरडीए हा संपुर्ण जिल्ह्यातून दृष्य तयार करणारं म्हणजे पिंपरी चिंचवड आहे. आणि हा जो पैसा आहे तो महानगरपालिकेकडे देता येत नाही. का,तर प्राधिकरण,म्हाडा,सिडको या गर्व्हेमेंटच्या अधिकृत बांधकाम व्यवसायिक कंपन्या आहेत. रेडीरेकनरप्रमाणे त्याचा रेट ठरवला जातो. आणि डेव्हलपमेंटचा जो असतो तो त्या प्लॉटवर जो विकास करायचा असतो तो त्यावर झालेला खर्च आणि त्यातुन त्याचा विकास होत असतो. ती जी रक्कम येईल ती त्याच परिसरासाठी विकसित करण्यासाठी असते. सेक्टर २९,३०,३१ याचा आम्ही डी.पी.केलेला आहे. त्याठिकाणी निर्मलकुमार देशमुख होते ते चांगल्या आयडीया द्यायचे मी पर्सनल इंटरेस्ट घेवुन कधीच गेलो नव्हतो. आणि संपुर्ण प्राधिकरणामध्ये माझा शब्द तिथं ऐकायचे, त्या शब्दाचा आदर करायचे वडीलधारी माणसं असताना सुध्दा आणि म्हणुन त्या परिसरामध्ये आपण कोणतीही गोष्ट करत असताना राजकीय उद्दिष्ट डोळयासमोर ठेवुन तुम्हांला भाषणचं करायची असतील तर बिनधास्त करा. अभिषेक जसं तु प्राधिकरणातुन निवडुन आला तसं मी पण पंधरा वर्ष त्याठिकाणचं प्रतिनिधीत्व केलं आहे. प्रश्न असा आहे की, त्या काळात सत्ता कोणाची होती त्याठिकाणी रस्ते,लाईट,पाणी हे कोणी दिलं सत्ताधारी लोकांनीच दिलं त्यावेळी सत्ताधारी कोण होतं. मी एकमेव असा होतो की,प्राधिकरणाचा सदस्य पण झालो आणि नगरसेवक पण झालो. सगळया विकासाच्या एनओशा घेतलेल्या आहेत काही अडचण नाही . अनधिकृत असताना सुध्दा त्याठिकाणी रस्ते,लाईट,पाणी,ड्रेनेज सगळं केलं. विकास थांबलाय का? टॅक्स कोण घेतयं, महानगरपालिका घेत आहे. आणि म्हणुन पीएमआरडीए म्हणजे दुबईला,चायनाला जाऊन आपल्याला परवानगी घ्यायची नाही. आणि त्या संस्थेमध्ये आपले स्थानिक प्रतिनिधी,लोकप्रतिनिधी आहेत. आणि या शहराच्या वतीने महापौर या नात्याने त्याठिकाणी असणार आहेत आणि संपुर्ण सभागृह त्यांच्या पाठीशी राहणार आहे. आणि ते पिंपरी चिंचवडची मतं मांडतील नां, आणि म्हणुन असं वाटतं की,यावर खुप विस्तारपुर्वक बोलण्यासारखं आहे पण मी भाष्य करत नाही.मला असं वाटतयं सर्वांनी संशयाच्या वातावरणामध्ये रहाण्यापेक्षा हा आध्यादेश एक विशेष सभा बोलवून पीएमआरडीएचे अधिकारी बोलवून जे,जे नगरसेवक प्राधिकरणाच्या संदर्भात काम करत आहेत त्यांच्या खुप शंका आहेत. सर्वात महत्वाचं म्हणजे अभिषेक, अनधिकृत जागा विकल्या

कोणी ? मुळ शेतकरी कुठं आहेत,साडेबारा टक्के परतावा कोणी घेतला याचा सगळा जर अभ्यास केला नां , मला पीएचडी आहे म्हणुन बोलतो आणि तु चांगला बोलतो म्हणुन मी बोलतो. प्रश्न असा आहे की,या सगळया गोष्टींचा जो संशय आहे जो विषय आहे तो विस्तारपुर्वक तुम्ही समजुन घ्या. मी क्रांतीकारी निर्णय झालेला आहे हे एवढयासाठीच म्हणतोय तुम्हांला ज्या शंका आहेत नां सिमाताईंशी मगाशी चर्चा झाली त्या म्हणाल्या या विषयावर आपण चर्चा करु. प्रश्न असा आहे की,मुलाच्या उच्च शिक्षणासाठी त्यांनी पटकन घरं बांधुन टाकलं आणि घर बांधुन टाकल्यानंतर त्यांना कळलं की,आपण यावर कर्जही घेवु शकत नाही आणि गहाणही ठेवु शकत नाही. आता मुलाच्या शिक्षणासाठी पैसे कुठून आणायचे मी तुम्हांला शब्द देतो असं काही होणार नाही आता ते महानगरपालिकेत आलेलं आहे. आणि आता ते संपुर्ण फ्री होतील. उद्या तिथे महानगरपालिकेच्या वतीने नियोजित आराखडयामध्ये एखादं एसआरए जरी नांव दिलं तरी तो परिसर तुम्ही विकसित करु शकता. तीन एफएसआय सगळे अधिकृत होतील काळजी करु नका,जेवढी काळजी तुम्हांला आहे तेवढी काळजी आम्हाला पण आहे. विलनीकरण सारख्या गोष्टी या होत असतात त्यामुळे या सगळया गोष्टीचा बाऊ करण्यापेक्षा आनंद व्यक्त करायचा असेल तर करु शकता सत्ता तुमची आहे. पण हे सगळं चुकीचं आहे असं मत नाही. माई,ज्यांनी भाषणे केली,ज्यांनी प्रश्न उपस्थित केले त्या शंकेचे निरसन होईपर्यंत तुम्ही अशी कोणतीही घाई करु नका की,चांगल्या निर्णयाला तुम्ही दिशाहीन होईल. आणि कुठं तरी नेत्यांना वाटतं की,आपण चांगल काम करुन सुध्दा हे होत असेल तर मग तुम्ही राजकारण करणार असाल तर राजकारण करण्यातच सगळे आड येतात इथं असा काही वेगळा संदेश जाऊ देवु नका मला वाटतं हा विषय इथेच थांबवावा आणि विशेष सभा बोलवावी शंकेचे निरसन करण्यासाठी सभा बोलवावी एवढंच मी बोलतो आणि विनंती करतो.

**मा.नामदेव ढाके -** मा.महापौर साहेब,मा.आयुक्त साहेब,सन्मा.सभागृह सर्वात प्रथम आपल्या काही नगरसदस्यांनी याठिकाणी उल्लेख केला आहे की, ७ मे रोजी महाराष्ट्र शासनाची अधिसूचना जाहीर झाली. आणि अशा प्रकारे महाराष्ट्र शासनाच्या अधिका-यांकडुन त्यांचे जे काही पत्रं असतात,अधिसूचना असतात ते महानगरपालिकेच्या अवलोकनासाठी ठेवले पाहिजे. आणि ते येणा-या प्रत्येक महापालिका सभेला त्या त्या विभागाकडुन ते पत्र तातडीने नगरसचिव विभागाकडे आले पाहिजेत अशा प्रकारचा आदेश सन्मा.महापौर आपण आयुक्तांना द्यावा. जेणेकरुन हा जो काही विषय वृत्तपत्राच्या माध्यमामधुन जे विषय शासनाकडुन येतात ते आपल्या सन्मा.सभागृहाला येणा-या जी.बी.ला मी असं म्हणणार नाही की, १० तारखेचा अजेंडा आहे आणि ११ तारखेला विषय आला तर तो ठिक आहे.पण १० तारखेच्या आत येणारे

विषय हे प्रत्येक अजेंडा होण्याच्या आगोदरच्या दिवसापर्यंत आलेले शासनाचे जे काही आदेश असतील, निर्देश असतील किंवा अधिका-यांचे तशा संदर्भातील निर्देश असतील ते या महापालिका सभेसमोर अवलोकनार्थ ठेवणेत यावे. अशा प्रकारच्या सूचना आपण आयुक्तांना द्याव्यात. आणि सन्मा.महापौर खरं म्हणजे या पिंपरी चिंचवड नवनगरविकास प्राधिकरणाच्या विलनीकरणाच्या संदर्भामध्ये अनेक सदस्यांनी मत मतांतरे याठिकाणी मांडलेली आहेत. आणि खरं म्हणजे पिंपरी चिंचवड नवनगरविकास प्राधिकरण आणि पिंपरी चिंचवड महानगरपालिका मुळात जे पिंपरी चिंचवड नवनगरविकास प्राधिकरण आहे. त्याचं नांव सुध्दा पिंपरी चिंचवडच आहे तसेच महापालिकेचे नांव सुध्दा पिंपरी चिंचवड महानगरपालिका आहे. आणि म्हणुन जी काही महानगरपालिकेच्या अखत्यारीमध्ये असणारी प्लॅनिंग अथॉरिटी किंवा जे काही निर्णय आहेत ते महानगरपालिकेमध्ये विलनीकरण व्हायला पाहिजे होती अशी भूमिका आपली आहे. तसेच दोन्ही आमदारांचीही आहे, आणि ती असणार आहे. याचं कारण असं आहे की, शासनाचा जो आदेश आहे तो आदेश आम्ही संपुर्ण वाचलेला आहे. या शहराचे दोन्ही नेते सन्मा.आमदार लक्ष्मणभाऊ जगताप आणि मा.महेशदादा लांडगे यांनी सुध्दा ज्यावेळेला भारतीय जनता पार्टीचं शासन होतं त्यावेळेला सुध्दा पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मध्ये विलनीकरण व्हायला पाहिजे अशा प्रकारची भूमिका त्यावेळेला सुध्दा मांडली. आणि ७ मे ला याठिकाणी अधिसूचना आली त्याच्या एक महिना आगोदर त्यावेळेला सुध्दा कॅबिनेट मध्ये निर्णय झाला की, पिंपरी चिंचवड नवनगरविकास प्राधिकरणाचं पीएमआरडीए मध्ये व्हावं अशा प्रकारचा ठराव झाला. आणि सन्मा.महापौर आपण सुध्दा आपलं पत्र नगरविकास मंत्री, मुख्यमंत्री आणि पालकमंत्री यांना दिलेलं आहे. याच्यामध्ये काय त्रुटी असु शकतात अशी भूमिका या पत्राच्या माध्यमातून आपण मांडली. तसेच आपल्या दोन्ही आमदारांनी या शहराच्या हितासाठी या प्राधिकरणाचं विलनीकरण हे आपल्या पिंपरी चिंचवड महानगरपालिकेमध्येच झालं पाहिजे. अशा प्रकारची भूमिका आता सुध्दा मांडली आणि सत्तेत असताना सुध्दा मांडली. परंतु सन्मा.महापौर मी आपल्याला सांगेन की, या आध्यादेशामध्ये ब-याच गोष्टी नमुद नाहीत आणि काही गोष्टी क्लिअरकट नमुद झालेल्या आहेत. यामध्ये सांगितलं गेलं की, पिंपरी चिंचवड नवनगरविकास प्राधिकरणाची ज्यावेळेला १९७२ ला स्थापना झाली त्यावेळेला शेतक-यांच्या ज्या जमीनी संपादीत करण्यात आल्या त्यानंतर त्यांचा डी.पी.तयार झाला,रस्ते तयार झाले, आरक्षित भूखंडावरती अतिक्रमणे झाली किंवा काही ठिकाणी प्राधिकरणाला ताबा मिळाला नाही. मुळ शेतक-यांनी ज्या जागा विकल्या आहेत त्या घरामध्ये लोकं आता रहातात.अशा अनेक प्रकारच्या समस्या याठिकाणी आहेत. आणि म्हणुन सर्वात

महत्वाचं म्हणजे पिंपरी चिंचवड महानगरपालिका एका स्मार्ट सिटीकडे वाटचाल करत असताना मागच्या दहा वर्षाकडे आपण डोकावुन बघितलं तर या शहराचा विस्तार खुप मोठया प्रमाणात झपाटयाने होत असताना याठिकाणी दिसतयं,मोठया प्रमाणात नागरीकरण होताना दिसतय, आणि येणा-या तीस वर्षाचं आपण नियोजन करतोय येणा-या तीस वर्षामध्ये या शहरामध्ये आपल्याला काय करायचं आहे. या शहरासाठी आपलं काय व्हीजन असणार आहे. पुण्यापेक्षाही आपल्या शहरामध्ये चांगल्या चांगल्या संस्था आल्या पाहिजेत. आणि या शहरात असणा-या प्रत्येकाला असं वाटलं पाहिजे की, पुण्यात आपल्याला जायची गरज नाही त्याच्यापेक्षा चांगल एज्युकेशन आपल्याला याठिकाणी मिळेल. चांगले कॉलेज,हॉस्पिटल, एखादं सिटी सेंटर याठिकाणी उभं राहील,कर्मशियल प्रोजेक्ट करता येईल अशा प्रकारचं नियोजन आपण करतोय. त्यावेळेला मला असं वाटतयं की,या ज्या जमीनी आहेत त्या पिंपरी चिंचवडच्या आजुबाजुच्या परिसरामध्ये असणा-या मुळ शेतक-यांच्या ज्या जमीनी आहेत त्या जमीनी सुध्दा या शहरामध्येच आहेत. आणि मला असं वाटतयं की,ख-या अर्थानं या महाविकास आघाडीच्या माध्यमामधुन विलनीकरणाचा जो निर्णय लादला गेला आहे. कारण आज जर आपण या शहरामध्ये बघितलं तर हजारो एकरचे भूखंड पिंपरी चिंचवड नवनगरविकास प्राधिकरणाचे आहेत आणि हे भूखंड जर का त्या पीएमआरडीए कडे गेले तर आणि त्यांच्या माध्यमातुन हे विकसित  केले गेले तर मला वाटतं त्याच्या माध्यमामधुन येणारा जो महसुल किंवा पैसे आहेत ते पीएमआरडीएला  मिळणार आहेत. आणि म्हणुन जे काही मोकळे भूखंड आहेत. हे विकसित झाल्याच्या नंतर महानगरपालिकेला मात्र त्याठिकाणी या विकसित झालेल्या भूखंडाना मग तो वाकडचा भूखंड असेल,भोसरीचा भूखंड असेल ते ज्यावेळेला विकसित केले जातील त्यांना मात्र नागरी सुविधा देण्याचं काम मात्र पिंपरी चिंचवड महानगरपालिकेला करावं लागणार आहे. एका बाजुला आपण काय म्हणणार आहोत प्राधिकरणाचे जे मोकळे भूखंड आहेत ते पीएमआरडीए विकसित करण्यासाठी एखादया बिल्डरला देतील,एखादा प्रोजेक्ट करणा-या माणसाला देतील आणि त्या माध्यमातुन पीएमआरडीएला उत्पन्न मिळणार आहे. आणि त्यानंतर याठिकाणच्या  नागरी सुविधांचा ताण महानगरपालिकेवरती येणार आहे. असे मी याठिकाणी नमुद करतो. दुसरीकडे आपण म्हणलं आहे की, पिंपरी चिंचवड नवनगरविकास प्राधिकरणाचं पीएमआरडीए मध्ये विलनीकरण होत असताना पिंपरी चिंचवड महानगरपालिकेमध्ये मागच्याच महिन्यामध्ये या जिल्ह्याचे सन्मा.पालकमंत्री अजितदादा पवार यांच्या हस्ते या घरांची सोडत झाली मला वाटतं ६ हजार घरांची सोडत झाली आणि थोडयाच दिवसामध्ये अजुन ९ हजार घरे होणार आहेत. म्हणजे

एकुण १५ हजार घरांचं जे काही महसुल येणार आहे ती घरे विकली जाणार आहेत त्याचे लाभार्थ्यांकडुन जे पैसे येणार आहेत ते जवळपास १५०० कोटी रुपये हे पीएमआरडीए कडे जाणार आहेत. आणि एकंदरीत आपण म्हणतो की,पिंपरी चिंचवड महापालिकेला याचा फायदा होणार आहे. याठिकाणी मला समजत नाही की, पीएमआरडीएला जवळपास १५०० कोटी रुपयांचे त्यांना उत्पन्न मिळणार आहे आणि या नागरीकांना आपल्याला पाणी द्यायचं आहे. पाण्यासाठी आज आपली काय परिस्थिती आहे हे माहिती आहे. एका बाजुला आपण यांना पाणी देवु शकत नाही आणि दुस-या बाजुला हे १५ हजार घरे झाल्याच्यानंतर त्याठिकाणी लागणा-या नागरी सुविधाच्या संदर्भामध्ये ड्रेनेज,लाईट,पाणी,रस्ते आपल्याला तरतुद करावी लागणार आहे. त्यासाठी आपण पैसा कुठून आणायचा जर का ते या विलनीकरणाच्या बरोबर हे विकसित होत असणारे भूखंड, होत असलेले प्रोजेक्ट महानगरपालिकेकडे वर्ग केले असते तर महानगरपालिकेला उत्पन्नाचे स्त्रोत मिळाले असते. आणि म्हणुनच या पिंपरी चिंचवड नवनगरविकास प्राधिकरणाचे विलनीकरण महानगरपालिकेमध्येच व्हायला पाहिजे होतं. या भूमिकेमधुन भारतीय जनता पार्टीचे सर्व नेते आणि आपण सुध्दा नगरविकासमंत्री, पालकमंत्री,मुख्यमंत्री यांना पत्रं दिलेलं आहे. तसेच या शहरातील शेतक-यांवर साडेबारा टक्के परताव्याचासंदर्भात जो अन्याय झाला आहे. ठिक आहे,या साडेबारा टक्क्याच्या परताव्याच्या संदर्भात मी त्या राजकारणात जाणार नाही. आमचं सरकार असताना मला वाटतं या साडेबारा टक्क्याचा प्रश्न निवडणुकीच्या आगोदर एक ३/४ महिने निर्णय झाला होता. मगाशी अजितभाऊंनी पण सांगितलं की,की साडेबारा टक्के परतावा देताना शेतक-याला सव्वा सहा टक्के त्यांना जमीन द्यायची आणि सव्वा सहा टक्के त्याला टीडीआर द्यायचा अशा पध्दतीचा साडेबारा टक्के देण्याचा परतावा याठिकाणी मिटींग होऊन सुध्दा या राज्य सरकारने या शेतक-यांचा विषय मार्गी लावुन हे पीएमआरडीएमध्ये विलनीकरण केलं असतं तर मला वाटतं ते अधिक सोईचं झालं असतं परंतु या साडेबारा टक्केचा प्रश्न अधांतरीच ठेवलेला आहे. या शहरातील भूमिपुत्राच्या जमीनी कवडीमोल किंमतीला या प्राधिकरणाने संपादीत केलेल्या आहेत त्यावर आमच्या सहकार्याने उल्लेख केला की, माझ्या वडीलांची ५६ एकर जागा या प्राधिकरणामध्ये गेली आहे. एका अर्थानं पीएमआरडीएच्या माध्यमातुन या पीएमआरडीए ला आणि राज्य शासनाला हे एक उत्पन्नाचे स्त्रोत या अधिसूचनेच्या माध्यमामधुन दिसत आहे. आणि म्हणुन या पिंपरी चिंचवड नवनगरविकास प्राधिकरणाचं विलनीकरण या महापालिकेमध्ये व्हायला पाहिजे होती ही भूमिका आम्ही मांडलेली आहे. मगाशी राजाभाऊ आणि ताईंनी सांगितलं की, पिंपरी चिंचवड नवनगरविकास प्राधिकरणाचं विलनीकरणाचा एक आनंद वाटला परंतु

महापौर साहेब,आपण ज्या भागमध्ये रहातोय,ज्या पेठा याठिकाणी विकसित झालेल्या आहेत त्या पेठांच विद्रुपीकरण करण्याचा निर्णय या अधिसूचनेमधील क्र.५ चा मुद्या आहे तो आपण वाचावा. खरंतर पिंपरी चिंचवड शहर म्हणलं की, मी कुठं रहातो म्हणलं की, प्राधिकरणातील सेक्टर २२ मध्ये रहातो,सेक्टर २५ मध्ये रहातो अशा प्रकारची भूमिका मागच्या काळामध्ये बेंचमार्क प्राधिकरणाचं जे झालेलं होतं या मुद्या क्र.५ च्या माध्यमामधुन एकसमान नियमावली नियोजनाची आहे. जी प्लॅनिंग अथॉरिटी आहे ती आल्याच्यानंतर मला असं वाटतं की, जे बंगले असतील, ते डिमॉलिस होतील आणि मोठया इमारती एफएसआयच्या माध्यमामधुन निर्माण होतील. आणि प्राधिकरणाची जी ओळख होती ती या विलनीकरणामुळे पुसली जाण्याची शक्यता आहे. अधिसुचनेमधील मुद्या क्र.५ जर आपण वाचला तर याठिकाणी असणा-या बंगल्याचं रुपांतर बिल्डींगमध्ये होणार आहे. आणि या प्राधिकरणाची जी ओळख आहे ती पुसण्याचं काम याठिकाणी आपल्या सरकारच्या माध्यमामधुन केलेलं आहे. आणि म्हणुन आम्ही या गोष्टीचा याठिकाणी निषेध व्यक्त करतोय. दुसरं असं आहे की, आंतरराष्ट्रीय प्रदर्शन व परिक्षण रिसर्च सेंटर आरएनडी जे आहे ३७५ हेक्टर जमीन त्याठिकाणी आहे. या जमीनीपैकी या ठिकाणी अतिशय वैभव असं करण्याचं काम प्राधिकरणाच्या माध्यमामधुन केलं जात आहे. आणि त्याच्यामध्ये जर आपण बघितलं या ३७५ हेक्टर जमीनीमध्ये जवळपास १२५ ते १५० हेक्टर जमीनी याठिकाणचे पुर्णपणे ब्लॉक टाकुन बाहेरच्या एमएनसी कंपन्या किंवा भारतामधल्या कंपन्या त्याठिकाणी येतील आणि त्यांचे रिसर्च सेंटर त्याठिकाणी करतील आणि ते सुध्दा विकण्याचं काम किंवा विकुण आल्याच्या नंतर याठिकाणचे पैसे सुध्दा पीएमआरडीएला मिळणार आहेत. आणि त्यानंतर मी मगाशी सांगितल्याप्रमाणे ही जी काही विकसनशिल झाल्याच्या नंतर पिंपरी चिंचवड महापालिकेने त्यांना रस्ते ,पाणी,ड्रेनेज ,लाईट द्या अशी सगळी कामे पिंपरी चिंचवड महापालिकेला करावी लागणार आहेत. आणि याचा सगळा आर्थीक भार या महापालिकेवर पडणार आहे. आणि म्हणुन या विलनीकरणाच्या निर्णयाला आम्ही विरोध केलेला आहे. खरं म्हणजे याठिकाणी लिजच्या संदर्भात उल्लेख केला आहे की, लिज हे फ्री होल्ड झालेले आहेत. परंतु कुठल्याही प्रकारचं ९९ वर्षाचं लिज फ्रीहोल्ड झालेलं नाही. ही अधिसूचना वाचल्यानंतर मला वाटलं की, याच्यामध्ये थोडं कमी जास्त असु शकेल परंतु हा निर्णय या शहरावरती अन्याय करणारी गोष्ट आहे. ९९ वर्षाच्या ज्या प्रॉपटर्या आहेत त्या फ्री होल्ड झाल्याचा उल्लेख या अधिसूचनेमध्ये नाही. पिंपरी चिंचवड नवनगरविकास प्राधिकरणाकडुन म्हणजे पुर्णपणे रेव्हीन्युच्या माध्यमामधुन त्यांच्या ७/१२ वरती अनाधिकृत असणारे भूखंड, आजही ७/१२ बघितला तर त्यावर पिंपरी चिंचवड नवनगर

विकास प्राधिकरणाचा शिक्का आहे. आणि या आदेशामध्ये फक्त एका ओळीमध्ये हे भूखंड देण्याचं काम याठिकाणी केलेलं आहे. मला असं वाटतयं की, पिंपरी चिंचवड नवनगरविकास प्राधिकरणाच्या माध्यमामधुन आज आपण बघितलं की,पिंपरी चिंचवड महानगरपालिकेने त्यांचे जे आरक्षित भूखंड आहेत ते त्यांनी विकसित करण्याची त्यांची जबाबदारी असताना सुध्दा ते महापालिकेला हे भूखंड विकसित करावे लागले. आणि येणा-या काळामध्ये ते सांगतात की, अशा प्रकारचे मोठे भूखंड आम्ही महानगरपालिकेलाच देणार आहे. महानगरपालिका ही त्याच पेठामध्ये राहणा-या लोकांसाठी करणार आहे. लोकांसाठी त्याचा उपयोग होणार आहे. आणि म्हणुन एक दिशाभूल करण्याचं काम या आदेशाच्या माध्यमामधुन झालेलं आहे. आणि या महाविकास आघाडीच्या माध्यमामधुन या शहरातील नागरीकांच्या वरती या विलनीकरणाच्या माध्यमामधुन अन्याय केलेला आहे. मोकळया भूखंडातून ५० हजार कोटी रुपये माया जमा करण्याचं काम आणि ती माया जमा करत असताना शासनाला आणि पीएमआरडीएला एक चांगल उत्पन्नं मिळवून देत असताना पिंपरी चिंचवड महापालिकेला मात्र यापासून वंचित ठेवण्याचं काम या आदेशाच्या माध्यमामधुन केलेलं आहे. आणि त्यामुळे या प्राधिकरणाचे विलनीकरण महापालिकेमध्येच झाले पाहिजे. अशा प्रकारची भूमिका आमची असणार आहे.आणि येणा-या काळामध्ये आमचे दोन्ही आमदार हे पिटीशन दाखल करणार आहोत. वेळप्रसंगी आम्ही रस्त्यावर उतरणार आहोत. पब्लिकला आम्ही याठिकाणी सांगु की,हा अन्याय कशा पध्दतीचा आहे. सभागृहामध्ये सांगितले आहे की, या प्रकारचे भूखंड आणि ज्या ठेवी आहेत ते पीएमआरडीएला मिळणार आहेत. आणि जे उत्पन्न आहे ते पीएमआरडीएला मिळणार आहेत. उद्या आमच्या या भूमीपुत्रांना साडेबारा टक्के परतावा देण्याची वेळ आली तर पीएमआरडीएचं क्षेत्र हे पुणे जिल्ह्यामध्ये आहे त्यामुळे काय सांगावं या साडेबारा टक्केचा परतावा भोरमध्ये सुध्दा देतील,शिरुरला देवु शकतात अशा प्रकारची सुध्दा शक्यता याच्यामध्ये नाकारता येत नाही. आणि म्हणुन हे महानगरपालिकेमध्येच विलनीकरण झालं पाहिजे. या महानगरपालिकेच्या क्षेत्रामध्ये असणारे जे भूखंड आहेत हे या ठिकाणच्या भूमीपुत्राच्या जमीनी आहेत. त्या या शहरासाठीच राहिल्या पाहिजेत अशा प्रकारची भूमिका भारतीय जनता पार्टीची माध्यमामधुन आणि यादोन्ही आमदारांच्या माध्यमामधुन झालेली आहे. गटनेते आपण आता म्हणले आहे की, आमच्या आमदारांच जे व्हीजन आहे आपल्याला माहिती आहे. आज पिंपळेगुरव,पिंपळेसौदागर बघितलं तर याठिकाणी वाकड सुध्दा हा आपला एरिया आहे. आणि त्याठिकाणची डेव्हलपमेंट आमदारांच्या माध्यमामधुन झालेली आहे. आणि तुम्ही चिंता करु नका, आणि येणा-या काळामध्ये याठिकाणी निवडणुका जरी लादत असतील तरी पिंपरी

चिंचवड महानगरपालिकेमध्ये सन्मा.आमदार लक्ष्मणराव जगताप आणि मा.महेशदादा लांडगे यांच्या नेतृत्वाखाली पुन्हा भारतीय जनता पार्टीची सत्ता याठिकाणी येईल. आणि गेल्या चार ते साडेचार वर्षाच्या कालखंडामध्ये जी कामे याठिकाणी केलेली आहेत ते जनतेमध्ये जाऊन आम्ही सांगणार आहोत. याठिकाणी मी अभिमानाने सांगेन की,याठिकाणी जो विकास केलेला आहे. जरी गेल्या दिड वर्षामध्ये आम्हांला विकास करता आला नसेल तरी सुध्दा आपण प्रत्येक वॉर्डात जाऊन बघा चांगल्या पध्दतीचं नियोजन झालेलं आहे. त्यामुळे चिंता करण्याचं कारण नाही. चिंता पण करु नका, आम्ही नागरीकांचा विकास करण्याचं काम केलेलं आहे.तरी सन्मा.महापौर मी आपणांस विनंती करणार आहे की,पिंपरी चिंचवड नवनगरविकास प्राधिकरणाचं विलनीकरण पीएमआरडीए मध्ये झालेलं आहे आणि हे होत असताना या शहरातील नागरीकांवरती,या शहरातील भूमिपुत्रावरती अन्याय झालेला आहे आणि म्हणुन प्राधिकरणाच पीएमआरडीए मध्ये विलनीकरण न होता पिंपरी चिंचवड महानगरपालिकेमध्ये झालं पाहिजे. अशा प्रकारची भूमिका मी याठिकाणी मांडतो आणि महाविकास आघाडीने जे कृत्य केलेलं आहे त्यांचा मी निषेध व्यक्त करतो आणि थांबतो.धन्यवाद.

( सभागृहात गोंधळ )

**मा.महापौर**– खाली बसुन घ्या, आता सत्तारुढ पक्षनेत्यांनी बोलले आहेत. त्यानंतर बोलायचं नाही. विषय क्रमांक १ घ्या.

**मा.अॅड.मोरेश्वर शेडगे-** मा.महापौर साहेब, विषय क्रमांक १ वर मी पुढील प्रमाणे ठराव मांडतो.

विषय क्रमांक – १

दिनांक- १८/६/२०२१ विभाग – मा.आयुक्त

संदर्भ – १) मा.सुवर्णा बुर्डे, मा.संतोष कांबळे यांचा प्रस्ताव –
२) मा.स्थायी समिती सभा ठराव क्र.९५७७, दि.२७/०५/२०२१

कोरोना प्रतिबंध लसीकरणाचे काम सध्या चालू आहे. तथापि सदर लसींचा आवश्यक तेवढा पुरवठा होत नसल्याने, लसीचा तुटवडा निर्माण झाला असून लसीकरणाचे काम संथपणे होत आहे. पिंपरी चिंचवड शहरातील नागरीकांचे लसीकरण लवकरात लवकर व्हावे व त्यासाठी सातत्याने लस उपलब्ध व्हावी याकरिता पिंपरी चिंचवड परिसरातील हिंदूस्थान अँटिबायोटिक्स या कंपनीस लस निर्मीतीची परवानगी देणेसाठी केंद्रसरकारकडे पाठपुरावा सुरू आहे. हिंदूस्थान अँटिबायोटिक्स कंपनीस लस निर्मितीची

